म. ग्रं. सं. ठाणें.
विषय भू-प्रवास
सं. क्र. ८९७

REFBK 0029450
REFBK-0029450

৩৬।৬।৫৫
২৭।৮।৫৫

भू प्रवास
भू-प्रवास २९० वा. क्र. २९२५० २८/३/९८
भू-प्रवास २९० २९२५० १८/३/९८



कुतूहलपूर्ण मजेरेनं
केनियातली अरण्यं
पाहणं देखील
रसिक वाचकांना
आवडतय असं दिसतं
आणि
याचं कारण बहुधा हे असावं की
स्वत: गंगाधर गाडगीळ या
माणसाला तो अनुभव खूप
आवडला.


# सिंहाच्या देशात

गंगाधर गाडगीळ

REFBK-0029450







भू-प्रवास
२९५५० १९७
(library stamp) भू-प्रवास १९७ २९५५०



कुतूहलपूर्ण नजरेनं
केनियातली अरण्यं
पाहण देखील
रसिक वाचकांना
आवडतंय असं दिसतं
आणि
याचं कारण बहुधा हे असावं की
स्वतः गंगाधर गाडगीळ या
माणसाला तो अनुभव खूप
आवडला.

भू-प्रवास
संदर्भ
भू-प्रवास
१९७
२९५५०
१८।३।९८

# सिंहाच्या देशात

गंगाधर गाडगीळ

REFBK-0029450
REFBK-0029450










नृत्य
भिडत
आकाशाला





नृत्यात दंग झालेले वनवासी


प्रकाशक व मुद्रक
सन पब्लिकेशन्स्
३१७ नारायण पेठ,
दै.प्रभात समोर,
पुणे -४११०३०.
फो.४५९५४१/३३९६५२



[illegible]


Ó : गंगाधर गाडगीळ

प्रकाशन दिनांक
१५ ऑगस्ट १९९७
ISBN NO.81-87002-03-4






शिकार अशी साधायची असते. सावजाचं नरडं असं आवळाचं असत.



सावज शोधणारे डोळे

आळसावलेला वनराज





हत्ती देखील समोर आले तरी आमची मान वरच



# प्रस्तावना

*चला माझ्यासोबत सिंहांच्या राज्यात*

प्रवासाची मला हौस आहे. आपण ज्या जगात जगतो ते पाहावं, निरनिराळ्या प्रदेशांचं, त्यातल्या समाजाचं वेगळेपण अनुभवावं असं मला नेहमीच वाटत आले आहे. त्यामुळे माझ्या लेखनाच्या प्रारंभकाळातच मी ''गोपुरांच्या प्रदेशात'' हे प्रवासवर्णन लिहिलं. वाचकांना ते खूप आवडलं. त्यानंतर ''सातासमुद्रापलीकडे'' हे अगदी वेगळ्या प्रकारचं प्रवासवर्णन मी लिहिलं. मग मात्र अनेक वर्षं मी फारसा प्रवास केला नाही आणि प्रवासवर्णनही लिहिलं नाही.

१९७० साली मी ऑस्ट्रेलियात जाऊन आलो. तो एक अत्यंत वेगळा व संपन्न अनुभव होता. पण का कोण जाणे, मी त्याचं वर्णन लिहिलं नाही. सातासमुद्रापलीकडे लिहिल्यानंतर आणखी वेगळं असं प्रवासवर्णन कसं लिहावं ते मला कळत नव्हतं आणि याच कारणामुळे १९८० नंतर मी देशात व परदेशात खूप प्रवास केला तरी मी प्रवासवर्णनात्मक असं फारसं लिहिलं नाही.

गेल्या काही वर्षात मी असं ठरवलं की उगीच नवं काही करण्याच्या प्रयत्नामुळे अडून न राहता, ज्यावेळी जसं लिहावंसं वाटेल त्यावेळी तसं लेखन करायचं. असा निर्णय घेतल्यावर 'नायगाराचं नादाब्रह्म', 'चीन एक अपूर्व अनुभव' आणि आता 'वनचरांच्या राज्यात' ही पुस्तक मी लिहिली आणि रसिक वाचकांनी त्यांचं ज्या प्रकारे स्वागत केलं त्यावरूनच तो निर्णय योग्य होता असं वाटत आहे.

कोणताही अनुभव घेताना दोन प्रकारच्या भूमिका घेता येतात. एक म्हणजे मी आहे तसाच राहीन आणि त्या भूमिकेबद्दल अनुभव घेईन. दुसरी अशी की मी जो अनुभव घेत असेन, तो घेतांना त्या अनुभवामुळेच मी वेगळा होईन. यापैकी दुसरी भूमिका मी सतत घेत आलेलो आहे. म्हणून 'दुर्दम्य' लिहितांना मी बराचसा टिळक युगातला होतो आणि रोम पाहतांना पाश्चात्य संस्कृतीत प्रभावित झालेला असतो. काप्री मी ज्या डोळ्यांनी पाहतो त्या डोळ्यांनी केरळ पाहू शकत नाही.

प्रस्तुत पुस्तक लिहितांना आफ्रिका खंड, त्यातले काळे लोक, तिथला निसर्ग आणि तिथले वन्य प्राणी यांनी प्रभावित झालो होतो आणि त्या प्रभावामुळे या पुस्तकात एक प्रकारचा वेगळेपणा एक वेगळीच रुची प्राप्त झाली आहे, असं मला वाटतं.


अर्थात वन्य प्राण्यांचं जीवन पाहायला जी दृष्टी लागते ती माझ्याजवळ नाही. त्यामुळे केनियातल्या अरण्यात फिरतांना जिम कार्बेटचे डोळे मला असते तर बरं झालं असतं. असं सतत वाटत होतं. कारण त्याच्या

नाही. त्यामुळे केनियातल्या अरण्यात फिरतांना जिम कार्बेटचे डोळे मला असते तर बरं झालं असतं. असं सतत वाटत होतं. कारण त्याच्या डोळ्यांनी भारतातली अरण्यं पाहताना ज्या ‘सखोलतेत’ त्या अरण्याचं व त्यातील प्राण्यांचं दर्शन घडलं, तसं माझ्या डोळ्यांना केनियातली अरण्ये पाहताना कसं घडणार? पण गंगाधर गाडगिळांच्या अनभ्यस्त पण हौशी आणि कुतूहलपूर्ण नजरेनं केनियातली अरण्यं पाहणं देखील रसिक वाचकांना आवडतंय अस दिसतं आणि याचं कारण बहुधा हे असावं की स्वतः गंगाधर गाडगीळ या माणसाला तो अनुभव खूप आवडला, अनुभवविश्वाचा विस्तार करणारा वाटला आणि खूप रोचक आणि गंमतीदार वाटला.

तेव्हा चला आता माझ्या सोबत सिंहांच्या राज्यात.


मुंबई १८-१०-१९९६ — गंगाधर गाडगीळ





*लेखांचा क्रम*


प्रास्ताविक
१. हसरे स्वागत
२. ब्रिटिश खुणा जपणारं नैरोबी
३. वृत्तपत्रांतून दिसलेला केनिया
४. कॉम्बीतला दणकेबाज प्रवास
५. राज्य वनचरांचं
६. सिंह भेटलेच नाहीत
७. मुक्काम विषुववृत्तावर
८. फ्लेमिंगोच्या वसाहतीत
९. निसर्गाची अथांग विपुलता
१०. सिंहांचं जेवण!
११. अरण्य प्राण्याचं, माणसांचं



# हसरे स्वागत

जग पुष्कळसं पाहिलं होतं आणि तरी बरंचसं पाहायचं राहिलं होतं. गेल्या वर्षी ऑस्ट्रेलिया - न्यूझीलंडचा प्रवास करून आल्यावर वाटलं होतं, की पुरे झाली ही दगदग. दर वेळेला प्रवासाहून परतलं म्हणजे असंच वाटतं. पण काही दिवस गेले की पुन्हा सुरसुरी येते. वाटतं, की तेवढं राहिलंय... तेदेखाल पाहू या की! यंदाही तसंच झालं. वाटलं, की चीन, रशिया, युरोप, अमेरिका पाहून झाली; पण एवढं मोठं आफ्रिका खंड; पण आपण ते पाहिलचं नाही. गेल्या वर्षी एका व्याख्यानाच्या निमित्तानं मंडेलांच्या दक्षिण आफ्रिकेला भेट दिली; पण ती धावती. दरबानला तीन-चार दिवस राहिलो आणि मग तिथून पुढे युरोपला गेलो. जाताना चुटपुट वाटली, की काळ्या लोकांनी व्यापलेला आफ्रिकेचा दक्षिण भाग हे एक वेगळंच विश्व आहे. तो आपण बघायलाच हवा. तेव्हाच्या चुटपुटीची यंदा सुरसुरी झाली आणि मग ठरवलं, की जायचं.

आफ्रिका खंड कितीतरी मोठं. त्यात कुठं जायचं हा प्रश्नच होता. तुत्सी आणि हुतू लोक जिथं एकमेकांच्या कत्तली करतात, त्या भागात मला अर्थातच जायचं नव्हंत. नायजेरियात म्हणे तिथले लोक आपपरभाव मानत नाहीत. तुमच्या घरात शिरतात, राजरोसपणे आपल्याला हव्या त्या गोष्टी घेतात आणि मग तुमच्याच फ्रीजमधलं मद्य आणि अन्न काढून तुमच्याच डायनिंग टेबलावर बसून मजेत जेवण करतात. त्याला तुम्ही विरोध केलेला त्यांना आवडत नाही. मग नाइलाजानं त्यांना तुम्हाला बडवावं लागतं, नाही तर ठार मारावं लागतं. पण तुम्ही समंजसपणानं वागलात तर ते तुम्हाला आपल्याबरोबर जेवायलाही बोलावतात आणि नंतर जाताना तुमचे मनापासून आभार मानतात. त्यांच्या या सौजन्याचा अनुभव मला घ्यायचा नव्हता. सोमालियात नेहमीच युद्ध चालू असतं. तसं ते त्या वेळीदेखील चालू होतं. अली माहडी महंमद आणि महंमद फाराह ऐदीद यांचे पाठीराखे सैनिक यांच्यात चकमकी चालू होत्या. त्यात मॉर्टर, विमानविरोधी तोफा, मशिनगन आणि टँकविरोधी रॉकेट यांचा उपयोग केला जात होता. चौकशी करता ही सगळीच आयुधं प्राणघातक आहेत असं कळलं. म्हणजे परतीच्या तिकिटाचे पैसे फुकट जाण्याचा धोका होता. म्हणून सोमालियाला जायचं मी टाळलं. बुरुंडीमध्ये राष्ट्राध्यक्ष आणि प्रधानमंत्री यांच्यात काही मतभेद निर्माण झाले आहेत असं माझ्या कानावर आलं. राष्ट्राध्यक्ष सिल्व्हेस्टर न्टिबांटुगान्या हे हुतू टोळीतले आहेत आणि प्रधानमंत्री अँटोइन न्डुबांयो हे नुत्सी टोळीतले आहेत.

सेनादलातले बहुतेक सैनिक तुत्सी आहेत आणि त्यांनी गेल्या आठवड्यात एक हजार हुतू नागरिकांची कत्तल केली, असा बंडखोरांचा आरोप होता. या कृत्यात म्हणे शेजारच्या रवांडा देशातल्या तुत्सी सैनिकांनी मदत केली. निदान तसा आरोप बुरुंडीतले हुतू लोक करीत होते. रवांडाचे संरक्षणमंत्री या आरोपाचा जोरदारपणे इन्कार करीत होते. अशी गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण झाली असताना आपण तेथे जाणं इष्ट नव्हे, असं माझ्या बायकोचं मत पडलं होतं, आणि आश्चर्य म्हणजे, या बाबतीत आमचं एकमत झालं होतं. कारण लढवय्या लोकांत असे मतभेद झाल्यावर कशी परिस्थिती निर्माण होते, याचा अनुभव आसामी साहित्य संमेलनाचं उद्‌घाटन करण्यासाठी मी सपत्नीक गेलो असता आम्हा दोघांना आला होता. तिथं नागा, मणिपुरी, आसामी आणि इतर काही लोकांत अशाच स्वरूपाचे मतभेद होते आणि त्यामुळे स्टेनगनधारी सैनिकांच्या पहाऱ्यात आम्हाला वावरावं लागलं. इथिओपियातलं यादवी युद्ध संपलं होतं आणि तिथला दीर्घकालीन दुष्काळही संपुष्टात आला आहे, असं मी वाचलं होतं. त्यामुळे वृत्तपत्र वाचताना मी एक समाधानाचा सुस्कारादेखील सोडला होता. पण अलीकडेच माझ्या कानावर आलं होतं, की तिथं आता एक नवा दुष्काळ पडला आहे. अशा परिस्थितीत आपण बायकोनं केलेले लाडू, शंकरपाळे इत्यादी पदार्थ बरोबर घेऊन जाणं आणि इथिओपियन लोकांसमोर ते खाणं मला इष्ट वाटलं नाही. कारण मी काही कोण्या देशाचा वकील किंवा संयुक्त राष्ट्र संघटनेचा प्रतिनिधी नव्हतो.

हे सगळं मी विनोदानं लिहिलं खरं, पण प्रत्यक्षात ही परिस्थिती किती भीषण आणि हृदयद्रावक आहे त्याची मला जाणीव आहे. हे असं का होतं आहे, याचं विश्लेषण अनेकांनी केलं आहे. मलाही करता येईल. पण या परिस्थितीचं खूप विश्लेषण झालं असलं तरी परिस्थिती तशीच आहे. त्यामुळे असं विश्लेषण करीत राहणं हे किती अर्थशून्य आहे ते मला तीव्रतेनं जाणवतं. वाटतं, की माणसाचं मनुष्यत्व हाच त्याला मिळालेला शाप आहे, आणि मन कसं सुन्न होतं !

सुदैवानं या भीषण परिस्थितीतही काही देशांत शांतता आहे, स्थैर्य आहे. कासवाच्या गतीनं का होईना, पण प्रगती होत आहे. याचा अर्थ असा नव्हे, की तिथं दारिद्र्य नाही; संघर्ष नाहीत आणि त्यातून स्फोट होण्याचे धोके नाहीत. पण या गोष्टी कोठे नसतात? इंग्लंड-अमेरिकेतसुद्धा त्या सापडतात. तेव्हा या मागासलेल्या देशात त्या नसतील अशी अपेक्षा का करावी?

आफ्रिकेतला सर्वात संपन्न देश म्हणजे दक्षिण आफ्रिका. पण तिथं चार दिवसांतच माझ्या ध्यानात आलं, की परिस्थिती स्फोटक आहे. तिथले काळे लोक दरिद्री आहेत आणि आपल्या हातात सत्ता आली, पण आपली स्थिती अपेक्षेइतकी सुधारली नाही म्हणून ते अत्यंत अस्वस्थ आहेत. अधिकाधिक आक्रमक भूमिका ते घेऊ लागले आहेत. त्या देशांतले युरोपियन व हिंदी लोक आपल्यापेक्षा संपन्न आहेत हे त्यांना असह्य वाटू लागलं आहे. मला तर तिथं असं वाटलं, की मंडेलांचा जो विलक्षण प्रभाव त्यांच्यावर आहे त्यामुळेच ते स्वस्थ बसले आहेत; पण मंडेलांच्या नेतृत्वाखाली आपली प्रगती फारच सावकाश होत आहे असं त्यांना अधिकाधिक प्रमाणात वाटू लागलं आहे. मंडेलांबाबतचा असंतोष असाच वाढत गेला किंवा ऐंशींच्या जवळ गेलेले मंडेला निवृत्त झाले तर स्फोट होईल आणि त्यात दक्षिण आफ्रिका उद्‌ध्वस्त होईल अशी भीती मला तेव्हा वाटली आणि आताही वाटते.

दक्षिण आफ्रिकेच्या तुलनेत केनया हा देश खूपच दरिद्री आहे, मागासलेला आहे. पण तरी तिथं शांतता आहे, स्थैर्य आहे. तिथली लोकशाही अजून शाबूत आहे. तसं पाहिलं तर अस्वस्थ देशांनी तो घेरलेला आहे. खाली दक्षिणेला टान्झानिया आहे आणि पलीकडे धुमसणारा

दक्षिण आफ्रिका; तर वर उत्तरेला सोमालिया हा अखंडपणे यादवी युद्धात होरपळणारा देश आहे. त्याच्या शेजारी दुष्काळ आणि यादवी युद्ध यांनी कंगाल झालेला इथिओपिया आहे. आणखी पश्चिमेला सरकलं की वायव्येला आहे त्याच अवस्थेत असलेला सुदान आणि त्यांच्या खाली पश्चिमेला आहे एक काळी इदिअमिन या क्रूर, लहरी, हुकूमशहानं जिथं थयथयाट केला तो युगांडा. सुदैवानं पूर्वेला हिंदी महासागर आहे. त्यात फक्त निरुपद्रवी आणि अन्न पुरवणारे जलचर राहतात. इंग्रज त्या महासागरातूनच केनयात आले.

माऊ माऊ चळवळीच्या रक्तलांच्छित कालखंडानंतर स्वातंत्र्य मिळालं. अशा चळवळी ज्या देशात असतात, तिथं स्वातंत्र्य मिळाल्यावर बहुधा क्रूर हुकूमशाहीची स्थापना होते आणि आर्थिक व सामाजिक जीवनात अतिरेकी भूमिका घेतल्या जातात. परिणामतः कत्तली होतच राहतात आणि आर्थिक प्रगती खुंटते. पण केनयात तसं झालं नाही. जोमो केनयाटा हा बराच काळ या देशाचं नेतृत्व करीत होता आणि त्यानं या देशात शांतता, स्थैर्य आणि लोकशाही यांची जोपासना केली असावी. अर्थात इंग्रज व भारतीय नकोत अशी तीव्र संतापाची लाट तिथंही येऊन गेली.

एकंदरीत केनया हा देश प्रवास करण्यास योग्य आहे असं मला आढळून आलं आणि मी केनयाला जायचं ठरविलं. हल्ली इतर देशांत जाताना काही टोचून घ्याव लागत नाही; पण केनयाला जाताना मात्र पीतज्वराची इंजेक्शन मला आणि वासंतीला घ्यावी लागली. शिवाय मलेरियाच्या गोळ्या जाण्यापूर्वी दोन आठवडे, मग तेथल्या मुक्कामात आणि नंतर परतल्यावर दोन आठवडे घेणं इष्ट आहे असं सांगण्यात आलं. आणखी एक इशारा देण्यात आला तो पिण्याच्या पाण्याबद्दल. 'बाटली बंद पाणी विकत घ्या आणि तेच तिथं प्या' असा सल्ला प्रवासी कंपनीनं आम्हाला दिला.

युरोप-अमेरिकेत गेलो म्हणजे मोकळेपणानं आम्ही रस्त्यातून फिरतो. सिंगापूर, हाँगकाँग, चीन, जपान, ऑस्टेलिया, न्यूझीलंड या देशांतही रस्त्यांतून सुरक्षितपणे फिरता येतं. रशियात आता गुंडगिरी वाढते आहे आणि अमेरिकेतील शहरांत काही भाग वर्ज्य समजावे लागतात. आपण अगदी सुरक्षित आहोत असं वाटलं ते जर्मनी, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या देशांत. पण केनयात मात्र 'उगीच एकटेदुकटे हिंडू नका. मौल्यवान वस्तू आणि पैसे शक्यतो जवळ बाळगू नका,' असा मला इशारा देण्यात आला. मी ठिकठिकाणी हॉटेलात राहिलो. तिथंदेखील आवाराबाहेर जाऊ नका असं आम्हाला सांगण्यात आलं. अर्थात या हॉटेलांच्या आवाराबाहेर भीती होती ती मुख्यतः वन्य प्राण्यांची.

या इशाऱ्यामुळे आम्ही सावध झालो. पण प्रत्यक्षात परिस्थिती तितकी वाईट नसणार हे आम्हाला अनुभवानं माहित होतं. कारण प्रवास कंपन्या गरजेपेक्षा अधिक कडक इशारे देत असतात हे आम्हाला ठाऊक होतं. विपरीत काही होऊ नये आणि झालं तर जबाबदारी आपल्यावर येऊ नये, म्हणून त्या असं करतात.

एके काळी एअर इंडियाचा मला अभिमान वाटत असे व त्या कंपनीच्या विमानांनीच मी प्रवास करीत असे. आता मात्र त्या कंपनीच्या विमानांनी प्रवास करणं मी शक्य तितकं टाळतो. विमानं वेळेवर न सुटणं आणि कधी कधी रद्द होणं हे त्याचं एक कारण. शिवाय विमानाची देखभाल, त्यातील सेवा वगैरे यथातथाच असतात. हवाई सेविकांनी सुंदर असावं असा माझा आग्रह नसतो. ती सेविका पोत्यासारखी दिसणारी आणि गलथानपणे वावरणारी व किमान सौजन्यही न दाखविणारी असू नये, एवढीच माझी किमान अपेक्षा असते; पण ती देखील पुरी न करणाऱ्या सेविका काही वेळा मला एअर इंडियाच्या विमानात भेटलेल्या आहेत. म्हणून मी केनया एअरवेजच्या विमानानं प्रवास करायचं ठरवलं

पण तरी एअर इंडिआच्या तडाख्यातून मी पूर्णपणे सुटलो नाही. कारण या केनया एअरवेज कंपनीचं सहार विमानतळावरचं कामकाज एअर इंडियाच्या कर्मचाऱ्यांवरच सोपवलेलं होतं. त्यामुळे की काय कोण जाणे, सहार विमानतळावर आम्हा प्रवाशांना दोनदा रांगेत उभं राहावं लागलं. एकदा तिकीट देऊन बोर्डिंग कार्ड घेण्याकरता आणि एकदा कोणत्या आसनावर बसायचं त्याचा क्रमांक घेण्यासाठी.

केनया एअरवेज ही बरी असली तरी एकंदर बेताची होती. आत गेल्यावर तिथलं एकंदर वातावरण पाहून ही देखील सरकारीच असावी, असं मला वाटू लागलं. पण सेवा फारशा बऱ्या नसल्या तरी वागणुकीत सौजन्य होतं.

सुदैवानं विमानतळावर फारशी गर्दी नव्हती आणि विमानातही अनेक आसनं मोकळी होती. आठवड्यातून आफ्रिकन एअरवेजची तीनच उड्डाणं असूनदेखील अशी परिस्थिती होती. त्यावरून भारत आणि केनया या देशांत माणसांची फारशी ये-जा होत नसावी हे उघड झालं. जे प्रवासी होते त्यात युरोपियन फारसे नसावे, हे साहजिकच होतं. काळे आफ्रिकन लोक आणि भारतीय लोकच आमचे सहप्रवासी होते. केनयातले काळे लोक सामानाची प्रचंड ओझी घेऊन आलेले होते. आपले लोक युरोप-अमेरिकेला गेल्यावर जशी पूर्वी अधाशीपणाने खरेदी क रीत असत तशीच या लोकांनी भारतात केली होती. यावरून केनयात पुष्कळशा वस्तू मिळत नसाव्या किंवा तिथं बरीच महागाई असावी हे उघड होत होतं. मागास देशात बहुधा अशीच परिस्थिती असते. भारतात परवापर्यंत हीच स्थिती होती. पण आता पुष्कळशा वस्तू भारतात तयार होतात आणि फार महाग नसतात. त्यामुळे परदेशात गेल्यावर सोसासोसानं खरेदी करण्याचं प्रमाण कमी झालं आहे. पण तरी अजून लंडनला ऑक्सफर्ड स्ट्रीटवरून फिरताना खच्चून भरलेल्या पिशव्या घेऊन लटपटत चालणाऱ्या भारतीय बायका आढळतात. परदेशी गेलं आणि खूप खरेदी केली नाही तर त्यात कमीपणा आहे असं वाटणारे श्रीमंत भारतीय पुष्कळ आहेत.

विमानातले भारतीय मुख्यतः गुजराती होते. त्यातले बहुसंख्य केनयात स्थायिक झालेले होते. तिथला व्यापार आणि काही उद्योगही या गुजराती लोकांच्या हातात आहेत. विमानात पंजाबीदेखील होतेच. कारण कुठेही जाऊन धंदा करायची धडाडी त्यांच्यातही असते. या लोकांच्या उद्योजकतेचं आणि साहसी वृत्तीचं मला फार कौतुक वाटतं. धंदा करण्यासाठी ते जगाच्या पाठीवर कोठेही जायला तयार असतात. हे गुजराती आम्हा मराठी लोकांचे शेजारी. ते काय करतात ते आम्ही वर्षानुवर्षं पाहत आहोत. पण त्यांच्यापासून कांही शिकावं असं आमच्या मनातही येत नाही. त्या बाबतीत आम्ही आपले कोरडे ठणठणीत!

या गुजराती लोकांचं आणखी एक वैशिष्ट्य पुन्हा पुन्हा मला जाणवतं, परदेशात जाताना हा व्यापारी वर्ग आपल्या चालीरीती, धार्मिक समजुती, खाण्यापिण्याबाबतच्या सवयी आणि विधिनिषेध या सगळ्या गोष्टी बरोबर घेऊन जातो आणि हे सगळं सांभाळून जगाच्या पाठीवर जाऊन ते यशस्वीपणे व्यापार करतात. दक्षिणेकडे फिजीपासून उत्तरेकडे कॅनडापर्यंत जिथं जिथं मी गेलो तिथं तिथं हा गुजराती व्यापारी वर्ग मला आढळला. चिनी हे आशियातले उत्तम व्यापारी; पण हाँगकाँगमध्ये त्यांच्या शेजारी ठाण मांडून आमचे गुजराती, सिंधी आणि पंजाबी यशस्वीपणे व्यापार करताना आढळतात. इंग्लंडमध्ये आणि अमेरिकेत त्यांची कितीतरी दुकानं आहेत, मोटेल्स आहेत, उद्योग आहेत. धन्य त्यांची! पण नोकरी गेली म्हणजे ज्यांना उपास पडतात अशी आम्ही मराठी माणसं त्यांना तुच्छ लेखतो. एरवी हुशार असलेले आम्ही या बाबतीत मात्र आंधळे आणि मठ्ठ कसे, याचं मला आश्चर्य वाटतं.

विमानातला सेवक वर्ग आणि पायलटही कृष्णवर्णीय होता. ही

माणसं प्रसन्न, हसरी आणि मोकळ्या मनाची होती. त्यातुळे काही चुकलंमाकलं तरी त्यांचा राग येत नव्हता आणि एकंदरीत त्यांच्या सेवा काही वाईट नव्हत्या. पायलटची परीक्षा तो विमान कसा उतरवितो यावर असते आणि आमच्या या काळ्या पायलटनं नैरोबीला विमान इतकं छान अलगद उतरवलं, की मी म्हटलं, व्वा!

नैरोबीत पोचून जोमो केनयाटा विमानतळावर उतरायला आम्हाला सहा तास लागले. त्या वेळी माझ्या घड्याळात सकाळचे दहा वाजले होते. कारण मुंबईहून आम्ही पहाटे चार वाजता निघालो होतो. पण तेव्हा नैरोबीत मात्र सकाळचे आठच वाजले होते. कारण नैरोबी मुंबईच्या पश्चिमेला आहे.

विमानतळावरचे सारे व्यवहार काळे लोक सांभाळत होते. केवळ दुय्यम दर्जाचे नागरिक नव्हते. हा देश त्यांचा होता. ते आत्मविश्वासानं वावरत होते, हे पाहून मला फार समाधान वाटलं. कारण या काळ्या लोकांना मी यापूर्वी युरोप, अमेरिकेत पाहिलं होतं. तिथं गोऱ्या लोकांत हे काळे खड्यासारखे वेगळे दिसायचे. हे उपरे आहेत, दुय्यम दर्जाचे आहेत असं उगीचच जाणवायचं. इथं तसं वाटत नव्हतं.

विमानातून सरळ विमानतळाच्या इमारतीत जाता यावं अशी व्यवस्था तिथं होती; पण का कोण जाणे, आम्हाला मात्र शिडीवरून खाली मोकळ्या जागेत उतरावं लागलं व तिथून आम्ही विमानतळाच्या इमारतीत प्रवेश केला. अर्थात यात काही विशेष नव्हतं. कारण असा प्रसंग कधी कधी लंडनच्या हिथ्रो विमानतळावरदेखील माझ्यावर आला आहे. फरक इतकाच, हिथ्रोला विमानांची प्रचंड गर्दी असल्यामुळे तसा प्रसंग आला होता. इथं काही तशी गर्दी नव्हती.

विमानतळाच्या इमारतीत पासपोर्ट व व्हिसा यांच्या तपासणीसाठी जाताना वाटेत परकीय चलनाच्या बदल्यात केनयाचे क्षिलिंग देणारा एक बूथ होता. तिथं मी पटकन माझ्याजवळचे पन्नास डॉलर मोडले. दर डॉलरला अठ्ठावन्न क्षिलिंग मिळाले. यावरून मी अंदाज केला, की मागास देशांना ज्या बेसुमार चलनवाढीनं ग्रासलेलं असतं तिनं केनयालादेखील ग्रासलेलं असावं. पुष्कळदा विमानतळावर मिळणारा भाव बाहेर बँकेत मिळणाऱ्या भावापेक्षा कमी असतो, म्हणून मी थोडेच डॉलर तिथं मोडले होते. पण बाहेरही चलनाचा जवळपास हाच दर होता, असं आढळून आलं. याचं मला थोडंसं आश्चर्य वाटलं, पण ते सुखद!

उतारू थोडे होते. त्यामुळे पासपोर्ट तपासणी लवकर उरकली. त्यातून देशाचे शत्रू आत येऊन घातपात करायला टपले आहे, अशी भावनाही तेथे नव्हती. त्यापूर्वी मी मॉस्कोला गेलो होतो. स्टॅलिन अगर ब्रेझनेव्ह यांच्या कारकिर्दीत नव्हे, तर गोर्बाचोव्हच्या उदारमतवादी कारकिर्दीत, आणि भारत सरकानं पाठविलेल्या प्रतिनिधी मंडळाचा सदस्य म्हणून. पण तरी पासपोर्ट तपासणाऱ्या सैनिकी गणवेषातल्या माणसानं माझ्या पासपोर्टची बरीच तपासणी केली आणि मग जवळजवळ तीन मिनिटं तो नुसता रोखलेल्या नजरेनं माझ्याकडे पाहत राहिला. असं वाटत होतं, की ही नजर आपल्या अंगाला भोक पाडणार आहे. पहिल्यांदा मी अस्वस्थ झालो. पण मला अस्वस्थ करणं हाच त्याचा हेतू आहे, असं ध्यानात आल्यावर त्याच्यापलीकडे पाहत स्तब्ध उभा राहिलो. अखेर त्यानं मला जाऊ दिलं आणि मग हाच प्रयोग पुढच्या माणसावर केला. मला वाटतं, मी जर कोणी संशायास्पद माणूस असलो तर त्या नजरेनं गडबडून जाईन आणि ते उघडकीला येईल, असा त्याचा हिशेब असावा. रशियन राजवट किती संशयी होती आणि कडक होती त्याचं हे निदर्शक होतं. उलट लंडनच्या हिथ्रोला अगदी सहजपणे तपासणी उरकली जाते आणि तरी जो माणूस अडवला जायला हवा तो अडवला जातो.

मी हे सगळं सांगतोय अशासाठी, की प्रवासात लहान लहान

गोष्टींदेखील किती सांगून जातात, ते लक्षात यावं.

पासपोर्ट तपासणीनंतर कस्टमची सामानाची तपासणी. आम्ही तिथं गेलो तर एका गुजराती बाईचं सामान उपसाउपशी करून तपासलं जातहोतं. वाटलं, अरे बाप रे! आपल्यावर असा प्रसंग आला तर आपलं सामान पुन्हा बॅगेत भरायला बराच त्रास होईल. आमच्याजवळ अर्थात कर भरावा लागेल असं काहीच नव्हतं.

ती गुजराती बाई बिचारी सामान पुन्हा बॅगेत भरायचा प्रयत्न करीत असतानाचआमचं सामान त्यानं उचलून तपासणी टेबलावर ठेवायला सांगितलं.

मग त्यानं आम्हाला विचारलं. "ही तुमची नैरोबीला कितवी भेट?"

वासंती म्हणाली, "पहिलीच. आम्ही टुरिस्ट आहोत."


तेव्हा तो मोठ्यांन हसून म्हणाला. "आय सी.तुम्ही टुरिस्ट आहात. मग तुम्ही इथं कशाला थांबलात? चला, चला. तुमची तपासणी वगैरे काही नाही."

हातानं आम्हाला 'जा - जा' असं सांगत तो हसतच राहिला. आफ्रिकन माणसाचं ते मनमोकळं हसणं आता माझ्या परिचयाचं झालं होतं.

सामान घेऊन आम्ही पुढं सटकलो. जी कंपनी माझी पुढची व्यवस्था करणार होती तिचा प्रतिनिधी विमानतळावर आलाय का ते शोधक नजरेनं न्याहाळू लागलो.

पण मला फारसं इकडंतिकडे बघावंच लागलं नाही. समोरच एक आफ्रिकन बाई माझ्या नावाची पाटी घेऊन उभी होती. आम्हाला तिनं ओळख देण्यापूर्वीच ओळखलं आणि मनमोकळं हसून आमचं स्वागत केलं.

◆◆◆









## ब्रिटीश खुणा जपणारे नैरोबी

नैरोबीत खास पाहण्यासारखं असं काहीच नव्हतं आणि तशी माझी अपेक्षाही नव्हती. म्हणजे एक संग्रहालय होतं. एक सर्पक्षेत्र होतं, पण आफ्रिकन संस्कृतीचा काही मला सखोल अभ्यास करायचा नव्हता. तो विषय मोठा होता आणि वेळ थोडा होता. मी मद्रासजवळ एक उत्तम सर्पक्षेत्र बघितलं होतं. एरवी नैरोबी इतर अनेक आधुनिक शहरांसारखंच होतं. बँका, कंपन्या, मोठ्या शोरूम्स, खूप उंच इमारती, प्रशस्त रस्ते, त्यातून फिरणाऱ्या खूपशा मोटारी, त्यामुळे होणारी वाहतुकीची कोंडी, शासकीय इमारती, बराच बकाल भाग वगैरे वगैरे. सगळं अपेक्षित, नेहमी दिसणारं.

पण मी तरी मुक्कामासाठी मे फेअर कोर्ट हॉटेलमध्ये पोचेपर्यंत मी जे पाहिलं त्यानं बरंच काही सांगितलं. मुंबईच्या आसपास मैलन् मैल जसा कारखान्यांचा पसारा आहे तसा तिथे नव्हता. रस्त्यात लाल दिवा लागल्यावर गाडी थांबली, म्हणजे मुंबईप्रमाणेच भिकारी गाडीच्या खिडकीशी येत होते. मुंबईप्रमाणेच रस्त्यात मधून मधून कणसं भाजून विकणारे फेरीवाले होते, पण मुंबईप्रमाणे शहरात सर्वत्र गलिच्छ झोपडपट्ट्या नव्हत्या आणि मुंबईत जसे सर्वत्र उकिरडे दिसतात तसेही नव्हते. भारतीय शहरात जो गलिच्छपणा आणि ओंगळपणा बऱ्याचशा भागांत दिसतो, तसा नैरोबीत दिसत नव्हता. परकीय चलनाची खरेदी विक्री मोकळेपणानं करता येत होती. पोलिसांचा वावरही फारसा दिसत नव्हता.

शिवाय केनिया हा ब्रिटिश साम्राज्याचा भाग होता, याच्या खुणा सर्वत्र दिसत होत्या. दुकानाच्या पाट्या, रस्त्यांची नावं सगळी इंग्रजीत लिहिलेली होती. काही इमारतींचे चेहरेमोहरे मुंबईत, शांघायमध्ये अगर ऑस्ट्रेलियात दिसणाऱ्या इमारतींच्या चेहऱ्यामोहऱ्यासारखे होते. तिथल्या चलनाचं नाव होतं 'क्षिलिंग'.

पण एका बाबतीत चित्र जरा वेगळं दिसलं. भारतात अजूनही रस्त्यात पारंपारिक भारतीय वेषभूषा केलेली माणसं दिसतात. साडी नेसलेल्या अगर पंजाबी पोषाख केलेल्या, भारतीय दागिने वापरणाऱ्या स्त्रिया दिसतात. धोतर नेसलेली आणि मुंडासं बांधलेली माणसं दृष्टीस पडतात. नैरोबीत मात्र सगळ्या स्त्री-पुरुषांचे पोषाख पाश्चात्य होते. पुरुष शर्ट-पँटमध्ये होते आणि बायकांनी झगे घातले होते. मी चौकशी केली तेव्हा कळलं की बहुधा सगळे ख्रिस्ती होते. तिथल्या मूळच्या धार्मिक परंपरा ख्रिस्ती धर्माला तोंड देऊ शकल्या नव्हत्या.

मी आणखी प्रश्न विचारले, तेव्हा कळलं, की केनियातले लोक कॅथॉलिक पंथाचे होते. हे ऐकून मात्र मला आश्चर्य वाटलं. इंग्रजांचं जिथे जिथे राज्य होतं, तिथे तिथे मुख्यतः प्रॉटेस्टंट पंथाचा प्रसार झालेला होता. भारतातदेखील पोर्तुगीज अमलाखालच्या प्रदेशातच कॅथॉलिक अधिक प्रमाणात दिसतात. बाकी प्रॉटेस्टंटच आहेत. केनियात मात्र बहुसंख्य लोक कॅथॉलिकच दिसतात. याला काही ऐतिहासिक कारणं जरूर असली पाहिजेत, पण मी अधिक खोलात जाऊन त्यांची चौकशी केली नाही.

मे फेअर कोर्ट हॉटेल हे नावच सांगत होतं, की ते इंग्रजी राजवटीत बांधलं गेलं होतं आणि त्याची रचना व प्रशस्त आवार ब्रिटिश साम्राज्यात इंग्रज राज्यकर्ते व व्यापारी वगैरे कसे राहत असत त्याचं निदर्शक होतं. आवार कितीतरी प्रशस्त होतं आणि त्यात अनेक छोट्या छोट्या एकमजली इमारती बांधलेल्या होत्या. त्यांना जोडणारे अरुंद रस्ते बांधून काढलेले होते आणि त्यावर दोन पाखी कौलारू छपरं होती. इमारतींच्या भोवतालच्या आवारात छोटे छोटे बगीचे होते आणि आवाराच्या एका बाजूला गाड्या उभ्या करायला भरपूर जागा होती. खोल्यांची खिडक्या-दारं जुन्या ब्रिटीश वळणाची काचेची होती. थोडक्यात म्हणजे, जुन्या काळात आपल्या वसाहतींत इंग्रजांची जी आरामशीर ऐसपैस राहणी होती तिला साजेसं ते हॉटेल होतं.

आजच्या बदललेल्या परिस्थितीत हॉटेलचं ते रूप जाणीवपूर्वक कायम ठेवण्यात आलं होतं. बाकी सगळ्या आजच्या पंचतारांकित हॉटेलातल्या सुखसोयी तिथं होत्या. पोहोण्याचा एकच नव्हे तर दोन तलाव होते. टेलिफोन, फॅक्स, प्रत्येक खोलीत दूरचित्रवाणी संच हे सगळं काही होतं. पण जुन्या काळच्या राहणीची चव हॉटेलात राहणाऱ्यांना मिळावी असा प्रयत्न होता आणि लोकांना ती चव हवी होती, असं दिसलं. कारण बरीच माणसं तिथे राहत होती. युरोपियन बरेच होते, पण आफ्रिकन आणि भारतीयदेखील होते. इतर पंचतारांकित हॉटेलात चालतात तशी एक 'बिझिनेस कॉन्फरन्स' ही तिथे चालली होती. त्यातले लोक बाहेर पडले तेव्हा त्यात गोऱ्या लोकांबरोबर कृष्णवर्णीय आफ्रिकनही होते. आधुनिक कंपन्यांचा वरिष्ठ चालकवर्ग जसे कपडे घालतो, तसेच त्या लोकांनीही घातले होते आणि उद्योगधंद्याबद्दल ते आधुनिक व्यवस्थापनाच्या भाषेत बोलत होते. बोलण्या-चालण्याची ढब, आत्मविश्वास सगळं तसंच गोऱ्या लोकांच्या बरोबरीनं त्यांनी असं वावरावं यात आश्चर्य काहीच नव्हतं. कारण देश त्यांचा होता, तरी पण ते पाहून मला कौतुक वाटलं. आनंद झाला.

नंतर मला कळलं, की केनियातले मोठे उद्योग आणि व्यापार अजूनही इंग्रजांच्या हातात आहेत आणि त्यांच्या खालोखाल भारतीय माणसांचा त्या क्षेत्रात प्रभाव आहे. ज्या 'ॲक्रॉस आफ्रिका सफारी' कंपनीनं माझ्या प्रवासाची व्यवस्था केली होती ती व्होरा नावाच्या पंजाबी माणसाच्या मालकीची होती. आणि ज्या उत्तम पंचतारांकित हॉटेलात मी नंतर ठिकठिकाणी राहिलो ती देखील बहुतेक याच व्होरा कुटुंबाच्या मालकीची होती.

इतर काही आफ्रिकन देशांनी स्वतंत्र झाल्यानंतर युरोपियन व भारतीय व्यापाऱ्यांना हाकलून काढलं होतं. त्यांचे कारखाने व धंदे आपल्या ताब्यात घेतले होते. काही ठिकाणी तर सरकारनंच सारी अर्थव्यवस्था आपल्या ताब्यात घेतली. आता आपण आनंदानं जगू, असं त्यांना वाटत होतं; पण प्रत्यक्षात कारखाने व धंदे चालवणं त्यांना जमेना. त्यामुळे उत्पादन घटलं. व्यापार थंडावला. दुष्काळ व उपासमार यांना तोंड द्यावं लागलं. त्यानं हजारो मरण पावले. एकमेकांच्या कत्तलीत आणखी काही मरण पावले. अखेर अनेक वर्षं हे सगळं भोगल्यावर त्या लोकांना उपरती झाली आणि युरोपियन व भारतीय कारखानदारांना त्यांनी पुन्हा आपल्या देशात बोलावलं. त्यांनी घातलेल्या सगळ्या अटी मान्य केल्या. शेजारच्या

युगांडात आणि अन्य देशात हा प्रकार झाला.

केनियातल्या कृष्णवर्णीयांनी मात्र असा वेडेपणा केला नाही. त्यांनी युरोपियन व भारतीय लोकांना केनियात राहायला व व्यापार वगैरे करायला मोकळीक दिली. त्यामुळे केनियातल्या लोकांना आर्थिक व अन्य आपत्तींना तितक्या प्रमाणात तोंड द्यावं लागलं नाही. या गोष्टींचं श्रेय आहे मुख्यत: जामो केन्याटा या त्यांच्या नेत्याला. माऊ माऊ चळवळीच्या रक्तलांछित कालखंडानंतर इतका समंजसपणा दाखवणं सोपं नव्हतं, पण ते केन्याटानं केलं.

अर्थात केन्याटा कितीही समंजस असले तरी त्यांना एकट्यांना हे जमलं नसतं. केनियातल्या बहुसंख्य लोकांनी या समंजसपणात त्यांना साथ देणं आवश्यक होतं. सुदैवानं ज्या किकुयु जमातीतील ते होते, त्या जमातीतले लोकही समंजस होते व आहेत. कृष्णवर्णीय आफ्रिकन लोकांत दुर्मिळ अशी शेती करण्याची परंपरा त्यांच्यात आहे. त्यामुळे समंजसपणे कायदे व नियम पाळून सहकार्यानं एकत्र नांदण्याची त्यांना सवय आहे आणि केनयातल्या लोकसंख्येपैकी जवळजवळ निम्मी या किकुयु लोकांची आहे. त्यामुळे हे समंजस धोरण त्यांनी स्वीकारलं व चालू ठेवलं.

दक्षिण आफ्रिकेत नेल्सन मंडेला हा अत्यंत शहाणा व समंजस नेता सत्ताधारी आहे. त्यानं असंच समंजस धोरण स्वीकारलं आहे, पण तिथले लोक ते कितपत चालू ठेवतील याची शंकाच आहे. त्यांच्या आक्रमक वृत्तीमुळे शेकडो सुशिक्षित व कुशल लोक देश सोडून जात आहेत. त्यांनी जाणं आपल्या हिताचं नाही, त्यांना थांबवायलाच हवं, असं मंडेला म्हणत आहेत, पण त्याचा काही परिणाम होत नाही. ते जातच आहेत. सुदैवानं केनियात अशी परिस्थिती नाही. अतिरेकीपणामुळे उद्ध्वस्त होणाऱ्या आफ्रिका खंडातले केनिया हे एक ओॲसिस आहे.

अर्थातच, केनियातल्या लोकांना उद्योगधंद्याच्या क्षेत्रात स्थान मिळावं असा प्रयत्न चालू आहे. परदेशातल्या नागरिकांच्या उद्योगात त्यांना भागीदारी द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. अर्थात हे परदेशी नागरिक जर केनियाचे नागरिक झाले, तर मग त्यांना असं करावं लागत नाही. यामुळे अनेक भारतीयांनी केनियाचं नागरिकत्व स्वीकारलं आहे.

हॉटेलात पोचल्यावर ॲक्रॉस आफ्रिका सफरीचं प्रतिनिधित्व करणाऱ्या बाईनं आम्हाला आवश्यक त्या सूचना दिल्या. त्यातली एक होती, 'एकटंदुकटं न फिरण्याची!' नैरोबीत सुद्धा काही ठराविक भागांतच फिरा. मौल्यवान गोष्टी, पासपोर्ट वगैरे बरोबर घेऊन फिरू नका, असं तिनं सांगितलं. 'बाहेरचं पाणी पिऊ नका' असंही तिनं सांगितलं. अर्थात मला हे काही पटलं नाही. मी भारतात गावोगावी फिरतो. तिथलं पाणी पितो. त्यामुळे सर्व प्रकारचे जंतू पचवायची मला सवय आहे. तेव्हा मला पाण्याच्या बाबतीत फार काळजी घेण्याची गरज नाही. युरोप-अमेरिकेतल्या लोकांनी वाटलं तर बाटलीतलं पाणी प्यावं असं माझं मत आहे. पण तिनं पुन्हा पुन्हा सांगितलं तेव्हा आम्ही बाटलीतलं पाणी प्यायचं मान्य केलं.

त्यावर तिनं आणखी एक सल्ला दिला. ती म्हणाली, ''ठिकठिकाणी तुम्ही हॉटेलमध्ये जर हे पाणी विकत घेतलंत तर तुम्हाला एका बाटलीचे दोन-तीन डॉलर सुद्धा द्यावे लागतील. पण तुम्ही बाहेर पाणी घेतलंत तर तुम्हाला दहा डॉलरला बारा बाटल्या मिळतील.''

हे ऐकल्यावर मला धक्काच बसला. भारतात बिसलेरी पाण्याची बाटली बाजारात सात रुपयाला तर पंचतारांकित हॉटेलात वीस रुपयाला मिळते, असा माझा अनुभव होता. पण केनियात बाजारात देखील बाटलीला आदमासे पस्तीस रुपये द्यावे लागणार होते आणि हॉटेलात तर साठ-सत्तर रुपये. बाप रे! आम्ही म्हटलं, ''मग, आम्ही इथे बाजारातच पाण्याच्या बाटल्या विकत घेतो.'' त्या कुठे मिळतील, ते ती आम्हाला सांगू लागली. पण माझ्या मनात असा विचार आला की, कुठे दुकान शोधत हिंडा. पुन्हा

ते डझनभर बाटल्यांचं ओझं हॉटेलात आणायचं कसं, हा प्रश्नच होता. म्हणून आम्ही तिला सांगितलं, "हे दहा डॉलर घे आणि तूच त्या बाटल्या विकत घे आणि उद्या आम्हाला न्यायला येणाऱ्या गाडीतून पाठवून दे."

नैरोबीत माझ्या मुलाचा एक मित्र आहे. त्याचा टेलिफोन नंबर त्यानं मला पाठवला होता. त्या नंबरावर मी फोन केला. तेव्हा त्यानं सांगितलं, "तुम्हाला भेटण्यासाठी म्हणून आम्ही इथल्या काही मराठी मंडळींनी एक कॉकटेल पार्टी करायचं ठरवलं आहे. तिला तुम्ही या. संध्याकाळी मी येईन आणि तुम्हाला घेऊन जाईन. पार्टी झाली, की आमच्यापैकी कोणीतरी तुम्हाला हॉटेलवर पोचवेल".

"वा ! इथल्या मराठी मंडळींना भेटावं असं माझ्या फार मनात होतं," मी हसून म्हटलं.

आम्ही थोडी विश्रांती घेतली. अंघोळ वगैरे आन्हिकं उरकली आणि जरा पाय मोकळे करावे आणि थोडंसं तरी शहर पाहावं म्हणून बाहेर पडलो.

आपल्याकडे सर्वत्र दिसतात तशी रिकामटेकडी माणसं रस्त्यात मधूनमधून दिसत होती, पण एक कणसं भाजून विकणारा सोडला तर फेरीवाले कोणी दिसले नाहीत. चालत चालत एका मोठ्या चौकात आम्ही पोचलो. तिथे रहदारी बरीच होती, पण वाहतूक नियंत्रक दिवे मात्र नव्हते. आता रस्ता ओलांडावा कसा, हा जरा प्रश्नच पडला. कारण चोहोबाजूंनी सारख्या गाड्या येत होत्या. पण मुंबईकर असल्यामुळे वाहनं चुकवीत दोन रस्ते ओलांडले. तिसरा ओलांडताना अंदाज चुकला आणि एक गाडी अंगावर येईल असं वाटलं. त्यामुळे मी गोंधळून मागे जाऊ लागलो. तेव्हा गाडी चालवणाऱ्या आफ्रिकन माणसानं गाडी थांबवली आणि हात हलवून 'रस्ता ओलांडून जा' असं तो मला सांगू लागला. असा अनुभव युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया वगैरे ठिकाणी आलेला आहे; पण मुंबईत जर तो येत नाही तर या मागास देशात कसा येईल, असं मला वाटत होतं, पण माझा अंदाज चुकीचा ठरला. मला वाटल की कदाचित हा अनुभव अपवादात्मक असेल, पण पुढेही प्रवासात मला असं आढळून आलं, की ही माणसं एकमेकांशी अगदी रस्त्यावरच्या भिकाऱ्यांशीदेखील सौजन्यानं वागतात. इतर बाबतीत जरा हे लोक आपल्यापेक्षा मागासलेले वाटले तरी सौजन्याच्या बाबतीत चार पावलं पुढेच आहेत. अर्थात मी बोलतोय फक्त केनियाबद्दल. इतर आफ्रिकन देशात काय परस्थिती आहे, त्याची मला कल्पना नाही.

चौक ओलांडून आम्ही एका दिशेनं चालू लागलो. तिथे वस्ती बकाल आहे, असं दिसलं म्हणून आम्ही मागे वळून दुसऱ्या दिशेनं चालू लागलो. थोडं चालल्यावर ज्या शॉपिंग सेंटरबद्दल आम्हाला सांगण्यात आलं होतं तिथं आम्ही जाऊन पोचलो. नाना प्रकारची दुकानं तिथं होती. एका अत्यंत प्रशस्त जागेत तर मोटारी विकायला ठेवलेल्या होत्या. त्यातली एक होती फ्रेंच बनावटीची प्यूजिओ. पण जवळच टेल्कोची छोटी मालवाहू ट्रक आणि महिंद्रची जीप आढळली. तेव्हा भारतीय मालाला परदेशी बाजारपेठेत स्थान आहे हे पाहून बरं वाटलं. कारण सामान्यतः अनुभव असा, की अगदी जवळच्या मॉरिशसमध्ये देखील बाजारात चीनचा किंवा अन्य आशियाई देशांचा माल दिसतो. दक्षिण आफ्रिकेचासुद्धा माल दिसतो, पण भारतीय मात्र दिसत नाही. खरं म्हणजे जगात कुठच्याच बाबतीत भारताला फारशी किंमत नाही, असं आढळून येतं.

मात्र हा माझा आनंद फार काळ टिकला नाही. कारण नंतर आमच्या गाडीच्या ड्रायव्हरनं महिंद्रच्या जीपची थट्टाच केली.

आपल्या देशात अजून छोट्या छोट्या दुकानांचेच वर्चस्व आहे. मुंबईतही पाश्चात्य धाटणीची सुपर मार्केट शोधावी लागतात. इथे मात्र या छोट्या बाजारपेठेत आम्हाला एक सुपर मार्केट आढळलं, तेव्हा आम्ही

आत जाऊन तिथला माल आणि त्या मालाची किमती न्याहाळून पाहिल्या. असं चौकसपणे पाहिलं, की या देशातले लोक नित्याच्या जीवनात कोणत्या गोष्टी वापरतात आणि त्यांच्या किमती काय असतात ते कळलं.

या सुपर मार्केटमध्ये अन्नधान्य, किराणा माल, स्वयंपाकघरातील भांडीकुंडी, कप बश्या, ग्लास वगैरे काच सामान होतं, पण घरगुती वापराची मिक्सर वगैरे यंत्र आढळली नाहीत. कदाचित ती विकण्याची वेगळी व्यवस्था असावी.

तिथल्या वस्तूंच्या किमती मात्र फारच होत्या. अर्थात क्षिलिंगमधल्या किमतीचं रुपयात व डॉलरमध्ये रूपांतर करून आम्ही तुलना करीत होतो आणि हा देश फार महागडा आहे असं आम्हाला आढळून येत होतं. इतर वस्तूच्या किमतीबाबत वासंतीला अधिक माहिती होती, पण कॅमेऱ्याची फिल्म वगैरे गोष्टींच्या किमती मला माहीत होत्या. त्यामुळे माझ्या कॅमेऱ्यासाठी लागणाऱ्या फिल्मची किंमत १२०० क्षिलिंग म्हणजे वीस डॉलरहून अधिक आहे, हे पाहून मी हबकूनच गेलो आणि पुरेशा फिल्म्स आपण बरोबर आणल्या आहेत, याचाा मला आनंद वाटला.

परदेशी मालाच्या किमती जास्त असाव्यात हे समजू शकत होतं, पण केनियात होणारा चहा देखील महाग आहे, हे पाहून मात्र असं ध्यानात आलं, की इथे चलनवाढ बेसुमार झाली आहे आणि लोकांना हालअपेष्टांत दिवस काढावे लागत असावेत. जर्मनीदेखील अत्यंत महागडा देश आहे. पण तिथल्या लोकांचे पगार देखील तसेच भक्कम आहेत. त्यामुळे ते चांगलं सुखवस्तू जीवन जगतात. पण केनियातल्या लोकांचे पगार बेताचेच होते आणि तिथे मोठ्या प्रमाणावर बेकारी आहे, असं चौकशी केल्यावर आम्हाला कळलं.

हॉटेलात परतताना मी एक वृत्तपत्र विकत घेतलं. त्याचं नाव 'नेशन'. त्याची किंमत होती २० क्षिलिंग म्हणजे अदमासे बारा रुपये. बाप रे ! वृत्तपत्राला जाहिराती नसल्यामुळे ते महाग आहे की काय, असं मला वाटलं. म्हणून ते चाळलं तर त्याला भरपूर जाहिराती आहेत असं आढळून आलं. मग किमती जास्त असण्याचं एकच कारण संभवत होतं, ते म्हणजे वृत्तपत्राच्या कागदाची महागाई. त्या बाबतीत मी अधिक खोलात गेलो नाही, पण माझ्या मनात आलं, की केनियात लोकशाही आहे. तेव्हा तिथे लोकशाहीचे आधारस्तंभ असेलेली वृत्तपत्र इतकी महाग असणं बरं नाही.

हॉटेलमध्ये परतल्यावर भोजन करायचं आणि मग बिछान्यात पडून वृत्तपत्र वाचायचं असं मनात होतं. पण विमानात रात्रभर जागरण झालं होतं. त्यामुळे जेवण झाल्यावर गाढ झोप लागली. जागे झाल्यावर आम्ही हॉटेलच्या केवढ्या तरी मोठ्या आवारात फेरफटका मारला. तेथील बगीच्यातला एक कोपरा चीनमधल्या बागांची आठवण करून देणारा होता. असं असावं याचं मला आश्चर्य वाटलं, गंमत वाटली. बाकीचा बगीचा कुठंही असतो तसाच होता, पण तिथे इंग्लंडमधील वृक्ष आणून मारून मुटकून लावलेले नव्हते. तेथले वृक्ष केनियातलेच होते. त्यातल्या त्यात आमचं लक्ष वेधून घेतलं ते दोन प्रचंड वृक्षाएवढ्या निवडुंगांनी. कवेत मावणार नाही एवढे त्यांचे बुंधे होते. पुढे प्रवासात अशी निवडुंगं आम्हाला पुष्कळ दिसली.

बगीच्यात फेरफटका मारल्यावर आम्ही पोहोण्याच्या तलावाजवळ बसून चहा घेतला. चहाला इतका चांगला स्वाद होता म्हणता; हा चहा केनियाच्या चहाच्या मळ्यातला होता. केनियातल्या मुक्कामात असाच उत्तम स्वाद असलेला चहा आम्ही पीत होतो. तो चहा पिताना मला बऱ्याच वर्षापूर्वी हाँगकाँगमध्ये प्यायलेल्या चहाची आठवण झाली. त्याचा स्वादही अप्रतिम होता. तो कुठला असे मी विचारलं. तेव्हा तो सिलोनमधला, असं मला सांगण्यात आलं होतं.

हॉटेलमधला सेवकवर्ग अतिशय चांगला होता. प्रामाणिक आणि तत्परतेनं कामं करणारा, सगळे पाश्चात्य शिष्टाचार उत्तम प्रकारे जाणणारा आणि पाळणारा. सौजन्यानं, नम्रपणे वागणारा.

पंचतारांकित हॉटेलात एक नव्या वळणाचा सेवकवर्ग निर्माण झाला आहे, पण इंग्रजी राजवटीतल्या सेवकवर्गाची जी खास वेगळी शान होती ती या वर्गाला नाही.

ठरल्या वेळी माझ्या मुलाचा मित्र शरद राव आला आणि आम्हाला कॉकटेल पार्टीसाठी श्री. नाडकर्णी यांच्याकडे घेऊन गेला. राव केनियात आणि अन्य देशातही वकिली करतो. सध्या तो राहतो हॉटेलमध्ये. त्याच रात्री तो विमानानं हॉलंडला जाणार होता. अशी सगळी घाई असूनही त्यांन आमच्यासाठी ही पार्टी घडवून आणली होती.

पार्टीला सात-आठ मराठी कुटुंबं आली होती. बहुतेक बँका, विमा कंपन्या वगैरे ठिकाणी मोठ्या पदांवर होते. मराठी मंडळाचे तरुण अध्यक्षही तिथे आले होते. आमचं त्यांनी अत्यंत आपुलकीनं स्वागत केलं. सौ. नाडकर्णींनी पार्टीसाठी इतके वेगवेगळे पदार्थ केले होते, की ते जेवण नसूनही दोन जेवणांचा ऐवज पोटात गेला. गप्पागोष्टी खूप रंगल्या. मी एक विनोदी कथा सांगितली. त्यामुळे मंडळी खूष झाली.

मराठी माणसांच्या बाबतीत नेहमी जे आढळून येतं ते यांच्या बाबतीतही आढळून आलं. उद्योगधंद्याच्या क्षेत्रात जबाबदारीची, कौशल्याची कामं ते करीत होते. पण त्यापैकी कोणाचाही स्वतःचा धंदा नव्हता. सगळे नोकरीनिमित्त तिथे आले होते आणि बदली अगर निवृत्तीनंतर परत जाणार होते. नाही म्हणायला एक गृहस्थ मात्र म्हणाले, की मी आता इथेच राहाणार. त्यांनी केनियाचं नागरिकत्व स्वीकारलं होतं.

अशी दोन-तीनशे तरी मराठी कुटुंब नैराबीत होती. आणि आपलं मराठी मंडळ हौसेनं चालवीत होती. गणपती उत्सव, दिवाळी वगैरे साजरी करत होती.

हे सगळं छान होतं, पण नेहमीप्रमाणे एक गोष्ट मनात खुपली. इतके इतर भारतीय केनियात स्वतःचे धंदे उभे करून भरपूर कमाई करत असता मराठी माणसं मात्र नोकऱ्या करण्यातच समाधान मानत होती.

इतरांप्रमाणे या मंडळींनीदेखील एकटेदुकटे लांब कुठे जाऊ नका, पासपोर्ट, मौल्यवान गोष्टी घेऊन तर मुळीच जाऊ नका असा सल्ला दिला.

आम्ही हॉटेलात पोचलो तेव्हा रात्रीच्या वेळी कडक सुरक्षा व्यवस्था जारी होती. हॉटेलच्या दारात, आवारात रखवालदार पहारा करीत होते.

अमेरिकन शहरांच्या काही भागात भरदिवसा जरी मोटारीतून हिंडलं तरी भीती वाटावी, असं वातावरण होतं. तसं काही इथं दिसत नव्हतं. मग इतकी दक्षता का, ते मला कळेना. खरं म्हणजे परत येईपर्यंत ते कळलंच नाही.

◆ ◆ ◆



*देखणेपण देखील धडकी भरणारं.*



*साक्षात उग्रतेच्या पोटातून झरतय वात्सल्य.*



## वृत्तपत्रातून दिसलेला केनिया

नाश्ता घेऊन सकाळी आठला तयार राहा असं ॲक्रॉस आफ्रिका सफारीच्या ज्यूडीनं सांगितलं होतं. आठ वाजता कॉम्बी घेऊन जोसेफ नावाचा ड्रायव्हर-गाइड येणार होता. त्या कॉम्बीत बसून आम्ही निघायचं होतं. पुढचे नऊ दिवस तो आमची सर्व प्रकारची व्यवस्था करणार होता. कॉम्बी चालवून मुक्कामावर नेणार होता, व्हाउचर दाखवून आमची हॉटेलात व्यवस्था करणार होता. मोटारीतून आम्हाला जंगलात फिरवून सगळे प्राणी दाखवणार होता आणि असं चार ठिकाणी फिरवून आम्हाला नैराबीत परत आणून विमानतळावर सोडणार होता. एकंदरीत हा जोसेफ कसा होता त्यावर आमचा प्रवास सुखकारक होणं आणि योजलेलं सगळं पाहायला मिळणं अवलंबून होतं.

बरोबर आठ वाजता जोसेफ कॉम्बी घेऊन हजर झाला आणि आम्ही निघालो.

कॉम्बी म्हणजे एक अतिशय दणकट गाडी होती. पुढे नऊ दिवस एके काळी अस्तित्वात असलेल्या, तसंच मुळीच अस्तित्वात नसलेल्या रस्त्यावरूनही शेकडो किलोमीटर प्रवास आम्ही केला. या प्रवासात आमच्या 'कॉम्बी' वर अनेक रोमहर्षक आणि थरारक प्रसंग गुदरले. फुटभरदेखील खोल असलेल्या रस्त्यावरच्या खड्ड्यात दणकन कोसळायचं, मग नेट लावून बाहेर येऊन दुसरा खड्डा सफाईनं चुकवायचा आणि नंतर तिसऱ्या खड्ड्यात एकच चाक दणकायचं हा प्रकार तर नित्याचाच झाला होता. एक चाक थोड्या फार शिल्लक असलेल्या रस्त्यावर आणि दुसरं चाक फुटभर किंवा अधिक खोल असलेल्या लगतच्या चरीत अशा कलंडत्या अवस्थेत कित्येक किलोमीटर ती थडथडत धावली, पाणथळीतून जाताना चिखलात रुतली आणि आटापिटा करून त्यातून बाहेर पडली. पुढे चाललेल्या ट्रकनं अगर गाडीनं उडवलेल्या धुळीच्या दाट अपारदर्शक पडद्यातून ती पलीकडे गेली. दोन-तीन फूट उंच गवतातून तिनं पळणाऱ्या बिबट्या वाघाचा पाठलाग केला. त्या गवतात मध्येच जो एक दगड होता त्यावर आदळून ती हवेत उडाली. आणि पुन्हा जमिनीवर आदळून जणू काही झालंच नाही अशा थाटात की तिनं पाठलाग चालू ठेवला. रोंरावत गेंड्याच्या शेजारून ती धावली. पाच हत्ती चिखलाची आंघोळ करीत असता तिनं त्यांच्याजवळ जाऊन स्वतःलाही चिखलाची आंघोळ घडवली. रानरेड्यांना धडक द्यायची तयारी तिनं दाखवली आणि हे सगळं करताना आम्ही दोघं आणि आमचे मुठीत धरलेले जीव तिनं सुरक्षित ठेवले. हे

कर्तृत्व गाजवताना तिचं इंजिन कधी बंद पडल नाही. इतकंच नव्हे, तर कोणतीही कुरकुर अगर खडखड त्यानं केली नाही. ते कधी फार गरम झालं नाही. अगर थंड पडून त्यानं सुरू व्हायला नकारही दिला नाही. तिचा ॲक्सल तर कधी तुटला नाहीच; पण तिच्या स्प्रिंगही गचका बसल्यावर निकामी झाल्या नाही. अश्वत्थामा जसा चिरंजीव होता तसे तिचे टायरही चिरंजीव होते. 'नैन छिन्दन्ति शस्त्राणि, नैनं दहति पावकः।' हे वर्णन त्यांना लागू पडणारं होतं. फुटणं हा काचांचा स्वभावधर्म. पण तिच्या काचा फुटल्या तर नाहीतच; पण त्यांना तडादेखील गेला नाही. आज्ञा मिळताच क्षणार्धात तिचे हेडलाइट झगझगीत प्रकाश पाडत होते. आणि मला अशी शंका येते, की पेट्रोल नसतानादेखील ती तास-दोन तास चालत असावी.

नऊ दिवसांत तिनं एकच गोष्ट केली नाही. ती झाडावर झोपलेल्या बिबट्या वाघाकडे आम्हाला निरखून पाहता यावं म्हणून त्या झाडावर चढली नाही. अर्थात, आमचा तसा आग्रहही नव्हता. कोणी सांगावं! आम्ही तसा आग्रह धरला असता तर ती झाडावर चढलीदेखील असती!

भारतातल्या रस्त्यांची अवस्था पाहता भारतात गरज आहे ती अशा दणकट गाड्यांची; पण आमच्या देशात अधिकाधिक प्रमाणात बनवल्या जात आहेत त्या मात्र अतिशय नाजूक गाड्या. माझा एक मित्र सांगत होता, की त्यानं हातानं एक बुक्का मारला तर त्याच्या गाडीला पोचा आला.

या कॉम्बीत ड्रायव्हर सोडून आणखी दहा माणसं बसायची सोय होती. ड्रायव्हरच्या शेजारी दोन जागा होत्या. त्याच्या मागच्या रांगेत तीन होत्या. त्यामागच्या रांगेत दोन होत्या आणि त्याच्याही मागे तीन होत्या. मागच्या एका रांगेत दोनच जागा एवढ्यासाठी होत्या, की तिच्या मागच्या रांगेत जायला रस्ता असावा.

या कॉम्बीचं छप्पर सगळंच्या सगळं दोन फूट उचलायची सोय होती. ते उचललं, की कॉम्बीतल्या लोकांना आत उभं राहत जंगलातली जनावर पाहता येत होती. ही सोय फारच चांगली होती. फक्त मला भीती इतकीच वाटली, की असा मी पाहत असताना एखाद्या रागीट सिंहानं माझ्यावर झडप घातली किंवा हत्तीनं आत सोंड घालून वासंतीला उचलून नेलं तर काय करायचं? कारण या प्राण्यांना अडवायला काच, जाळी वगैरे काहीच तिथं नव्हतं.

ही दुष्ट शंका मी काही बोलून दाखवली नाही. म्हटलं, मला जो धोका आहे तो जोसेफलादेखील आहे; पण नंतर असं लक्षात आलं, की त्याच्या डोक्यावरचा छप्परचा भाग उघडत नव्हता आणि तो उभा राहून जनावरं पाहणारही नव्हता. तेव्हा मात्र ही शंका एकदा विचारून टाकलेली बरी, असं मला वाटलं. पण त्यामुळे मी घाबरलो आहे असं दिसून आलं असतं आणि पुरुषांनी घाबरायचं नसतं, शूरपणानं वागायचं असतं, अशी अपेक्षा करणं रास्त आहे का? बरं, तरी पण ती केली जाते हा मोठाच अन्याय नाही का? एखादी पुरुषमुक्ती संघटना काढून त्या अन्यायाला तोंड फोडणं आवश्यक आहे.

सुदैवानं स्त्रियांकडून अशी अपेक्षा केली जात नाही आणि मनात अशी शंका आली, की बोलून दाखविल्याशिवाय बायका कधी राहात नाहीत. तेव्हा वासंतीनं ही शंका जोसेफला बोलून दाखवली. तो हसून म्हणाला, ''मुळी घाबरू नका. ते प्राणी असं काहीही करणार नाहीत''.

आम्ही पहिल्यांदा जाणार होतो 'शाबा नॅशनल रिझर्व्ह' मध्ये. त्या संरक्षित अरण्यातली वनचरे आम्ही पाहणार होतो; पण ते संरक्षित जंगल नैरोबीपासून चांगलं ३५२ किलोमीटर दूर होतं आणि तिथं जायला आम्हाला तब्बल सहा तास लागणार होते. इतका वेळ मोटारीचा प्रवास करणं काही सुखकारक नसतं; पण नुकताच मी मुंबई ते सांगली आणि

सांगली ते मुंबई असे दहा-दहा तासांचे प्रवास जवळजवळ लागोपाठ केले होते. त्यामुळे सहा तासांचा प्रवास करावा लागणार या कल्पनेनं मी अस्वस्थ झालो तरी डगमगलो नाही.

इतक्या लांबच्या प्रवासात वेळ घालवण्यासाठी थोडा वेळ वाचायचं, थोडा वेळ गप्पाा मारायच्या, बाहेरचं दृश्य अधूनमधून बघतच राहायचं आणि या अधूनमधूनमध्ये मधूनमधून तोंडात काही तरी टाकत राहायचं अशी माझी योजना होती.

बरोबर आणलेली पुस्तकं नंतर वाचावी आणि आदल्या दिवशी घेतलेलं वृत्तपत्र आधी वाचावं असं मी ठरवलं होतं. कारण एखाद्या देशातला पेपर वाचला म्हणजे तो देश आहे कसा आणि त्यात काय चाललं आहे त्याचं चित्र चट्कन डोळ्यांसमोर उभं राहतं. पेपर हातात घेतला मात्र, आणि तसंच झालं.

पहिल्या पानावर मोठी बातमी होती ती विरोधी पक्षानं विधानसभेत दाखल केलेल्या निंदाव्यंजक ठरावाची. हा ठराव मुळी त्या सभेच्या सभापतीविरुद्धच होता. त्या सभापतीनं 'पब्लिक अकाऊंट्स कमिटी'नं आपल्या अहवालात राष्ट्राध्यक्षांचे ठिकठिकाणी केलेले उल्लेख काढून टाकावेत, असा आदेश दिला होता.

विरोधी पक्षानं असं करावं याचा अर्थ असा होता, की केनियात लोकशाही होती आणि ती चांगली जितीजागती होती. त्या खालीच राष्ट्राध्यक्ष मोई यांनी अशी ग्वाही दिली होती, की देशासाठी नेमलेला निवडणूक आयोग सत्ताधारी कानु पक्षीयांचाच आहे असा जो काही लोकांचा समज होता तो चुकीचा होता. यावरून अशी दाट शंका येत होती, की तो समज बहुधा बरोबर असावा.

या राजकीय बातम्यांहूनही ठळक टाइपात त्या पानावर एक भलतीच सनसनाटी बातमी. अहो, मुंबासाचे महापौर अहमद म्विन्डानी यांचे एक चिरंजीव इतके संतापले, की त्यांनी महापौरांच्या ऑफिसात शिरून तिथं पेट्रोल शिंपडलं आणि मग काडी पेटवून ते भस्मसात करण्याच्या बेतात सदरहू चिरंजीव होते. तेवढ्यात नगराच्या उप-खजिनदारांनी त्यानां अडवलं. मग सुरक्षा सैनिक धावले आणि त्यांनी त्या चिरंजीवाना अटक केली. दीर्घकाळ चालू असलेल्या कौटुंबिक भांडणामुळे तो मुलगा संतापला होता आणि त्यामुळे हा प्रकार झाला होता. म्हणे! एकंदरीत वडीलधाऱ्या माणसांशी आदरांन वागायला केनियातली संतप्त तरुण पिढी तयार नव्हती असं दिसलं.

पुढल्या पानावर कोईगी वा वार्नवेअर या तुरुंगात असलेल्या राजकीय पुढाऱ्यानं केलेला अर्ज सरन्यायाधीश कोकार यांनी फेटाळला होता. आपला दावा तीन न्यायाधीशांनी संयुक्तपणे चालवावा अशी त्यांनी मागणी केली होती. या राजकीय पुढाऱ्यानं बाहारी पोलिस स्थानकावर हल्ला केला होता आणि आपल्याला जामिनावर सोडावं अशी त्याची मागणी होती. त्यामुळे ही बातमी केनियातली की बिहारमधील, असा क्षणभर माझ्या मनात संभ्रम निर्माण झाला.

दुसऱ्या एका बातमीत सडेतोडपणे बोलणाऱ्या एका राजकीय पुढाऱ्यानं सरकारला असा इशारा दिला होता, की 'केनिया को - ऑपरेटिव्ह क्रीमरीज या दुधावर प्रक्रिया करणाऱ्या सहकारी संस्थेला नेस्तनाबूत करण्याचा त्यांचा प्रयत्न निश्चितच निष्फळ होईल. हे वाचून मी बिहारमधून सरळ महाराष्ट्रात आलो.

यानंतरच्या बातमीत दोन सेनाप्रमुखांनी सैन्यातल्या एका मेजरला त्याच्या राहात्या घरातून हुसकून लावले होते. सरकारी मालकीच्या घरात तो अनधिकृतपणे राहत होता, असा त्यांचा दावा होता. हे वाचून मी क्षणार्धात केनियातून दिल्लीला जाऊन पोचलो.

भारतातल्या न्यायालयात चालतात तसेच केनियातल्या न्यायालयातही

दावे वर्षानुवर्षे चालतात असं पुढल्या बातमीवरून कळलं. एका निपुत्रिक वृद्ध बाईच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार कोणी करायचे याबद्दलचा हा दावा आधीच दोन वर्षे चालला होता. भांडणाऱ्या दोन्ही पक्षांना बाजूला ठेवून कोर्टानं एका तिसऱ्याच माणसाची नेमणूक करून त्याच्या ताब्यात तिचे अवशेष द्यावेत, असं एक वकिलानं सुचवलं होतं. त्यामुळे दाव्याला वेगळीच कलाटणी मिळाली होती. तेव्हा आणखी काही वर्ष तरी त्या म्हातारीचा गेलेला जीव टांगता राहणार अशी माझी खात्री पटली.

बर्नार्ड रास्ता माथेरी हा नैरोबातीला दाउद इब्राहिम असावा. तो तुरुंगात जायचं चुकवून कुठंतरी दडी मारून बसलेला होता. एका वकिलानं त्याला जाहीरपणे अशी विनंती केली होती, की त्यानं आपल्याला गुप्तपणे तो कुठं आहे ते कळवावं, म्हणजे तो वकील स्वत: बर्नार्ड रास्ताला गुप्त पोलिसांच्या मुख्यालयात नेऊन पोचवील. हा बडा गुन्हेगार प्रस्तुत वकिलाचा जिवलग मित्र होता आणि दोन वर्षांत त्याची काहीच बातमी न कळल्यामुळे हा वकील साहजिकच चिंतातूर झाला होता. आनंदाची गोष्ट अशी, की बर्नार्ड रास्ता जर आपण होऊन स्वाधीन झाला, तर त्याला (बहुधा खोट्या चकमकीत) गोळी घालून मारलं जाणार नाही, असं खुद्द पोलिस आयुक्त साहेबांनी आश्वासन दिलं होतं. असा जिवाला जीव देणारा वकील मित्र आणि इतका समंजस पोलिस आयुक्त असल्यावर बर्नार्ड रास्ता सजा भोगून सुखरूप तुरुंगातून बाहेर येईल, आणि कोणी सांगावं, कदाचित विधानसभेत निवडूनही येईल असा विश्वास मला वाटला.

अनेक बाबतींत भारताशी साम्य असलेल्या या देशात विजेची टंचाई नसावी याचं मला आश्चर्य वाटलं. कारण तशी बातमी कुठं नव्हती. पण पान उलटून पाहतो तो एक संपादकीयच विजेच्या टंचाईवर होतं. ही वीज पुरवणारी कंपनी अर्थातच सहकारी मालकीची होती आणि आता खासगी भांडवलाला वीज उत्पादनाच्या क्षेत्रात काम देण्याचा विचार चालला होता. हे सगळं अगदी ओळखीचं वाटतं,नाही? पण एक मोठा फरक होता. केनियातील विजेच्या उत्पादनाची क्षमता केवळ ७८४ मेगावॅट होती. या देशाला आर्थिक प्रगतीच्या बाबतीत खूप लांबचा पल्ला गाठायचा होता.

केनिया आर्थिक बाबतीत मागासलेला असला, तरी अमली पदार्थांच्या वापरात त्यानं झपाट्यानं प्रगती केली होती. या पदार्थांचा व्यापार करणाऱ्या बड्या टोळ्या अस्तित्वात होत्या आणि त्यांच्या अडचणी दूर करण्याचं व मार्ग निष्कंटक करण्यांच काम अर्थातच काही दुय्यम राजकीय पुढारी करीत होते. त्या वृत्तपत्रातलं मुख्य संपादकीय या गंभीर समस्येबद्दल होतं.

परदेशातल्या बातम्या सगळ्या आफ्रिकन देशांबद्दल असाव्यात हे साहजिकच होतं. आपल्या वृत्तपत्रांत बांगलादेश, श्रीलंका, पाकिस्तान, चीन वगैरे शेजारी देशांत काय चाललं आहे त्याच्या बातम्या प्रामुख्यानं दिल्या जातात. त्याचप्रमाणे केनियाच्या त्या वृत्तपत्रात दक्षिण आफ्रिका, युगांडा, मालावी, सोमालिया, इथियोपिया, नायजेरिया वगैरे देशांत काय चाललं आहे त्याच्या बातम्या होत्या. 'ऑर्गनायझेशन ऑफ आफ्रिकन युनिटी' त्यांच्या दृष्टीनं महत्त्वाची होती. आपल्याला जशी 'सार्क' महत्त्वाची वाटते तशी. भारताबद्दल जवळ जवळ काहीच बातमी नव्हती. केनियातल्या लोकांच्या दृष्टीतून जग किती वेगळं दिसतं, त्याचा मला प्रत्यय आला.

केनिया लहान असला, मागासलेला असला, तरी तिथं स्टॉक एक्स्चेंज आहे. चहा कंपन्या तिथं अर्थातच महत्त्वाच्या आहेत. त्यात ब्रुक ब्रॉंड वगैरे इंग्रजांच्या कंपन्या असाव्यात हे स्वाभाविक होतं. काहींची नावं मात्र आफ्रिकन होती.

पर्यटन हा केनियातला महत्त्वाचा व्यवसाय आहे. तेव्हा हॉटेलं चालवणाऱ्या अगर मोटारवाहतूक करणाऱ्या कंपन्यांची यादी मोठी असावी

हे स्वाभाविक होतं. बँका आणि इन्व्हेस्टमेंट कंपन्यांचा क्रमांक नंतर लागत होता. शेवटचा क्रमांक होता औद्योगिक कंपन्यांचा. पण एकंदर पसारा अगदीच मामुली होता. कंपन्यांच्या यादीत एकंदर शंभर कंपन्याही नव्हत्या. त्या दिवशी शेअरचे भाव पडले होते.

परदेशी चलनाचे व्यवहार मात्र जोरात चालत असावेत आणि त्या व्यवहारावर काहीही निर्बंध नव्हते. परत येताना माझ्याकडे शेवटी साठ क्षिलिंग उरले होते. त्याचाही एक डॉलर बँकेतून घेऊन मी विमानात चढलो. पर्यटन हा ज्या देशाचा एक प्रधान व्यवसाय आहे, त्या देशात परदेशी चलनाचे व्यवहार खुलेपणाने करण्याची सोय असणं आवश्यक असतं. केनियाच्या सरकारनं शहाणपणानं हे ओळखून तशी सोय ठेवली होती.

मागासलेल्या देशात परदेशी मदतीला फार महत्त्व असतं. त्यामुळे त्याबद्दलच्या बातम्या ठळकपणे दिलेल्या होत्या. भारत स्वतंत्र झाल्यावर इंग्लडला आपल्या आर्थिक व राजकीय जीवनात फारसं महत्त्व राहिलेलं नाही. पण केनियाच्या बाबतीत तशी परिस्थिती नाही. तिथले चहाचे मळे व उद्योग इंग्रजांच्या मालकीचे आहेत. तसेच इंग्लंडहून मिळणाऱ्या आर्थिक मदतीलाही केनियाच्या जीवनात विशेष महत्त्व आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या यूएनडीपीसारख्या संलग्न संस्थाकडून मिळणारी मदतही महत्त्वाची; पण एकंदर या रकमा फार किरकोळ होत्या.

इतरही काही बातम्या आर्थिक जीवनावर प्रकाश पाडणाऱ्या होत्या. एका बातमीत कालव्यातून पाणी पुरवून जमीन लागवडीस आणण्याच्या सरकारच्या योजनेची माहिती दिलेली होती. केनियाच्या बऱ्याचशा भागात पाऊस फारच थोडा पडतो. त्यामुळे तेथे लागवड होत नाही. ही उणीव दूर करण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. इतर देशात जेव्हा मी जातो तेव्हा पाऊसपाण्याच्या बाबतींत आपला देश इतर अनेक देशांपेक्षा किती भाग्यवान आहे ते मला जाणवतं आणि या जलसंपत्तीची आपण किती उधळपट्टी करतो, तिची जपणूक करण्यात किती निष्काळजीपणा दाखवितो तेही ध्यानात येतं आणि मन खिन्न होतं.

एक आद्य किकुयु साहित्यिक निधन पावल्याची छोटीशी बातमी त्या वृत्तपत्रात होती. त्याला पुरस्कार देण्यात आला होता. त्याचं नाव होतं Elder of the burning spear Medal पेटता भाला बाळगणारा टोळीतला ज्येष्ठ नेता. असं त्याचं स्वैर भाषांतर करता येईल. रानटी टोळ्यांच्या परंपरा अशा प्रकारे तिथं अजून जागृत आहेत. त्या परंपरातून केनियातल्या माणसाची घडण होते.

हा साहित्यिक मरण पावला तेव्हा एकशे सहा वर्षाचा होता!

राजकीय पुढारी केनियातील टोळयांतले झगडे पेटवण्याचा प्रयत्न करीत आहेत, अशी एक बातमी होती. आपल्याकडे जातीजातींत द्वेष निर्माण करण्याचा व वाढवण्याचा प्रयत्न जसा पद्धतशीरपणे केला जातो, तसाच हा प्रकार होता.

'काँग्रेसी गवतासारखी एक वनस्पती पाण्यात भरमसाठ वाढत आहे' अशी एक बातमी होती. एका कीटकाचा उपयोग तिचा नाश करण्याकरता केला जात होता.

पाकिस्तान एक मोठं औद्योगिक प्रदर्शन तेव्हा केनियात भरवत होतं. त्याची चांगली चार पानं माहिती त्या वृत्तपत्रात होती. पाकिस्तान भारतातला चहा घेत नाही, केनियातला घेतो. असं त्यावरून लक्षात आलं. केनिया मात्र पाकिस्तानकडून फारशी आयात करत नाही.

आफ्रिकन संस्कृतीत कथाकथनाची मोठी परंपरा असावी असे दिसलं. हजारो मुलांना मंत्रमुग्ध करणाऱ्या माडाफु लॉइड विल्सन या कथाकाराच्या कार्यक्रमाची बातमी वृत्तपत्रात होती. कथाकथन करतानाचं छायाचित्रही होतं.

क्रीडावृत्त अर्थातच शेवटी होतं. ऑलिंपिकला केनियातले खेळाडू जाणार होते. ॲथलेटिक्समध्येच यश मिळविण्याची त्यांची अपेक्षा दिसली. पण त्यांच्या ॲथलेटिक्सच्या नामांकित खेळाडूंना म्हणे युरोपियन एजंटांनी गुपचुप आधीच युरोपमध्ये स्पर्धात भाग घेण्यासाठी नेलं होतं आणि एक सुवर्णपदकविजेता तर डेन्मार्कचा नागरिक झाला होता.

काहीही असो, या मागासलेल्या देशात देखील ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक मिळवणारे खेळाडू निर्माण होत होते, आणि आमच्या भारताला एका ब्राझ पदकावर समाधान मानावं लागलं होतं. ते वाचून मी अगदी शरमिंदा झालो.

आणखीही बरंच काही त्यात होतं. एक साधं वृत्तपत्र एका देशाबद्दल किती सांगू शकतं ते पाहिलं, की आश्चर्य वाटतं.

कॉम्बीमधून जाताना, दृश्यांचा पटच माझ्या डोळयांसमोर उलगडत होता. त्याची अपूर्वाई सांगण्यासाठी स्वतंत्र लेखच लिहायला हवा.

◆ ◆ ◆

सावज शोधणारे डोळे




सरोवराच्या तीरावरचे ध्यानस्थ



साशंक टेहेळणी - आमच्या मागावर तर कोणी नाही ना?





## कॉम्बीतला दणकेबाज प्रवास

केनियातला पावसाळा संपायच्या बेतात होता. पण आम्ही पोचलो तेव्हा नैरोबीतीलं वातावरण चांगलंच ढगाळ होतं आणि स्वेटर घालूनही थंडी बरीच जाणवत होती. केनिया हा अगदी विषुववृत्तावरचा देश. तिथं चांगलंच उकडत असेल अशी माझी अपेक्षा होती. पण माझ्या प्रवासी कंपनीनं मला कळवलं होतं, की केनियात ११ ते २२ डिग्री सेल्सिअस असं तापमान असणार. प्रत्यक्षात नैरोबीत त्यापेक्षाही थंडी होती आणि पाऊस पडल्यावर ती वाढली.

दुसऱ्या दिवशी आम्ही शोबाला जाण्यासाठी निघालो, तेव्हाही वातावरण तसंच ढगाळ होतं आणि थंडीही चांगली जाणवत होती.

'विषुववृत्ताच्या जवळ असूनही असं का', असं आम्ही जोसेफला विचारलं. तो म्हणाला, की नैरोबी उंचावर आहे आणि तिथली हवा थंड असते. शिवाय आम्ही विषुववृत्ताच्या काहीसे दक्षिणेस होतो. त्यामुळे नैरोबीत तेव्हा मोसम होता थंडीचा. अर्थात हे आपलं तांत्रिक दृष्ट्याच खरं होतं. कारण आम्ही विषुववृत्ताच्या फारसे दक्षिणेला नव्हतो. आदल्या वर्षी मी दक्षिण आफ्रिकेला गेलो होतो, तेव्हा तिथं खरंच थंडीचा मोसम होता. कारण दक्षिण आफ्रिका विषुववृत्ताच्या पुष्कळच दक्षिणेला आहे. पण केनियात अशी परिस्थिती होती, की विषुववृत्त देशाच्या मधूनच गेलं होतं. त्यामुळे काही ठिकाणी अशी स्थिती होती, की एक पाऊल इकडे टाकलं म्हणजे दक्षिण गोलार्धात आणि तेच तिकडे टाकलं, की माणूस उत्तर गोलार्धात दाखल होत होता. थंडीचं खरं कारण नैरोबीची समुद्रपातळीपासूनची उंची हेच होतं.

माझ्या अंगात जाड जॅकेट होतं. वासंतीनं स्वेटर घातला होता. त्यामुळे थंडी सुखकारक वाटत होती. शिवाय जाण्या-येण्याचे मार्ग वेगळे केलेला दुहेरी रस्ता चांगला प्रशस्त आणि छान होता. खड्डे वगैरे तर सोडूनच द्या, पण खडबडीतपणाही जाणवत नव्हता. अशा रस्त्यावरून जर मला सहा तास प्रवास करायचा असेल, तर मला काळजीचं कारण नव्हतं.

मी जोसेफला म्हटलं, ''रस्ता चांगला आहे''.

जोसेफ हसला. तो म्हणाला,''सर, तो फार वेळ चांगला राहणार नाही. काही अंतर गेल्यावर वाईट रस्ता लागेल''.

मी मनात म्हटलं, 'पुढचं पुढे! आता तर रस्ता चांगला आहे!' रस्ता जसा चांगला होता, तसंच भोवतालचं दृश्यही चांगलं होतं. दुतर्फा तजेलदार,

प्रसन्न हिरवेपणा पसरला होता. झाडांची दाट पर्णराजी हिरवी होती. शिवाय दोन्ही बाजूला लागवड केलेली होती. मळे होते, शेतं होती. मळे होते बहुरंगी फुलांचे, अननसांचे, चहाचे, कॉफीचे! आणि शेतं होती गव्हाची, मक्याची. केळीच्या बागाही होत्या. मी जोसेफला म्हटलं, "वा! इथली शेती छान दिसते. शेतकऱ्यांचं इथं चांगलं चालत असावं".

जोसेफ काहीशा अभिमानानं म्हणाला, "ही शेती किकुयू लोक करतात. ते चांगले शेतकरी आहेत".

'बाकीचे लोक नाही का शेती करत?" मी विचारलं.

तो म्हणाला, "देशातले जवळजवळ निम्मे लोक किकुयू आहेत. ते शेती चांगली करतात. त्यांच्या खालोखाल लोकसंख्या आहे मसाई लोकांची. ते शेती करत नाहीत. पूर्वीपासून ते गाईचे कळप पाळतात. आताही तसेच आपले कळप घेऊन भटकत असतात".

"इथं मी वाटेत इंग्लिश गाईंचा एक छोटासा कळप पाहिला. तशा गाई आता ते पाळतात का? त्यांचं दूध आणि मांस विकतात का?" मी विचारलं.

जोसेफ म्हणाला, "नाही. त्यांच्या गाई इथल्याच आहेत. पूर्वीपासून त्या ते पाळत आलेले आहेत आणि आजही ते त्याच पाळतात. त्यांचं दूध ते वापरतात. पण त्यांचं मुख्य अन्न म्हणजे गाईचें मांस आणि गाईचं रक्तदेखील पितात"

"रक्त?" मी आश्चर्यानं विचारलं. जोसेफ म्हणाला, "होय रक्त, आणि ते सुध्दा कच्चं. सिंह जसा गाईचं नरडं फोडून रक्त पितो, तसंच गाईला मानेला भोक पाडून मसाई लोक तिचं रक्त पितात. इतकंच नव्हे, तर ते रक्त आपल्या लहान मुलांना दुधात मिसळून प्यायला देतात".

सिंहाच्या प्रदेशात आपले कळप घेऊन फिरणारे हे मसाई सिंहाचा आदर्श आपल्यापुढे ठेवून जगतात. तितक्याच निर्भयपणे आणि शूरपणे. सिंह जसा जंगलचा राजा, तसा मसाई हा देखील स्वतःला 'जंगलचा राजा' मानतो. खरं म्हणजे तो स्वतःला सिंहापेक्षाही श्रेष्ठ समजतो. कारण एक सिंहाला मारल्याशिवाय मसाई पुरुषानं आपलं पौरुष सिध्द केलं, असं मानलं जात नाही.

या वन्य जमातीविषयी मला फार कुतूहल वाटू लागलं. पण त्यांच्या प्रदेशात आम्ही सर्वात शेवटी जाणार होतो.

मी जोसेफला विचारलं, "आणखी कोणत्या जमाती केनियाला राहातात"

तो म्हणाला, "मोई ही तिसरी महत्त्वाची जमात. सध्याचे आमचे राष्ट्राध्यक्ष या मोई जमातीचेच आहेत. त्यामुळे त्यांची स्थिती आता सुधारायला लागली आहे".

मी हसून म्हटलं, "म्हणजे प्रत्येक राष्ट्राध्यक्ष आपापल्या जमातीचं भलं करायचा प्रयत्न करतो की काय?"

तो म्हणाला, "होय ना! जोमो केन्याटा किकुयू होते. त्यांनी बरीच वर्ष राज्य केलं. त्यामुळे किकुयूंची स्थिती सुधारली".

असं होतं यात काही चूक आहे असं त्याला वाटलेलं मला काही चूक दिसलं नाही. म्हणजे, हिंदू धर्म नावाची महाराष्ट्रातल्या विचारवंतांना महाभयंकर वाटणारी गोष्ट केनियात नसूनही आमच्या जातींचे पुढारी जे करतात, तेच तेथील टोळ्यांचे अगर जमातींचे पुढारी करत होते. आणि अमेरिकेसारख्या अत्यंत पुढारलेल्या देशातही मतदारांचा विचार करताना हे ज्यू, हे भारतीय, हे कृष्णवर्णीय, हे मेक्सिकन, हे पोलिश लोक असा विचार अमेरिकेतले राजकीय पुढारी करतात, हे मी स्वतः पाहिलेलं आहे.

हिंदू धर्मात व सांस्कृतिक परंपरेत दोष नाहीत, असं मला म्हणायचं नाही; पण ऊठसूट त्याला नाव ठेवत असणं योग्यही नाही आणि उपयुक्तही नाही, असं मात्र मला जरूर वाटतं.

मी जोसेफला विचारलं, ''हे मोई आणि इतर टोळ्यांतले लोक काय करतात?''

''काही अजून रानावनात राहतात, काही शेती वगैरे इतर व्यवसायांत आहेत. पण जास्त सुधारलेले लोक म्हणजे किकुयू''. मी थट्टेनं विचारलं, ''तू किकुयू आहेस का?'' तो म्हणाला, ''हो.''

काही वेळाने चांगला प्रशस्त दुहेरी रस्ता संपला आणि खडबडीत एकेरी रस्त्यावरून आमची गाडी खडखडत धावू लागली. गाडीचा वेग मात्र चांगला होता, कारण रस्त्यावर फारशी रहदारी नव्हती.

माऊंट केनियाच्या पर्वतराजीतून आमची गाडी चालली होती. आम्ही अधिकाधिक वर चढत होतो. हवा अधिक थड होत होती. चहाचे, कॉफीचे मळे दुतर्फा दिसत होते. मध्येच मक्याची शेतं, फळबागा वगैरे दिसत होत्या. एकंदरीत असं दिसत होतं, की या भागात पाऊस पडत होता आणि जमीन सुपीक होती.

अखेर माऊंट केनियाच्या सर्वोच्च शिखराचं आम्हाला दर्शन झालं आणि मग आमची गाडी उताराला लागली. लोणावळा मागे टाकल्यावर ज्याप्रमाणे आपण कमी पावसाच्या प्रदेशात प्रवेश करतो, व तिथं ज्वारी, बाजरी वगैरे कमी पाणी खाणारी पिकं दृष्टीला पडतात, तसंच इथं झालं. आता त्या मानानं सपाट असलेल्या प्रदेशातून आमची गाडी धावू लागली आणि गव्हाची वगैरे शेतं आम्हाला दिसू लागली.

पण हे होण्यापूर्वी माऊंट केनियाच्या पर्वतराजीत आम्ही विषुववृत्त ओलांडलं हे जोसेफनं सांगताच मी त्याला म्हटलं, ''थांब, थांब! इथं उतरून आपण फोटो काढू या''.

अहो, या विषुववृत्ताची आणि माझी फार वर्षं चुकामूक होत होती. मी सिंगापूरला आणि इंडोनेशियाला गेलो होतो, तेव्हा त्याच्या अगदी जवळ गेलो होतो आणि दोनदा ऑस्ट्रेलियाला गेलो, तेव्हा तर ते चक्क ओलांडलं होतं पण ते विमानातून. प्रत्यक्ष ते कुठं आहे ते पाहण्याची आणि आपल्या पायांनी ते ओलांडायची मला संधीच मिळाली नव्हती. सिंगापूरला गेलो तेव्हा मला सागण्यात आलं, की ते जरा दक्षिणेला महासागरात आहे. जाकार्तात आणि बाली बेटात गेलो, तेव्हा ते इथून तसं जवळच आहे, असं मला सांगण्यात आलं होतं. म्हणून एकदा ते डोळयानी पाहावं आणि स्वतःच्या पायांनी ओलांडावं, असं माझ्या मनात फार होतं.

जोसेफ म्हणाला, '' आपण याच रस्त्यानं परत येणार आहोत, तेव्हा आपण इथं थांबू, शिवाय त्या वेळी तुम्ही माऊंट केनिया सफारी क्लबमध्ये राहणार आहात आणि तो मुळी विषुववृत्तावरच बांधलेला आहे''. त्यानं असं म्हटल्यावर मी आग्रह धरला नाही. कारण आम्हाला बराच लांबचा पल्ला गाठायचा होता.

आम्ही माऊंट केनियाचं दर्शन घेऊन पुढे आल्यावर रस्ता अधिकच वाईट झाला होता. डांबरी रस्त्यात मोठमोठे खड्डे पडल्यावर जसे हादरे बसतात, तसे आमच्या गाडीला बसत होते. पाऊस पडून गेल्यावर कोकण महामार्गाची जशी अवस्था परवापरवापर्यंत होत होती (आणि कदाचित आताही होत असेल), तशी काही ठिकाणी रस्त्याची झाली होती. या बाबतीत भारतातले अभियंते जितके कुशल, तितकेच केनियातलेही असावेत, असा मी तर्क केला. मात्र अलीकडे आपल्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या असं ध्यानात आलं आहे, की खडी-डांबर आणि खडी दाबणारा एक रूळ यांचा उपयोग केला, तर हे खड्डे बुजवता येतात व त्यामुळे प्रवास सुसह्य होतो. शिवाय मोटारींची मोडतोड होण्याची शक्यता कमी होते. दुर्दैवाने हा अत्यंत मौलिक शोध केनियाच्या बांधकाम खात्याला अजून लागलेला नसावा किंवा कदाचित रस्ते एकदा बांधल्यावर त्यांची देखभालही करावी लागते व ती आपणच करायची असते, हेच अजून त्या खात्याला कळलं नसावं, अगर पटलं नसावं.

या रस्त्यावरून खडखडत जाताना होणारे हाल विसरता यावेत म्हणून त्या प्रवासात जे हबके,गचके, झटके आणि धक्के सहन करावे लागत होते, त्यांच्या विविधतेची नोंद घेण्याचा प्रयत्न मी करत होते. ही विविधता भरपूर होती. कधी शरीर पुढे फेकलं जाऊन मान मात्र मागल्या बाजूला दुमडली जात होती, तर कधी एखाद्या झटक्यानं डोकं उजव्या बाजूला आणि शरीर डाव्या बाजूला हिसकलं जात होतं. कधी अनपेक्षितपणे अर्धा फूट उड्डाण करून मी सीटवर पुन्हा आदळत होतो, तर कधी मी आणि शेजारी बसलेली वासंती अनपेक्षितपणे एकमेकांना 'ठो' देत होतो. माझे मित्र मुकुंदराव किर्लोस्कर यांनी एकदा स्वतःचीच जीभ इतक्या जोरानं चावली होती, की त्यांना हॉस्पिटलमध्ये जाऊन टाके घालून घ्यावे लागले होते. हे असं कसं बरं झालं, याचं मला तेव्हा आश्चर्य वाटलं. पण आता माझ्यावर तसा प्रसंग ओढवण्याची दाट शक्यता मला जाणवत होती आणि त्यामुळे मला तेव्हा वाटलेलं आश्चर्य अनाठायी होतं, हे पटलं. एकदा तर माझ्या पाठीचा मणका तुटला आहे, अशी माझी खात्री पटली होती; पण नंतर दुसऱ्या धक्क्यात तो जोडला गेला असावा. नाक पुढल्या सीटच्या पाठीवर ठेचलं जाण्याचा किंवा डोकं थाडदिशी माझ्या हाताशी असलेल्या मजबूत लोखंडी दांड्यावर आदळण्याचा धोका सतत मला धमकावत होता आणि तसं होऊ नये म्हणून माझ्या जवळच्या त्या मजबूत लोखंडी दांड्याला मी घट्ट पकडून बसलो होतो. नंतर जेव्हा आमची कॉम्बी उजवीकडची दोन चाकं खडबडीत रस्त्यावर आणि डावीकडची दोन चाकं रस्त्याच्या कडेच्या खोल चाकोरीत अशी पंचेचाळीस अंशांनी कलती होऊन धावू लागली, तेव्हा मी ऐका मुठीत तो दांडा अगदी घट्ट धरला, दुसऱ्या मुठीत पुढच्या सीटची पाठ धरली.

मी एक पाण्याची बाटली माझ्या सीटच्या मागच्या खिशात ठेवली होती. ती हवेत उडाली, खाली पडली आणि गडबडा लोळू लागली. मी जर हात सोडले, तर माझीही तशीच अवस्था होईल, हे ओळखून मी जिवाच्या आकांतानं दोन्ही मुठीत तो दांडा आणि पुढच्या सीटची पाठ धरून ठेवली - पण जीव तरी बिचारा आकांत किती करणार! काही वेळानं तो निपचित पडला.

माझे मित्र मुकुंदराव किर्लोस्कर यांच्याप्रमाणे आपलीही जीभ चावली जाऊ नये, अशी काळजी घेत मी जोसेफला म्हटलं, ''आपली कॉम्बी फारच उडते आहे नाही?''

जोसेफ म्हणाला, ''कॉम्बीत वजन फार थोडं आहे. चांगली आठ-नऊ माणसं असली की ती अशी उडत नाही.''

ही आठ-नऊ माणसं कुठून आणावीत, याचा मी विचार करू लागलो. रस्ता इतका निर्मनुष्य होता, की आठ-नऊ तर सोडूनच द्या, पण एकही माणूस दृष्टीस पडत नव्हता. पुढे पेट्रोल घ्यायला आम्ही थांबलो, तेव्हा तिथं आठ-नऊच नव्हे, तर आणखीही माणसं होती. पण त्यांच्याकडे पाहिल्यावर, त्यांना बरोबर घेतलं तर ती शोबाला पोचतील; पण त्यांच्यात आम्ही मात्र नसू, अशी दुष्ट शंका माझ्या मनात आली आणि तो विचार मी घाईघाईत रद्द केला.

रस्त्यात पर्यटकांना चहा वगैरे घेता यावा म्हणून केनिया सरकारनं काही बंदिस्त आवारं बांधली आहेत. अशा एका आवारात जोसेफनं कॉम्बी उभी केली आणि तो म्हणाला, ''तुम्हाला चहा वगैरे घ्यायचा असेल तर घ्या. इथं प्रसाधनगृहाची वगैरेदेखील सोय आहे. पंधरा मिनिटांनी आपण निघू.''

प्रसाधनगृह आपल्या एसटी स्टँडवरच्या प्रसाधनगृहापेक्षा निश्चितच स्वच्छ होतं, पण याहून अधिक अनुकूल मतप्रदर्शन त्याच्याविषयी करणं अंमळ कठीणच होतं आणि चहा-कॉफीच्या हॉटेलात डोकावल्यावर आपल्याला चहा-कॉफी नको आहे, असं आम्हाला दोघांनाही वाटू लागलं. तिथं काही



देखण पण देखील धडकी भरवणार







असेन बछडा,
पण सिंह आहे म्हटलं सिंह!

मला देखील उंचावर पाल्यापर्यंत पोहोचता येत.






















पाणघोडा

कातड्याच्या वस्तू आणि लाकडात कोरलेले प्राणी, स्थानिक मण्यांपासून केलेल्या माळा वगैरे वस्तू विकायला ठेवलेल्या होत्या. दुकान पाहिल्यावर वासंती आत गेली आणि किंमतीची चौकशी करू लागली. तिथल्या आफ्रिकन बाईनं सांगितलेल्या किमती फारच जास्त होत्या. वासंतीनं त्या बाईला तसं सांगितलं, तेव्हा ती बाई म्हणाली, ''तुमचे कितीतरी इंडियन लोक या गोष्टी घेऊन गेलेले आहेत.''

ती गुजराथी लोकांविषयी बोलत असावी असं वाटून वासंती म्हणाली, ''छे, छे! आम्ही त्या श्रीमंत इंडियन लोकांतले नाही. आम्ही आपले गरीब इंडियन आहोत.''

तिचं हे बोलणं ऐकून ती बाई हसली आणि म्हणाली, ''तुम्ही किती पैसे द्यायला तयार आहात ते तर सांगा, मग आपण तुमची माझी किंमत जुळते का ते पाहू.''

या नेहमीच्या घासाघिशीत मला रस नव्हता म्हणून मी दुकानातून बाहेर गेलो. थोडा वेळ घासाघीस झाली आणि वासंती बाहेर आली म्हणाली, ''ती फारच किंमत सांगत्येय.''

मग आम्ही त्या आवारातच फेऱ्या मारीत जोसेफची वाट पाहू लागले. कारण आवाराबाहेर जाऊ नका, असं त्यानं आम्हाला सांगितलं होतं. ती आफ्रिकन बाई आपल्या दुकानाच्या दारात उभी राहून आमच्याकडे पाहात होती. थोड्या वेळानं ती हसत वासंतीजवळ आली आणि म्हणाली, ''तुम्ही माझ्याकडून वस्तू नाही घ्यायच्या तर नका घेऊ, पण तुमच्याजवळ ज्या वस्तू आहेत त्या तुम्ही मला विकता का? मी तुम्हाला चांगली चांगली किंमत देईन.''

वासंती आश्चर्यानं म्हणाली, ''माझ्याजवळच्या वस्तू? कुठं आहेत माझ्याजवळ वस्तू?'' वासंतीच्या पायात अमेरिकेतल्या आमच्या मुलीनं दिलेले रिबॉक बूट होते. त्यांच्याकडे तिनं बोट दाखवलं आणि म्हणाली, ''हे बूट तुम्ही विकता का? मी चांगली किंमत देईन. मग तिनं वासंतीच्या हातातल्या पोवळी लावलेल्या सोन्याच्या बांगडीकडे आणि गळ्यातल्या माळेकडे बोट दाखवलं आणि त्याही वस्तू विकत घ्यायची तयारी दाखवली.

वासंती म्हणाली, ''छे, छे! या वस्तू मला काही विकायच्या नाहीत.''

ती हसून म्हणाली, ''का? चांगली किंमत मिळाली तर विकायला काय हरकत आहे? खरंच मी चांगली किंमत देईन!''

अखेर बऱ्याच वेळानं वासंती त्या वस्तू विकायला तयार नाही, हे तिला पटलं आणि ती आपल्या दुकानात परत गेली. ती खरीच हाडाची व्यापारी होती, हे मला पटलं.

वासंतीला मी म्हटलं, ''तू श्रीमंत नाहीस असं तिला सांगितलंस ते तिला पटलं असावं, म्हणून ती तुझी गरिबी दूर करायचा प्रयत्न करत होती.' यावर आम्ही दोघं हसलो. तेवढ्यात जोसेफ आला आणि कॉम्बीत बसून पुन्हा आमचा प्रवास सुरू झाला.

आता आम्ही सपाट प्रदेशात आलो होतो. थंडी मागे माऊंट केनियात राहिली होती आणि आता चांगलंच उकडू लागलं होतं. इथं पाऊस अगदीच कमी पडत असावा. त्यामुळे भोवतालचा प्रदेश कसा अगदी शुष्क दिसत होता. आता इथं शेतं नव्हती. चांगली गवतही दिसत नव्हतं. खुरटं, सुकलेलं गवत, खुरटी काटेरी झुडपं आणि मध्ये मध्ये बाभळीसारखी काटेरी झाडं, एवढ्याच वनस्पती तिथं होत्या. या शुष्कपणात त्या काटेरी झाडांची भल्या मोठ्या गुच्छाच्या आकाराची हिरवीगार पर्णराजी उठून दिसत होती आणि ती इतकी विपुल आणि हिरवीगार असावी, याचं सुखद आश्चर्य वाटत होतं.

आसमंतात वस्ती दिसत नव्हती. तो सारा विस्तीर्ण सपाट प्रदेश निर्मनुष्य होता. क्वचित कुठं गुरांचा अगर मेंढरांचा लहानसा कळप ते खुरटं, वाळकं गवत कुरतडताना दिसत होता. आम्ही माऊंट केनियाच्या

उतारावर पाहिल्या तशा या जातिवंत इंग्लिश गाई नव्हत्या आणि मेंढरंही ऑस्ट्रेलियातून आणलेली मेरिनो जातीची नव्हती. आपल्या महाराष्ट्राच्या शुष्क, खडकाळ भागात दिसतात तशीच ही खुरटी, हडकलेली जनावरं होती. आम्ही आता केनियाच्या शुष्क उत्तर भागात आलो होतो. आणखी उत्तरेकडे तर जवळजवळ कोरडं वाळवंटच होतं.

मध्येच आम्हाला वस्तीचा भाग लागला. दरिद्रीच होता. पण आश्चर्य म्हणजे त्या भागात एक मोठी मशीद होती. तिचा भव्यपणा, नक्षीदार चित्र काढून तिची केलेली सजावट पाहून आम्हाला आश्चर्य वाटलं. त्या वस्तीतली माणसं वेगळी होती. त्यांचे अंगपिंड, चेहरेमोहरे, वेषभूषा सगळंच वेगळं होतं.

जोसेफ म्हणाला. ''हे सोमाली लोक आहेत. हे मुसलमान आहेत, सोमालियात युद्ध झालं, दुष्काळ पडला, की पुष्कळ सोमाली केनियात येतात. परिस्थिती सुधारली म्हणजे पुष्कळसे परत जातात. पण काही इथंच स्थायिक झाले आहेत.

''पहिल्यानं येमेनी लोक केनियात आले. त्यांनी मुसलमान धर्माचा प्रसार केला. स्वाहिली ही भाषाही त्यांनी आणली. पुढे युरोपियन लोक आल्यावर त्यांनी केनियातल्या टोळ्यांना ख्रिस्ती केलं. इंग्रजी भाषा आणली. इस्लाम बराचसा नष्ट झाला, पण स्वाहिली राहिली. केनियातल्या टोळ्यांच्या भाषा वेगवेगळ्या असल्या तरी सगळ्यांना कळणारी भाषा एकच आहे, ती म्हणजे स्वाहिली. जोसेफ लोकांशी स्वाहिलीतच बोलत होता. इंग्रजीदेखील पुष्कळांना कळत होती, येत होती.

बाकी हे लोक वेगळे असतील, पण इतरांसारखे ते दरिद्री होते. आमची कॉम्बी थांबली म्हणजे माळा, लाकडी वस्तू, चाकू, सुऱ्या वगैरे विकायचा प्रयत्न करीत होते आणि भीक मागत होते. एक मुलगा 'मला शाळेच्या फीसाठी पैसे द्या.' म्हणून सांगत होता. दुसऱ्यानं माझ्या खिशातलं पेन मागितलं. 'मास्तरांनी शाळेत पेन घेऊन यायला सांगितलं आहे,' असं तो म्हणाला. हे दारिद्य पाहून अतिशय विषण्णता आली. विसाव्या शतकात जगात कुठंच असं दारिद्य असायचं कारण नव्हतं. पण तरी ते होतं. माझ्या देशात होतं आणि इथं या केनियातही होतं.

इथं आपल्यासारखी एसटी वगैरे दिसली नाही. एक छोटी मालवाहू मोटार आली. त्यात खच्चून कोंबलेल्या माणसांत आणखी काही माणसं कोंबली गेली आणि मग ती गाडी पुढे निघून गेली.

जोसेफ म्हणाला, ''आता चाळीस किलोमीटर आणखीनच वाईट रस्ता आहे.'' मग एके काळी डांबरी असलेला पक्का रस्ता संपला आणि आता खडीचा धुळीनं भरलेला रस्ता लागला. जास्तीच खडखडाट, झटके, गचके, धक्के वगैरे आणि शिवाय धुळीचे लोट. आसपासचं दृश्य तसंच शुष्क!

मला वाटलं, की या इतक्या शुष्क प्रदेशात वन्य प्राणी कशाला राहतील?

नाही म्हणायला सोमाली लोकांनी पाळलेला एक उंटांचा कळप दिसला. ते उंट बच्चेच होते. विकण्यासाठी ते जोपासलेले होते.

पुढे काहीच नाही. शुष्कपणा आणखी शुष्कपणा! त्यात ती एकच प्रकारची काटेरी झुडपं आणि ती हिरवीगार काटेरी झाडं-सगळी एकाच जातीची.

मग कच्चा रस्ताही संपला आणि आम्ही राखीव अरण्याकडे जाणाऱ्या आणखी कच्च्या रस्त्यानं प्रवास करू लागलो...आणखी गचके, आणखी धूळ.

आपण कुठं चाललोय आणि तिथं काय पाहायला मिळणार आहे, ते मला कळेना. आम्ही वनप्रदेशाच्या वेशीपाशी थांबलो. परवाना दाखवण्याचे सोपस्कार झाले. आम्ही वनप्रदेशाच्या हद्दीत शिरलो आणि काही अंतर गेल्यावर आमच्या हॉटेलच्या आवारात शिरलो.

ते हॉटेल म्हणजे एक सुखद आश्चर्य होतं.

◆◆◆



## राज्य वनचरांचं

सहा तास त्या कॉम्बीतून धक्के, दणके, हबके आणि हिसके सहन करीत प्रवास केला होता. शेवटच्या तास-दीड तासात चांगला भाजून निघालो होतो. निदान टनभर तरी धूळ माझ्या नाकातोंडात गेली असावी आणि हाडं इतकी खिळखिळी झाली होती, की आम्हाला कोणी हलवलं असतं, तर खुळखुळ्यासारखं आम्ही वाजलो असतो. विलक्षण थकवा आला होता आणि इतकं करून आम्ही ज्या शाबा राखीव अरण्यात येऊन पोचलो होतो, ते म्हणजे सभोवताली मैलनमैल पसरलेला शुष्क, वैराण प्रदेश होता. त्यामुळे असं वाटू लागलं होतं, की कुठून आपण इथे येऊन पडलो? इतके पैसे खर्च करून आणि इतक्या हालअपेष्टा सहन करून आपण इथे आलो ते चुकलं तर नाही!

सरोवा शाबा हॉटेलचं आवार त्यामानानं हिरवं होतं. पण त्याची ओबडधोबड लाकडी लॉबी आणि छोटासा काउंटर काही आश्वासक वाटत नव्हतं. हॉटेल एकंदर बेताचंच असावं असं वाटू लागलं.

पण लॉबीच्या मागल्या बाजूनं बाहेर पडून आम्ही आमच्या खोलीकडे जाऊ लागलो तेव्हा एकदम जादूची कांडी फिरल्यासारखं झालं आणि लक्षात आलं, की आपण एका सुंदर यक्षभूमीत प्रवेश केला आहे.

हॉटेलच्या बाजूनं एक नदी वाहत होती. इतका उन्हाळा असूनही ती आपल्या महाराष्ट्रातल्या नद्यांसारखी सुकलेली नव्हती; उलट पाण्यानं तुडुंब भरून वाहत होती. माऊंट केनयावरचं बर्फ त्या उन्हात वितळत होतं आणि त्या नदीतून वाहत होतं.

नदीतलं ते पाणी जरा उंचावर असलेल्या हॉटेलच्या आवारात आणलेलं होतं आणि आवारभर निरनिराळ्या नागमोडी प्रवाहातून ते खळाखळत झुळझुळत, दगडांवरून उड्या घेत, ओघळत. कुठून तरी झिरपत, वाटेतल्या एखाद्या मोठ्या दगडाला विळखा घालीत वाहत होतं. मध्येच एखाद्या छोट्या-मोठ्या जलाशयात ते विसावत होतं आणि पुढे जाऊन कुठल्याशा झाडाच्या बुंध्याशी लगट करीत होतं. कधी एखाद्या वेलीची झुकलेली फांदी त्याला स्पर्श करीत होती आणि फुलांचा एखादा झुबका झुकून त्यात आपलं प्रसन्न प्रतिबिंब पाहात होता. कोणी रंगीबेरंगी पक्षी त्यात उतरून पंख फडफडवीत आंघोळ करीत होते आणि एक उडणारा कीटक त्याच्यावर बसला होता. ऊन त्यात न्हात होतं आणि सावल्या भिजत होत्या. एखाद्या छोट्याशा डबक्यात ते विसावलं की मुळी सगळं उन्हात रखरखलेलं आकाशच त्यात उतरत होतं. कधी असं वाहत

आणि कधी तसं वाहत ते अखेर नदीत उतरत होतं आणि चार पावलं पुढं गेलं, की नवा प्रवाह कुठून तरी झुळझुळत येताना दिसत होता.

हे सगळं अर्थातच योजनापूर्वक केलेलं होतं. पण सिमेंट काँक्रीट, बांधून काढलेले पाट यांना त्यात काहीही स्थान नव्हतं. रानातल्या एखाद्या झऱ्याचं पाणी वाहावं तसं ते पाणी वाहत होतं.

आणि ज्या काहीशा अरुंद जमिनीच्या पट्ट्यातून ते वाहत होतं तोदेखील अगदी नैसर्गिक अवस्थेत होता. तो उंचसखल होता आणि त्यावर इथे एक झाड, तिथे दुसरं; मध्येच एक झुडूप, कुठच्या तरी झाडाला कवटाळणारी एखादी वेल अशी तिथली झाडी होती. त्या पट्ट्यातली सगळी जमीन उंचसखल होती आणि त्यावर वाढलेलं गवत जाडंभरडं, वेगवेगळ्या जातीचं आणि उंच व खुरटं होतं. लॉनमोअर फिरवून त्याचं गुळगुळीत लॉन केलेलं नव्हतं.

काहीसं कृत्रिम वाटावं असं एकच ठिकाण तिथे होतं. ते म्हणजे एक विस्तीर्ण पोहोण्याचा तलाव. पण त्यातही पाणी पडत होतं ते एका भल्यामोठ्या दीड-दोन पुरुष उंचीच्या ओबडधोबड खडकावरून. त्यात एक कृत्रिम अष्टकोनी बेट होतं. त्यावरचा मंडपदेखील लाकडीच होता. त्या बेटाच्या पलीकडे मुलांसाठी पोहायचा एक छोटासा उथळ तलाव होता. ते पाणी पुढेही पसरलं होतं आणि एक बांधून काढलेला जलाशय त्यानं तुडुंब भरला होता. त्या जलाशयात आपले दगडी पाय रोवून उभा होता आमच्या हॉटेलचा मचाणासारखा बांधलेला डायनिंग हॉल.

लॉबीच्या मागल्या दारानं बाहेर पडलं, की पहिल्यानं दृष्टीस पडत होता तो हा विस्तीर्ण जलाशय आणि त्या जलाशयात पाय रोवून उभा राहिलेला तो डायनिंग हॉल.

मैल न् मैल पसलेला शुष्क प्रदेश पाहून पांथस्थाचे डोळे श्रांत झालेले असतील, पाण्याचं, हिरवळीचं दर्शन घडावं म्हणून तहानलेले असतील हे त्या हॉटेलच्या स्थापत्यकारानं ओळखलं होतं आणि म्हणून प्रथम नदीचं, त्या जलाशयातलं आणि वाहत्या ओढ्यातलं पाणी पाहून त्या पांथस्थाचे डोळे निवतील, त्याच्या वृत्तीवर गारव्याचा आणि प्रसन्नतेचा शिडकावा होईल, अशी व्यवस्था त्यानं केली होती.

हॉटेलची रचनादेखील भोवतालच्या वनप्रदेशाशी संवाद साधणारी होती.

लॉबीमागचा प्रशस्त डायनिंग हॉल भल्यामोठ्या दोन पुरुष उंचीच्या ओबडधोबड दगडी खाबांवर मचाणासारखा उभा होता. त्याचे पुढले खांब त्या विस्तीर्ण जलाशयातच रोवलेले होते. म्हणजे तसा भास होत होता. प्रत्यक्षात ते त्या जलाशयाला स्पर्श करीत त्याच्या काठावर उभे होते आणि मागले खांब ओबडधोबड खडकाळ जमिनीतून एखाद्या वृक्षाच्या बुंध्यासारखे वर आलेले होते. एक मोठा वृक्ष त्या डायनिंग हॉलच्या मध्यभागातून आणि वरच्या छपरातून आरपार वर गेला होता आणि तिथे आपल्या भल्यामोठ्या फांद्या वेड्यावाकड्या पसरून विस्तारला होता. असं वाटत होतं, की ते डायनिंग हॉलचं मचाणच त्या वृक्षावर बांधलेलं होतं. त्या डायनिंग हॉलच्या लगत आणखीही वृक्ष होते. त्यामुळे तो हॉल म्हणजे एक मचाणच आहे असं अधिकच वाटत होतं.

त्याचं छप्पर गवतानं आच्छादलेलं हातें. त्या हॉलमध्ये चढून जायला एक ओबडधोबड लाकडी जिना होता. त्याची लाकडं वेडीवाकडी होती. त्यांना रंग, पॉलिश काहीच नव्हतं आणि त्याच्यावर धड रंधाही मारलेला नाही असं वाटत होतं. त्या हॉलला भिंती नसाव्यात हे अपेक्षितच होतं. फक्त तोकडं लाकडी कुंपण होतं. वारा, पाऊस, माकडं, पक्षी यांना आत यायला काहीच आडकाठी नव्हती आणि तसे ते येतही होते. एक छोटं माकडं सतत दोन दिवसांच्या मुक्कामात आमच्या प्लेटमधले पदार्थ पळवण्याचा प्रयत्न करीत होतं. ते पाहून आम्हाला हवं-नको पाहणारी

आफ्रिकन परिचारिका त्याला सारखी हाकलत होती. तिनं हाकललं, की ते पळायचं आणि तिची पाठ फिरली की पुन्हा यायचं. एकदा तिनं त्याचा अगदी पाठपुरावाच केला तेव्हा ते एका कोपऱ्यात बसलं आणि आपल्या पुढच्या पायांनी त्यानं आपले डोळे झाकून घेतले - जणू ते म्हणत होतं 'आम्ही नाही रे बाबा!' ते पाहून आम्हा सगळ्यांनाच हसू आलं.

त्या भागात इतरही मोठे आणि बळकट वानर होते; पण ते हॉटेलच्या आवारात फिरकतही नव्हते. त्या आवारात कोणत्या प्राण्यांनी यावं त्याची निवड आणि तीही काळजीपूर्वक केलेली दिसत होती.

त्या माकडाप्रमाणे काही पक्षीही आम्ही जेवत असताना लाकडी कठड्यावर बसून आमच्या प्लेटमध्ये काय आहे ते वाकून वाकून बघायचे. ते इतके सुंदर होते, की त्यांना हाकलावं असं वाटतंच नसे. चिमणीहून जरा मोठे असलेले निळे पक्षी फार सुंदर दिसायचे. मुंबईत असा एखादा पक्षी दिसला असता, तर आम्ही त्याला पाहायला धावलो असतो. इथे ते आमच्या अगदी जवळ येऊन बसत होते. त्यातला एक पक्षी त्याला खायला दिलं नाही म्हणजे रागावून माझ्याकडे रोखून बघायचा.

'पाहा कसा एकटाएकटा खातोय ते. मी इतका इथे तो मला काही देईल म्हणून वाट पाहात बसलोय तरी मला काही द्यावं असं त्याला वाटतच नाही. अप्पलपोटा कुठचा' असं तो मला म्हणतोय असं वाटायचं.

त्या डायनिंग हॉलमध्ये अन्न त्या दालनाच्या मधूनच थेट वर गेलेल्या वृक्षाच्या भोवती लाकडी टेबलावर मांडलेलं असायचं आणि डायनिंग हॉलमधलं फर्निचर तसंच साधं, लाकडी होतं; मात्र त्यावर बसणं सुखकारक होईल अशी त्याची रचना होती.

त्या हॉटेलची एक अशी इमारत नव्हती. त्या डायनिंग हॉलच्या दुतर्फा छोट्या छोट्या दुमजली बंगल्या बांधलेल्या होत्या. प्रत्येक बंगलीत तळमजल्यावर दोन आणि वरच्या मजल्यावर दोन अशा चार खोल्या होत्या. या खोल्या आतून चांगल्या प्रशस्त आणि आधुनिक सुखसोयींनी सुसज्ज होत्या. पण बाहेरून मात्र गवताचं छप्पर आणि कच्च्या विटांच्या भिंती असलेल्या त्या झोपड्या आहेत असं वाटायचं. वरच्या मजल्यावर जायचा जिनाही ओबडधोबड लाकडी होता.

आमची खोली आतून चांगली प्रशस्त होती. तिच्या दोन्ही बाजूंना केवढ्या तरी मोठ्या काचेच्या खिडक्या होत्या. एका खिडकीतून वाहती नदी दिसत होती. दुसऱ्या खिडकीबाहेर एक प्रशस्त हिरवंगार लॉन होतं. त्याच्यापलीकडे एक दाट झाडीचा पडदा होता. त्याच्या पलीकडे होतं संरक्षित अरण्य. पण ते फारसं दिसत नव्हतं. फक्त त्याचं अस्तित्व जाणवत होतं.

खोलीत सगळ्या सुखसोयी होत्या. न्हाणीघर छान होतं. तिथे कडकडीत पाण्यानं आंघोळ केल्यावर शिणवटा पुष्कळच कमी झाल्यासारखा वाटला. थोडी तरतरी आली.

आमचं जेवण आम्ही आधीच उरकलं होतं. कारण आम्ही तिथे पोचलोच होतो दुपारी दीड वाजता आणि दुपारचं जेवण झाल्यावर आम्ही खोलीवर येऊन आंघोळी केल्या. पुन्हा जंगल बघायला साडेतीन वाजता बाहेर पडायचं होतं. त्यामुळे विश्रांती घ्यायला जेमतेम एक तासभर वेळ होतो.

आमच्या खोलीतला बेड एखाद्या जुन्या काळच्या पलंगासारखा प्रशस्त होता. त्यावर कापडी छत होतं. त्यातून एक पंखा खाली आलेला होता. त्या सबंध पलंगाभोवती एक मोठी जाळीदार मच्छरदाणी होती. ती ओढली की वरच्या दांडीवरून सरकून सगळा पलंग वेढून टाकत होती.

मी ती ओढली आणि झोपलो तेव्हा एखाद्या ऐतिहासिक हिंदी चित्रपटातले आपण मोगल बादशहा वगैरे आहोत असं वाटू लागलं. पण त्या मच्छरदाणीतून बाहेर येणं म्हणजे एक कटकटच होती, असं लक्षात

आलं, तेव्हा मी ती मच्छरदाणी सरकवून गुंडाळून ठेवली. बादशाहीचा त्याग केला आणि कुशीवर वळून तोंड उशीत खुपसून सुखानं झोपलो. अर्धा तासच, पण गाढ झोप लागली. त्यामुळे पुष्कळच ताजंतवानं वाटलं.

हॉटेलात डायनिंग रुमच्या खालच्या मोकळ्या जागेत चहा आणि बिस्किटं ठेवलेली होती. कोणीही यावं चहा बनवून घ्यावा आणि प्यावा अशी सोय होती. बिस्किटं मात्र झाकून ठेवावी लागत होती. कारण त्यांचा समाचार घ्यायला उत्सुक असेलेले पक्षी, माकडं, मांजरं वगैरे बरेच प्राणी तिथे होते.

ते निळे पक्षी आणि दुसरे करड्या रंगाचे चिमण्यांसारखे पण मोठे पक्षी मोठेच धीट होते. एका निळ्या पक्ष्यानं तर मी पुढे केलेला बिस्किटाचा तुकडा माझ्या बोटांच्या चिमटीतून खाल्ला आणि तो देखील इतक्या सफाईनं, की त्याच्या चोचीचा माझ्या बोटांना जराही स्पर्श झाला नाही. दुसऱ्या एका निळ्या पक्ष्यापुढं मी तसाच बिस्किटाचा तुकडा धरला. पण त्याला तो माझ्या चिमटीतून घेण्याचा धीर होईना. त्यामुळे तो एका डोळ्यानं त्या बिस्किटाच्या तुकड्याकडे पाहात होता. पण आपण तिकडे बघतच नाही असा बहाणा करीत होता. अखेर त्याचा धीर काही चेपत नाही असं पाहून मी तो तुकडा खाली टाकला मात्र; तत्काळ तो चोचीत उचलून तो भुर्रकन उडून गेला.

दिलेली वेळ चुकवायची नाही अशी मी स्वतःला सवय लावून घेतलेली आहे. म्हणून मी घड्याळात पाहून बरोबर साडेतीन वाजता हॉटेलच्या दाराशी गेलो. मी तिथल्या पोर्टरला विचारलं, 'जोसेफ आलाय का?'

पोर्टर म्हणाला, ''तो वेळेवर आला आणि तुम्हाला शोधत होता. पण तुम्हाला थोडा उशीर झाला.''

मी घड्याळात पाहिलं, तर बरोबर साडेतीन वाजले होते. तेवढ्यात जोसेफ तेथे आला. मी त्याला विचारलं तुझ्या घड्याळात किमती वाजले?

तो म्हणाला, ''तीन वाजून पस्तीस मिनिटं झाली आहेत.'' तेव्हा माझ्या ध्यानात आलं, की मी नैरोबीत उतरल्यावर स्थानिक वेळेप्रमाणे घड्याळ लावताना थोडं पुढेमागे झालं होतं. मग मी स्थानिक वेळेप्रमाणे अगदी बरोबर घड्याळ लावलं आणि त्यानंतर माझी वेळ चुकली नाही.

जोसेफचा वक्तशीरपणा मला आवडला. पर्यटकांच्या सेवेसाठी केनियातला सेवकवर्ग किती उत्तम प्रकारे प्रशिक्षित केलेला असतो हे पाहून मला कौतुक वाटलं. हे कौतुक पुनःपुन्हा वाटावं असे अनुभव त्या नऊ दिवसांच्या प्रवासात मला सतत येत होते.

आमच्या हॉटेलच्या जवळ दोन संरक्षित अरण्ये होती. त्यातलं शाबा अरण्य काहीसं दूर होतं व सरोवराजवळ होतं.

आता रस्ता असा नव्हताच. एक धूळभरली वाट होती. तिथे रस्ता बनवायच्या हेतूनं हॉटेलच्या चालकांनी खडीचे आणि मातीचे मोठाले ढिगारे आणून टाकले होते. त्यांनी ती वाट अर्धीअधिक व्यापली होती. त्या ढिगाऱ्यांवर आमच्या कॉम्बीची एक बाजूची चाकं पुनःपुन्हा चढवावी लागत होती. त्यामुळे खरं म्हणजे आमची कॉम्बी कलंडून पडायला हवी होती. पण ती पडली नाही. गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत बहुधा तिला लागू पडत नसावा.

अर्थात या गोष्टीचं आम्हाला फारसं आश्चर्य वाटलं नाही आणि त्रासही झाला नाही. आम्हाला तसल्या गोष्टींची आता सवय झाली होती.

आता आम्ही वन्यप्राणी पाहायला उत्सुक झालो होतो आणि ते दिसतात की नाही अशी आम्हाला भीती वाटायला लागली होती. कारण ते रान इतकं शुष्क दिसत होतं, की त्यात प्राण्यांना पुरेसं अन्न मिळू शकेल असं वाटतं नव्हतं. त्यातलं गवत अगदी वाळलेलं होतं आणि जनावरं चरल्यामुळे ते अगदी खुरटं झालं होतं. त्यात हिरवी दिसत होती ती फक्त

खुरटलेली काटेरी झुडपं. काही मोठे वृक्ष होते आणि तेही हिरवेगार होते. पण ते तसचे काटेरी होते.

पण त्या शुष्क अरण्यातही निरनिराळ्या प्राण्यांचे छोटे छोटे कळप होते आणि ते हळूहळू दृष्टीस पडले. पहिल्यांदा दिसली ती नाना प्रकारची हरणं. इम्पाला जातीची हरणं लहान बांध्याची आणि नाजूक होती. या अरण्यात या नाजूक प्राण्यांचा निभाव तरी कसा लागत असेल, अशी शंका वाटली. पण कशाची तरी चाहूल लागली म्हणून ती एकदम दचकून कितीतरी लांब उड्या मारीत जेव्हा क्षणार्धात दूर निघून गेली तेव्हा त्यांची शिकार करणं सिंहांना तर सोडूनच द्या, पण चित्त्यांनादेखील सोपं जात नसावं हे माझ्या ध्यानात आलं. त्यातल्या नरांना शिंगं होती. ऑरिक्स गॅझेल जातीच्या हरणांची शिंगं मात्र सरळ देखणी आणि कितीतरी लांब होती. यातल्या नर आणि मादी या दोघांनाही शिंगे होती आणि त्यांनाही आटे होते. आकारानं ही इम्पालाएवढीच किंवा थोडी मोठी होती. मला तरी ती इम्पालापेक्षा अधिक देखणी वाटली. त्यांचे बारीक निमुळते होत गेलेले पाय अणि चिमुकले खूर पाहिले तेव्हा तीदेखील इम्पालासारखीच अतिशय चपळ असली पाहिजेत हे मला पटलं. यांच्याहून मोठ्या आकाराचे आणि मजबूत बांध्याचे होते ते सांबर. पण शाबा अरण्यात त्यातले दोनच मला दुरून दिसले. नंतर आम्ही पाहिली ती जिराफासारखी लांब मान असलेली हरणं. अर्थात त्यांच्या माना काही जिराफासारख्या कित्येक फूट लांब नव्हत्या. त्यांची लांबी दीड-दोन फूट इतकी बेताचीच होती. या मानेचा उपयोग उंच काटेरी झाडांची पानं खाण्यासाठी ही हरणं करीत. दीड-दोन फूट उंच मानेनं कितीशी उंचावरची पानं खाता येणारअसं मला वाटलं. पण जेव्हा त्या हरणांना मागल्या दोन पायांवर अगदी माणसासारखं ताठ उभं राहून उंचावरची पानं खाताना मी पाहिलं तेव्हा आपली मान फारशी लांब नाही यावर त्यांनी परिणामकारक इलाज शोधून काढला आहे, असं माझ्या ध्यानात आलं.

ही सगळी हरणं इतकी नाजूक दिसत होती, की ती या शुष्क जंगलात कशी तग धरतात, असा मला प्रश्न पडला होता. पण मग कळलं, की ही हरणं नाजूक दिसली तरी चांगली दणकट होती. आपल्या नाजूक दिसणाऱ्या तोंडानं काटेरी झुडपांची आणि झाडांची पानं त्यांना ओरबाडून खाता येत होती आणि पाण्याशिवाय काही दिवस ती काढू शकत होती. चित्ते, बिबटे, आणि सिंह यांच्या तावडीत सहजासहजी न सापडण्याइतकी ती चपळ होती आणि त्यांची वीण इतकी विपुल होती, की सिंहांनी रोज काहींचा चट्टामट्टा केला, तरी त्यांचे मोठाले कळप शिल्लक राहात होते.

हरणांचे जसे छोटे छोटे कळप आम्ही पाहिले तसेच झेब्र्यांचेही पाहिले. इथल्या झेब्र्यांच्या अंगावरचे पट्टे काळेभोर नव्हते. काहीसे फिकट पिंगट होते. मसाई माराच्या जंगालातल्या झेब्र्यांचे अंगावरचे पट्टे म्हणे काळेभोर असतात. हा प्राणी दिसतो हरणांपेक्षा बळकट; पण असतो त्यांच्यासारखाच भित्रा. काही धोका आहे असं वाटलं, की कळपच्या कळप पळत सुटतो. त्यांचा बळकट बांधा पाहून वाटलं की हा प्राणी माणसाळला असता तर माणसाच्या फार उपयोगी पडला असता. पण काही प्राणी माणसाळतच नाहीत. हे झेब्रे त्यांतले होते.

नंतर आम्हाला जिराफ दिसले. इतकी लांबलचक मान असलेला हा प्राणी तोल तरी कसा सांभाळतो याचं मला नेहमीच आश्चर्य वाटत आलं आहे. त्याच्या त्या लांब मानेमुळे झाडांच्या उंचावरच्या फांद्यांचा पाला त्याला खाता येतो ही जमेची बाजू झाली. पण मान इतकी लांब असण्याऐवजी त्याला हत्तीसारखी सोंड असती किंवा त्या जिराफसदृश हरणासारखं दोन पायांवर उभं राहून खूप उंच होता आलं असतं तर बरं झालं असतं. असं असताना निसर्गानं त्याची मान लांब करायचा हा अडाणी मार्ग का पत्करला त्याला उलगडा मला होत नाही. शास्त्रज्ञांनाही त्याचं आश्चर्य

वाटतं. लांब मानेमुळे जिराफाचे फायदे थोडे आणि तोटे फार असा प्रकार झालेला आहे. फक्त त्याचा सारखा तोल जाऊन त्यानं तोंडघशी पडू नये, अशी व्यवस्था मात्र निसर्गानं केली आहे. त्यासाठी जिराफाचं डोकं अगदी छोटं बनवलं आहे; पण त्या एवढ्याशा डोक्यामुळे तो अधिकच हास्यास्पद झाला आहे.

आपल्याला निसर्गानं असं रूप दिलं म्हणून जिराफ मात्र अजिबात दुःखी-कष्टी झालेले दिसले नाहीत. ते शांतपणे चरत होते आणि एक तर चक्क प्रियाराधन करीत होता.

आम्ही हिंडत होतो बरेच. पण मध्ये बराच वेळ एकाही प्राण्याचं दर्शन घडत नव्हतं. त्यामुळे आम्ही काहीसे निराश होत होतो. वाटत होतं की इतक्या दूर आलो ते काय खुरटं गवत आणि तुरळक काटेरी झाडं पाहायला.

या आमच्या निराशेवर उतारा मिळाला. तो एका अनपेक्षित दृश्यानं. त्या निर्जन वाटणाऱ्या खुरट्या गवताच्या विस्तारात आम्हाला अचानक एक उंचवट्याच्या आडोशाला एकच नव्हे तर दोन कोल्हे दिसले.

कोल्हा हा बिबट्या व लांडगा यांच्याप्रमाणेच सहसा दृष्टीस न पडणारा आणि माणसांच्या थाऱ्यास मुळीच न राहणारा प्राणी. निदान जोसेफनं आम्हाला तसं सांगितलं होतं. पण आमच्या कॉम्बीची चाहूल लागली असूनही ते कोल्हे आमच्या दृष्टीस पडले होते. इतकंच नव्हे तर आम्हाला पाहूनही पळून गेले नव्हते. ह्याचं कारण ते एका अत्यंत महत्त्वाच्या उद्योगात गुंतले होते. त्यांनी एक ससा मारला होता आणि त्याचं डोकं एकानं आपल्या तोंडात पकडलं होतं आणि शेपटीकडचा भाग दुसऱ्यानं तोंडात पकडला होता. हिसका हिसकी करून तो ससा आपल्या ताब्यात घ्यायचा दोघेहि प्रयत्न करीत होते. प्रश्न महत्त्वाचा - महत्त्वाचा म्हणजे काय अगदी पोटापाण्याचा होता. त्यामुळे आम्ही दृष्टीस पडल्यावर ते दोघे चपापले पण पळून गेले नाहीत. ते जरा थबकले पण पुन्हा हिसका हिसकी करू लागले. या हिसका हिसकीत सशाचे दोन तुकडे होतील असं मला वाटत होतं. पण ससा नाजूक असला तरी याचं शरीर त्या मानानं बळकट आणि चिवट असावं कारण त्याचे कांही दोन तुकडे झाले नाहीत आणि हिसकाहिसकी अटीतटीनं होतच राहिली. अखेर त्यांच्यापैकी एक कोल्हा हिसकाहिसकीत यशस्वी झाला. सगळाच्या सगळा ससा त्यानं ताब्यात मिळवला आणि मग तो पळत सुटला. दुसरा कोल्हा त्याचा पाठलाग करू लागला. पण त्यात त्याला यश येणं कठीण दिसत होतं. पुढे काय झालं ते आम्हाला कळलंच नाही. कारण ते दोन्ही कोल्हे पळत पळत दृष्टिआड झाले.

आम्हाला हत्ती दिसावेत म्हणून जोसेफ अधिक झाडी असलेल्या ठिकाणी घेऊन गेला. जोसेफ नुसता कुशल ड्रायव्हर नव्हता. सगळ्या प्रकारची माहिती तो सांगत होता. इतकंच नव्हे तर कोठची जनावरं कोठे आढळतील, त्यांच्या पावलांचे ठसे इत्यादींवरून त्यांचा माग कसा काढायचा याची त्याला माहिती होती. हे तो केवळ अनुभवानं शिकला नव्हता. या कामावर नेमण्यापूर्वी त्याला पद्धतशीर शिक्षण देण्यात आलं होतं.

अपेक्षेप्रमाणे त्या झाडीत आम्हाला हत्तींचा एक छोटासा कळप दिसला, त्यात सगळ्यात मोठी होती ती हत्तीण. तिचे दोन बच्चे मोठे झाले होते आणि त्यांना दातही आले होते पण त्या दाताचा आणि खुद्द त्या हत्तीचा आकार यावरून ते अजून बच्चेच आहेत हे कळत होतं शिवाय एक अगदी छोटं पिल्लू होतं व त्या जेमतेम त्या हत्तीणीच्या गुढघ्या एवढं असेल नसेल! ते अगदी आईच्या पायात घोटाळत होतं आणि आई हत्तीण त्याची फार काळजी घेत होती. हत्तीला माणूस आणि वार्धक्य अगर दुष्काळ सोडला तर दुसरा शत्रू नाही. सिंह, गेंडा, सुसर यापैकी कोणीच त्याच्या वाटेला जात नाही: पण असं लहानसं पिल्लू असलं तर मात्र सिंह

त्यांच्यावर हल्ला करून त्याला मारतो. त्यामुळे हत्ती आपल्या पिल्लांची फार काळजी घेतात. खरं म्हटलं तर सर्वच प्राणी आपल्या पिल्लांची फार काळजी घेतात. हत्तीणीला त्या पिल्लाची काळजी घेतानां मी कौतुकानं पहात होतो.

हा हत्तींचा कळप बराच दूर होता आणि मध्ये झाडं असल्यामुळे आम्हांला तो नीटसा दिसत नव्हता. बडा बाबा हत्ती बहुधा जवळपास कुठेतरी असावा पण तो आम्हांला दिसलाच नाही.

मी जोसेफला म्हटलं, ''आपल्या त्या हत्तींच्या जवळ नाही का जाता येणार'' तो म्हणाला. ह्या अरण्यात असा नियम आहे की जंगलखात्यानं पाडलेल्या वाटांवरूनच गाड्या न्यायच्या. जनावरांच्या जवळ जाण्यासाठी कुठेही घुसवायच्या नाहीत. त्या हत्तींच्या कळपाच्या जवळ नेमून दिलेली वाट नाही. त्यामुळे आपल्याला त्याच्याजवळ जाता येत नाही. पण काळजी करू नका. आपण काही दिवसानी मसाई माराच्या जंगलात जाणार आहोत. तिथं प्राणी खूप आहेत आणि असा नियम नाही. तिथे मी तुम्हांला हत्तींच्या इतक्या जवळ नेईन की तुम्हांला त्यांच्याशी शेकहँड करता येईल.

तेव्हा मी घाईन म्हटलं,''जंगली हत्तीशी शेकहँड करायची आमची इच्छा नाही. थोडं दुरूनच त्यांना भारतीय पद्धतीनं नमस्कार करणं आम्हाला अधिक आवडेल.

त्यानंतर आम्ही हॉटेलवर परतलो. परतताना वाटेत आम्हांला रानकोंबड्यांचा एक कळप दिसला. आणि मग एक मुंगूस गवतातून सुळकन् जाताना दिसलं. मी कोकणात पहिलेल्या मुंगुसापेक्षा ते अधिक मोठं आणि केसाळ होतं.

हॉटेलवर आल्यावर आम्हाला कळलं, की तिथे रोज संध्याकाळी नदीतल्या सुसरींना खाऊ घालण्याचा कार्यक्रम होतो. रोज रात्री साडेसात वाजता एका ठिकाणी हाडामासाचे तुकडे खाली नदीच्या काठावर टाकले जातात आणि सुसरी पाण्यातून वर काठावर येऊन ते घेतात, आणि पुन्हा पाण्यात जातात. सुसरी दिसाव्यात म्हणून त्या वर येतात त्या जागी विजेचे दिवे लावलेले होते.

त्या सुसरी बघण्यासाठी म्हणून आम्ही जमलो. हॉटेलमधल्या माणसानं बादलीतून आणलेले मांसाचे तुकडे खाली टाकले, पण सुसरी बेट्या बाहेरच येईनात. त्यांची पोटं तुडुंब भरली होती, की त्यांनी संप केला होता ते कळायला मार्ग नव्हता. काही वेळानं त्या जिथून वर येणार होत्या तिथे पाण्यात बरीच खळबळ झाली. काय होतंय ते आम्हाला काही दिसेना आणि कळेना. हॉटेलचा माणूस म्हणाला, 'एक सुसरीचं पिलू मांसाचे तुकडे खायला वर येण्याचा प्रयत्न करत आहे. पण एक मोठी सुसर त्याला वर येऊ देत नाही'.

तिला खायचं असेल म्हणून ती पिल्लांना अडवीत असेल असं आम्हाला वाटलं. पण ती त्या पिल्लांना येऊ देईना आणि आपणही येईना.

सुसरीदेखील माणसासारखा असा अडाणीपणा करतात हे पाहून मला आश्चर्य वाटलं.

सुसरींना भूक नसावी. पण आम्हाला कडकडून भूक लागली होती. त्यामुळे आम्ही जेवायला गेलो आणि पोट तुडुंब भरेपर्यंत जेवलो.

जेवून परत येताना आम्ही डोकावून पाहिलं तेव्हा सुसरीसाठी टाकलेले मांसाचे तुकडे अदृश्य झाले होते. तेव्हा माणसांप्रमाणे सुसरीदेखील जेवून तृप्त झाल्या आहेत याचं आम्हाला समाधान वाटलं.

त्या समाधानातच खोलीवर जाऊन बिछान्यावर अंग टाकलं आणि तात्काळ गाढ झोप लागली.

कॉम्बीत बरेच तास धक्के खात प्रवास करणं हे गाढ झोप येण्याचं अत्यंत गुणकारी औषध आहे, हा अनुभव पुढे आम्हाला साऱ्या प्रवासात येत होता.

◆ ◆ ◆



## सिंह भेटलेच नाहीत!

सरोवा शाबा हॉटेलात आमचा मुक्काम दोन दिवस किंवा खरं म्हणजे दीड दिवस होता. त्यातल्या पहिल्या दिवशी आम्ही काहीसं दूर असलेलं शाबाचं जंगल पाहिलं. ते जास्तच शुष्क झालेलं होतं. त्यामुळे तिथं प्राणीही कमी होते.

दुसऱ्या दिवशी आम्ही सरोवाचं जंगल पाहायला गेलो. जोसेफनं सांगितलं, की ऊन वाढलं म्हणजे जनावरं, विशेषतः शिकार करणारे सिंह, बिबटे, चित्ते वगैरे झाडीत जाऊन सावलीत विश्रांती घेतात. ते बाहेर पडतात पहाटे किंवा सूर्यास्ताच्या वेळी; तेव्हा ते दिसायला हवे असतील, तर पहाटे साडेसहाला निघणं चांगलं. तयार आहात का साडेसहाला निघायला? त्या कॉम्बीतला प्रवास म्हणजे दगदगच होती. शिवाय चांगलंच उकडतही होतं. त्यामुळे हॉटेलच्या खोलीत आराम करावा, असे आम्हाला वाटतं होतं. उशिरा उठायचं, आमच्या खोलीतल्या आरामशीर खुर्च्यांवर बसून त्या मोठ्या खिडकीतून नदीच्या प्रवाहाकडे पाहत चहा घ्यायचा, मग दाढी, आंघोळ वगैरे उरकून त्या मचाणावर जायचं आणि चांगली ऐसपैस न्याहारी करायची, आणि नंतर आरामात साडेआठला जंगल पाहायला निघायचं, असा माझा तरी विचार होता. त्यामुळं पहाटे साडेसहाला बाहेर पडण्याचा प्रस्ताव नामंजूर करावा, असं मला तीव्रपणे वाटलं. पण आम्ही आराम करायला आलेलो नव्हतो. अरण्यातले प्राणी पाहायला आलो होतो. इथं काही करायचं ते सिंह वगैरे प्राण्यांच्या वेळापत्रकानुसार करायला हवं होतं आणि त्यांचं वेळापत्रक तर असं अडाणी होतं. त्यामुळे आम्हाला जोसेफचा प्रस्ताव मान्य करावा लागला. तरी मी काहीशा आशेनं त्याला विचारलं, ''साडेसहाऐवजी सातला निघालं, तर नाही का चालायचं?''

तो हसून म्हणाला, ''खरं म्हणजे आपण सहा वाजताच निघालं पाहिजे; पण तुम्ही वृद्ध आहात म्हणून मी तुम्हाला अर्ध्या तासाची सवलत दिली''. त्याच्या या औदार्यानं मी अर्थातच सद्‌गतित झालो आणि तूदेखील सद्‌गतित हो, असं वासंतीला सांगितलं.

पण आम्ही जरी सिंहाचं वेळापत्रक पाळलं, तरी बेट्या सिंहांनी ते पाळलंच नाही. ते आपले खुशाल कुठं तरी झाडीत आरामात झोपूनच राहिले. त्यांनीच नव्हे, तर चित्ते, बिबटे वगैरे इतर हिंस्र प्राण्यांनीदेखील तितक्याच बेशिस्त आणि बेपर्वाईचं प्रदर्शन केलं. आणि त्यामुळे पहाटे साडेसहापासून दुपारी बारापर्यंत त्या जंगलात विविध प्रकारचे धक्के, चपेटे आणि दणके खात गरागरा फिरूनदेखील आम्हाला त्यांच्यापैकी

एकही प्राणी दिसला नाही.

जंगल कसं असतं, याविषयी आपली मराठी माणसांची कल्पना सह्याद्रीतील जंगलांवरून झालेली असते. त्यामुळे जंगल म्हटलं म्हणजे त्यात अगदी किर्र झाडी असणार, खूप चढ-उतार असणार, असं आपल्याला वाटतं. पण आम्ही ज्या जंगलात फिरत होतो, ती या प्रकारची नव्हती. ती विस्तीर्ण, सपाट, गवताळ प्रदेशाची होती. त्यात गर्द झाडी अशी फारशी नव्हती. काटेरी झुडपं आणि झाडं या पलीकडे इतर प्रकारचे भव्य वृक्ष तिथं नव्हते. तिथं खूप होतं ते गवत. ते गवत खाणाऱ्या हरणं, झेब्रा वगैरे प्राण्यांचे कळप त्यात होते आणि ते ज्याचं खाद्य ते सिंह, बिबटे, चित्ते वगैरे मांसभक्षक प्राणीही होते.

हा असा सपाट, गवताळ, मोकळा प्रदेश सिंह या प्राण्याला सोयीचा. सह्याद्रीच्या जंगलात किंवा हिमालयातल्या डोंगराळ प्रदेशातही तो वस्ती करू शकणार नाही किंवा चित्त्याची चपळताही तिथं फारशी उपयोगी पडणार नाही. सह्याद्रीतला तो प्रदेश वाघांचा, बिबट्यांचा. त्यांचं तिथं वास्तव्य असतं. या गवताळ जंगलात वाघ नव्हते; पण बिबटे मात्र होते. कारण कुठच्याही परिस्थितीशी जुळवून घ्यायची आणि तिथं यशस्वी ठरायची विलक्षण क्षमता बिबट्यात असते.

पण हे सगळं तात्त्विक विवेचन झालं. या जंगलात सिंह, चित्ते आणि बिबटे असायला हवे होते. ते तिथं निश्चितच होते, असं जोसेफ आम्हाला ठामपणे सांगत होता; पण त्यातला एकही बेटा आमच्या दृष्टीस पडायला तयार नव्हता. प्राण्यांच्या या असहकाराचा अनुभव मी भारतातल्या जंगलात भरपूर घेतला होता. अहो! नागझिरा वगैरे विदर्भातल्या जंगलात वाघ, बिबटे वगैरे तर सोडूनच द्या; पण हरणं अगर गवेदेखील माझ्या दृष्टीस पडायला तयार नव्हते. फक्त वाघाच्या पावलांचे ठसे पाहून मला समाधान मानावं लागलं होतं. शिवाय मी झोपलो असताना वाघानं एक डरकाळीदेखील फोडली होती म्हणे! पण मी गाढ झोपलेलो असल्यामुळे मला ती ऐकू आली नाही.

या सरोवाच्या जंगलात गवत बऱ्यापैकी होतं. अगदीच जमिनीलगत जनावरांच्या तोंडानं खुरपलेलं नव्हतं. शिवाय इथे हिरवा पालाही अधिक होता. त्यामुळे हरणं, झेब्रे, जिराफ वगैरे प्राण्यांची संख्या अधिक होती. रानकोंबड्यांचे कळप मधूनमधून दिसत होते. आम्ही दोन डुकरंही पाहिली; पण ती रानडुकरं नव्हती. ते वॉर्ट हॉग्ज होते. दूर अंतरावर आम्हाला एक भुऱ्या रंगाचा लहान चणीचा गेंडा दिसला. हा प्राणी बिथरला तर कॉम्बीलाही धडक मारतो, असं जोसेफनं आम्हाला सांगितलं. त्यामुळं तो दूर होता याबद्दल आम्ही फारशी तक्रार केली नाही. बबून जातीच्या माकडांचाही एक कळप आम्ही पाहिला.

पण हे सगळे प्राणी शाकाहारी होते आणि त्यातलेही हत्ती आणि रानरेडे आमच्या दृष्टीस पडले नव्हते. सिंहानी मनात आणलं, तर त्यांना लपून बसणं शक्य तरी होतं; पण हत्ती हा प्राणी एवढा प्रचंड, की त्यानं मनात आणलं, तरी त्याला लपणं शक्य होणार नाही, अशी माझी कल्पना होती. पण तेही बेटे लपून बसावे आणि आम्हाला दिसू नयेत याचं मला आश्चर्य वाटलं. जसजसे तास उलटत होते, तसतसं ते आश्चर्य वाढतंच होतं. पण कालांतरानं भूक लागू लागली आणि तीदेखील वाढू लागली. पुढे पुढे तर आश्चर्यापेक्षाही भूकच अधिक झपाट्यानं वाढू लागली. इतकी की एखादा लहानसा हत्ती दिसला, तर तो मी सगळाच्या सगळा गट्ट करू शकेन, असं मला वाटू लागलं. तेव्हा असे हिंस्र विचार मनात येणं इष्ट नाही, असं ओळखून त्या लपलेल्या प्राण्यांचा शोध आम्ही थांबवला आणि हॉटेलवर परतलो.

सुदैवानं दुपारी लवकर निघायचं, असा फतवा जोसेफनं काढला नाही. त्यामुळे जेवून आम्हाला चांगली दोन-अडीच तास विश्रांती घेता

आलो.

मग चहा घेऊन नव्या मनूचे आणि नव्या दमाचे शूर शिपाई होऊन आम्ही बाहेर पडलो. आणि सुरवात तर चांगली झाली. इतका वेळ हुलकावणी देणारे रानरेडे आम्हाला अगदी जवळून पाहायला मिळाले. आम्ही जात होतो, त्या रस्त्याच्या कडेलाच एक झाड होतं. त्याच्या बुंध्याशीच एक रानरेडा डोळे मिटून झोपला होता. दुसरा त्याच्या जवळच मान खाली घालून शांतपणे उभा होता. त्यांच्या मजबूत बांध्यावरून त्यांच्या ताकदीची कल्पना येत होती. त्यांची रुंद कपाळं जणू दगडाची घडवली आहेत, असं वाटत होतं. कपाळाच्या वरच्या बाजूला आडवा पांढरा पट्टा होता आणि त्यातूनच दोन जाड शिंगं बाहेर पडून आतल्या बाजूला वळली होती. त्या मस्तकाची धडक बसली, तर 'सिंहाचंदेखील कंबरडं मोडेल', अशी खात्री वाटत होती. आतापर्यंत मी फोटो घेतले होते खरे; पण ते बरेच लांबून घेतले होते. त्यामुळे त्यात जनावरं दिसण्याची फारशी शक्यता नव्हती; पण या रानरेड्यांचा फोटो मात्र त्या मानानं चांगला स्पष्ट आला. माझ्या कॅमेऱ्यालादेखील टेलिफोटो लेन्स होती; पण तिची दृश्यं जवळ आणण्याची शक्ती फार मर्यादित होती. इतर पर्यटकांकडे त्या मनानं भल्या मोठ्या टेलिफोटो लेन्सेस असलेले कॅमेरे होते. एका चार फूट उंचीच्या अमेरिकन मुलीच्या कॅमेऱ्याची टेलिफोटो लेन्स चांगली दोन फूट लांबीची असावी.

मला अनेक गोष्टी कराव्याशा वाटतात. त्यातली एक म्हणजे पक्ष्यांचं निरीक्षण. पण माझ्या अनेक उद्योगांत तसं निरीक्षण करायला फुरसत मिळत नव्हती. म्हणून मी ठरवलं, की आपण म्हातारे होऊन 'हरी हरी' करीत स्वस्थ बसलो म्हणजे शांतपणे पक्ष्यांचं निरीक्षण करायचं. त्या वेळी दुर्बीण नसल्यामुळे अडायला नको म्हणून मी दूरदर्शीपणानं एक दुर्बीण घेऊन ठेवली होती. पण घोटाळा काय झालाय, की मी बहात्तर वर्षांचा झालो तरी म्हातारा झालेलो नाही आणि त्यामुळे 'हरी हरी' करीत बसलेलो नाही. त्यामुळे आतापर्यंत त्या दुर्बिणीचा उपयोग आम्ही करत होतो. वासंतीनं दुर्बिणीतून त्या रानरेड्याकडे बघितलं आणि ती दचकलीच. कारण त्या दुर्बिणीतून त्या रेड्याचं मुस्कट किती तरी मोठं दिसत होतं आणि आपल्यापासून ते फूटभर अंतरावर असून, आपल्याला ठो देण्याच्या बेतात आहे, असं वाटतं होतं. आता तुम्हाला म्हणून सांगतो. 'ठो' सहन करण्याच्या बाबतीत वासंती जरा कमकुवतच. मागे एकदा काही तरी उचलायला आम्ही दोघं एकदम वाकलो होतो तेव्हा मी तिला 'ठो' दिला होता. आणि त्यानंतर ती बराच वेळ डोकं घट्ट दाबून बसली होती. पुढं तिला असं आढळून आलं, की त्या दुर्बिणीतून जवळच्या गोष्टी फारच जवळ आलेल्या आणि भल्या मोठ्या दिसत होत्या खऱ्या; पण दूरच्या दूरच राहत होत्या आणि मोठ्याही होत नव्हत्या. जर्मन दुर्बिणीनं अशी फसवणूक करावी, याला काय म्हणावं?

यानंतर नवा असा प्राणी कोणताच दिसला नाही. तीच नाना प्रकारची हरणं, तेच झेब्रे, तेच जिराफ, तेच वॉर्ट हॉग्ज. पण हत्ती नाही आणि सिंहही नाही. बराच वेळ असंच चाललं होतं. त्यामुळे आम्ही अस्वस्थ झालो. सिंहावर चिडलोदेखील. म्हटलं, "असशील तू मोठा सिंह! म्हणून इतक्या लांबून आलेल्या आम्हाला दिसायचं नाही म्हणजे काय?"

सिंह बघायला काही केवळ आम्हीच आलो नव्हतो. ओहायोहून ग्रीनबर्ग कुटुंब आलं होतं. त्यांच्यापैकीच चार फूट उंचीच्या मुलीजवळ दोन फूट लांबीचा कॅमेरा होता. पॅरिसहून मॉशे रेने सहकुटुंब आले होते. ते बोलताना प्रत्येक स्वर जिराफाच्या मानेइतका लांब करीत होते. स्टुटगार्टहून हेर फोबेल्स, फ्राऊ फोबेल्स आणि प्राउलिन फोबेल्सना घेऊन आले होते. ओसाकाहून नाकामिशी कुटुंब आलं होतं. त्यातल्या प्रत्येकाच्या नाकावर चष्मा होता. कॅनडाहून जसबीरसिंग आपलं कुटुंब आणि आपलं पागोटं

यांसह आले होते आणि अहमदाबादचे बचुभाई मेहता आपल्या पत्नी चंदाबन आणि कॉम्बी भरेल एवढा सात जणांचा कबिला घेऊन आले होते. इतकी मंडळी दूरदूरच्या देशांहून आपल्याला पाहायला आलेली असताना सिंहांनी दडी मारून बसणं हे त्यांच्या इभ्रतीलाच नव्हे, तर प्रतिष्ठेलाही साजेसं नव्हतं.

जसजशी संध्याकाळ होऊ लागली, तसतशी ही मंडळी अस्वस्थ होऊ लागली. आपापल्या कॉम्बीच्या ड्रायव्हरना म्हणू लागली, "सिंह कुठे आहेत? सिंह कसे दिसले नाहीत?" तेव्हा ड्रायव्हर कॉम्बी पळवू लागले. पूर्वेकडून पश्चिमेकडे, दक्षिणेकडून उत्तरेकडे, ईशान्येकडून नैऋत्येकडे, आग्नेयेकडून वायव्येकडे अशा कॉम्बी धावत होत्या. मग त्यातल्या काही पूर्वेकडून दक्षिणेकडे आणि दक्षिणेकडून वायव्येकडे अशा वेड्यावाकड्या धावू लागल्या. मध्येच आम्ही एकमेकांच्या जवळून भरधाव जाताना एकमेकांना विचारीत होतो, "सिंह दिसले का?" आणि उत्तर म्हणून नकार एकमेकांच्या कॉम्बीत भिरकावले जात होते. आपल्या कॉम्बीत नकार किती फेकले गेले ते मी मोजले, तेव्हा ते सतरा झाले.

आता अंधार पडू लागला होता, तेव्हा या सिंहांचा नाद आपण सोडून द्यावा, असं जोसेफनं सुचवलं. पुढे मसाई मारा संरक्षित अरण्यात रग्गड सिंह आहेत, असा त्यानं आम्हाला दिलासा दिला. अंधार पडू लागला म्हणून आम्हीही त्याचं म्हणणं मान्य केलं.

वासंती म्हणाली, "या सिंहाची एवढी पत्रास नको. आमच्या बोरिवली नॅशनल पार्कमध्ये पुष्कळ सिंह आहेत. तेच आम्ही मुंबईला जाऊन पाहू"

मी म्हटलं, "तर काय! हे केनियातले सिंह स्वतःला समजतात कोण? गेले उडत".

काही वेळानं आमच्या कॉम्बीजवळ हालचाल जाणवली म्हणून नजर वळवून पाहिलं, तर बबून जातीच्या वानरांचा कळप आमच्याजवळून पुढे जाताना दिसला. त्यांच्या चेहऱ्यांवर खूप केस होते आणि त्यांना चांगल्या लोंबत्या दाढ्या होत्या. धास्ती वाटावी इतके ते बळकट होते आणि त्यातले नर तर चांगलेच आक्रमक वाटत होते. हा एवढा मोठा कळप कुठे चालला होता कोण जाणे! कदाचित पाणी प्यायला जात असावा. माद्यांची पोरं नेहमीप्रमाणे त्यांच्या पोटांना चिकटलेली होती. पण एक बिटुकलं मात्र आपल्या आईच्या पाठीवर तिचे केस हातानं घट्ट पकडून मोठ्या ऐटीत बसलं होतं भोवतालच्या जगाकडे कुतूहलानं पाहत होतं. मी पटकन त्याचा फोटो काढला. चालताना एक नर आमच्या कॉम्बीजवळ थांबला आणि जणू फोटो काढायचा पोज दिल्यासारखा बसला. त्याचाही मी फोटो काढला. आमची कॉम्बी पुढे गेल्यावर आम्हाला एक भलं मोठं मुंगूस गवतातून जाताना दिसलं. मी पाहिलेल्या कोकणातल्या मुंगसापेक्षा ते अधिक मोठं आणि केसाळ होतं. ते जात असताना गवताचा जराही आवाज होत नव्हता. मुंगूस हा तसा लहान प्राणी; पण चित्ते, बिबटे, सिंह यांनादेखील गवतातून जराही आवाज न करता जाताना मी केनियात पाहिलं आणि भारतातही पाहिलं आहे. ते प्राणी हे कसं करतात, हे मला पडलेलं एक कोडं आहे.

हॉटेलवर गेल्यावर आमच्या खोलीत जाताना एक सरड्यासारखा पण त्याच्यापेक्षाही सात-आठ पट मोठा प्राणी वाटेत दिसला. आम्हाला पाहून असेल किंवा इतर काही कारणांन असेल; पण तो एकदम पळत पळत उतारावरून खाली गेला आणि नदीत शिरला. तो प्राणी कोण होता. हे मला कळलं नाही.

आम्ही सिंह पाहिले नव्हते खरे; पण ते कोणालाच दिसले नव्हते; ही त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट होती. पण आम्ही जेवायला गेलो आणि हे आमचं समाधानदेखील हिरावलं गेलं. आमच्या शेजारच्या टेबलावर ओहायोचं ग्रीनबर्ग कुटुंब बसलं होतं. त्याच्या चार फूट उंचीच्या मुलीजवळ

तेव्हा दोन फूट लांबीचा कॅमेरा नसल्यामुळे मी प्रथम त्यांना ओळखलं नाही; पण वासंतीनं त्यांना ओळखलं आणि मिसेस ग्रीनबर्गशी ती बोलली. बोलण्याचा विषय अर्थात न दिसलेले सिंह हा होता. आता परस्परांना सहानुभूती दाखवता येईल, अशी आमची कल्पना होती. पण मिसेस ग्रीनबर्गनं आमच्यावर जणू बॉम्बच टाकला. ती संतुष्टपणे हसून म्हणाली, ''आनंदाची गोष्ट म्हणजे नंतर आम्हाला सिंह दिसले''.

''दिसले?'' आम्ही आश्चर्यानं विचारलं.

मिसेस ग्रीनबर्ग अधिकच संतुष्टपणे हसून म्हणाल्या, ''हो, दिसले आणि एक किंवा नाही दोन नाही, तर चांगले सहा दिसले. एक सिंह, दोन सिंहिणी आणि तीन बच्चे. एका झाडाखाली ते शांतपणे बसले होते. आम्ही बराच वेळ त्यांना पाहू शकलो, सॅरानं त्यांचे फोटो काढले.''

मिसेस ग्रीनबर्ग पुन्हा अधिकच संतुष्टपणे हसल्या. मग मिस्टर ग्रीनबर्गही हसले आणि आम्ही विचारलं नसताना, ते सिंह कसे दिसत होते आणि कसे बसले होते, ते त्यांनी आम्हाला सांगितले.

इकडे आम्हाला आतून इतका राग येत होता म्हणता! आम्हाला न दिसता सिंहांनी त्या ग्रीनबर्ग कुटुंबाला दिसावं, याचा आम्हाला विलक्षण राग आला. आम्ही मुंबईत राहत असल्यामुळे समाजवादी वृत्ती आमच्या हाडीमाशी खिळली होती. त्यामुळे हा भयंकर अन्याय होता, हे आम्हाला पटायला क्षणभरही वेळ लागला नाही.

मिसेस ग्रीनबर्ग सिंहांविषयी आणखीही काही सांगायचा प्रयत्न करीत होत्या; पण आम्ही आमच्या टेबलावर जाऊन बसलो आणि जेवण उरकल्यावर तडक खोलीतर निघून गेलो. मात्र जाताना तोंडभरून हसून ग्रीनबर्ग कुटुंबाचा निरोप घ्यायला विसरलो नाही.

ग्रीनबर्ग कुटुंबाच्या ड्रायव्हरला जर सिंह शोधून काढता आले, तर आमच्या जोसेफला ते का शोधून काढता आले नाहीत, असा प्रश्न आम्ही एकमेकांना विचारला आणि हा दोष जोसेफचाच, असं एकमेकांना सांगून टाकलं. यामुळे आम्हाला सात्त्विक संताप करून घेता आला आणि तसं संतप्त होण्याचा उच्च नैतिक आनंद अनुभवत असतानाच आम्हाला गाढ झोप लागली.

आज सामान मांडायचं आणि उद्या आवरायचं, याची आम्हाला आता सवय व्हायला लागली होती. त्यामुळे सकाळी उठून आम्ही सारं उरकून सामान आवरलं आणि मग ब्रेकफास्ट घेऊन ठरल्या वेळी म्हणजे साडेसातला हॉटेलच्या दाराशी दाखल झालो. खरं म्हणजे सात वाजताच निघायला हवं होतं. पण आम्ही वृद्ध असल्यामुळे जोसेफनं आम्हाला उदारपणे अर्ध्या तासाची सवलत दिली होती. हे तुम्ही ओळखलं असेलच.

कॉम्बीत बसल्याबरोबर आम्ही जोसेफला सिंहांबद्दल प्रश्न विचारला. म्हटलं ...पण आम्ही काय म्हटलं ते देखील तुम्ही ओळखलं असेलच.

जोसेफ हसून म्हणाला, ''तुम्ही मला हा प्रश्न विचारणार हे मला माहीत होतं. कारण कालच इतर अकरा ड्रायव्हरांना त्यांच्या त्यांच्या कॉम्बीतल्या प्रवाशांनी हा प्रश्न विचारला. त्यामुळे ते सगळे ड्रायव्हर ग्रीनबर्ग कुटुंबाच्या कॉम्बीच्या ड्रायव्हरवर खूपच संतापले.''

त्यांनी संतापावं हे साहजिक होतं. कारण आपल्याला एखाद्या ठिकाणी काही पाहण्यासारखं दिसलें, की वाटेत भेटणाऱ्या प्रत्येक कॉम्बीच्या ड्रायव्हरला ते सांगायचं, हा तिथला शिष्टाचार आहे. आम्ही विचारलं, ''म्हणजे तो ड्रायव्हर अप्पलपोटेपणानं वागला म्हणतोस?''

जोसेफ म्हणाला, ''नाही. त्यानं तसं केलं नाही. आपण आधीच हॉटेलवर यायला निघालो होतो; पण त्यानं इतर सगळ्या ड्रायव्हरना सिंह कुठे पाहिले, ते सांगितलं. तेव्हा सगळे कॉम्बी पळवत त्या जागी गेले. पण ते गेले तेव्हा सिंह तिथं नव्हते. त्यामुळे त्या ड्रायव्हरच्या कॉम्बीतले लोक म्हणू लागले, ''तुम्ही त्यानं सांगितलेल्या जागी आम्हाला आणलंच नाही.

तुम्ही भलत्याच जागी आणलंच म्हणून आम्हाला सिंह दिसले नाहीत.''

साहजिकच ते ड्रायव्हर रागावले आणि हॉटेलवर आल्यावर ड्रायव्हरला जाब विचारला. ते म्हणाले, '' तू आम्हाला बरोबर माहिती दिली नाहीस. असं का केलंस? यापुढे आम्हीदेखील तुला काही माहिती देणार नाही.''

त्यावर तो बिचारा गयावया करू लागला.

मग एक ड्रायव्हर म्हणाला, ''तू मुळी सिंह पाहिलाच नाहीस. खोटंच सांगितलंस.''

आपण खरोखर सिंह पाहिले, असं तो ड्रायव्हर पुन्हा पुन्हा सांगत होता. पण इतर ड्रायव्हर ते खर मानीत ना. अखेर तो त्यांना ग्रीनबर्ग कुटुंबाकडे घेऊन गेला आणि त्यांनी, आपण खरोखर सिंह पाहिले आणि ते त्याच जागी पाहिले असं सांगितलं. तेव्हा ड्रायव्हरांचं समाधान झालं.

तुमच्या लक्षात आलं असेलच, की हा दोष त्या सिंहांचा होता. फक्त ग्रीनबर्ग कुटुंबाला दिसायचं आणि मग इतर पर्यटक तिथे यायच्या आधीच निघून जायचं, हे सभ्यपणाचं नव्हतं आणि न्यायीपणाचंही नव्हतं. एवढे केनियाला जाऊन आलो आणि सिंह मुळी पाहिलेच नाहीत, असं नाकामिशींना ओसाकात, हेर आणि फ्राऊ फोबेल्सना स्टुटगार्डला, जसबीरसिंगांना कॅनडातल्या समस्त शीख जमातीला सांगावं लागणं किती नामुष्कीचं होतं, हे त्या सिंहांनी ध्यानात घ्यायला हवं होतं.


◆ ◆ ◆







मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)



## मुक्काम विषुववृत्तावर

आता बराच वेळ धसके, दणके वगैरे खात रुक्ष, निर्मनुष्य प्रदेशाकडे बघायचं अशी मनाची तयारी करून आम्ही आमच्या कॉम्बीत बसलो होतो. बरं या प्रवासात नावीन्य असं काहीच नव्हतं. कारण ज्या रस्त्यानं आम्ही शाबाला आलो होतो त्याच रस्त्यानं आम्ही परत जाणार होतो. येताना आम्हाला वाटेत जो माऊंट केनिया दिसला होता त्याच्याजवळ बांधलेल्या जगप्रसिद्ध केनिया सफारी क्लबमध्ये आम्ही दोन रात्री मुक्काम करणार होतो. ते ठिकाण फार सुंदर म्हणून गाजलेलं होतं; पण ते अजून दूर होतं. आणि तिथं जाईपर्यंत आमची हाडं चांगलीच खिळखिळी होणार होती.

पण आश्चर्य म्हणजे, हा परतीचा प्रवास अपेक्षा केली होती तेवढा तापदायक आणि कंटाळवाणा झाला नाही. एक म्हणजे धसके आणि दणके सहन करायची आम्हाला दोन दिवसांतच सवय झाली होती. वेगळ्या परिस्थितीशी जुळवून घ्यायची, जे असह्य वाटतं ते सहन करायची इतकी क्षमता आमच्या अंगी आहे, हे पाहून मला पुन्हा एकदा आश्चर्य वाटलं. पुन्हा एकदा म्हटलं ते एवढ्यासाठी, की हा अनुभव माझ्या स्वत:च्या बाबतीतच नव्हे, तर इतरांच्या बाबतीतही अनेकदा आला होता. अगदी चारचौघांसारखी सामान्य माणसं अगदी वेगळ्या अपरिचित आणि अनपेक्षित परिस्थितीतून मार्ग काढताना मी पाहिली होती.

परत जातानाचा प्रवास तसा कमीच त्रासदायक होता. कारण अगदी वाईट रस्त्यावरून जेव्हा प्रवास करायचा होता तेव्हा आम्ही ताजेतवाने होतो आणि जसजसे आम्ही पुढे गेलो तसतसा रस्ता सुधारत होता. शिवाय उकाडा कमी होता. कारण आम्ही माऊंट केनियाची चढण चढत होतो. भोवतालचं दृश्यही सुखदायक होत होतं. खुरटं वाळकं गवत आणि काटेरी झुडपं यांनी व्यापलेला सॅव्हानाचा रुक्ष रखरखीत प्रदेश आता मागे पडत होता. अधिक दाट झाडी आणि हिरवं गवत आता दृष्टीस पडत होतं. थोड्या वेळानं मक्याची, गव्हाची विस्तीर्ण शेतं दुतर्फा दिसू लागली.

मग एकाएकी जोसेफनं गाडी थांबवली. तो म्हणाला, "येताना विषुववृत्ताजवळ थांबायचं असं आपलं ठरलं होतं. हे आलं विषुववृत्त!"

मी विचारलं, "कुठे आहे?"

तेव्हा त्यानं आम्हाला रस्त्याच्या कडेला असलेल्या एका पाटीजवळ नेलं. तिच्यावर लिहिलेलं होतं - 'इक्वेटर - लॅटिट्यूड शून्य'

घ्या! म्हणजे ज्या विषुववृत्तानं इतकी वर्षं मला हुलकावण्या दिल्या

होत्या ते असं आपलं केनियातल्या या साध्यासुध्या रस्त्यावर होतं आणि इथली माणस आपली रोज पन्नास वेळा तरी ते ओलांडत होती. मी वासंतीला त्या पाटीच्या खाली थेट विषुववृत्तावर उभं राहायला संगितलं आणि तिचा फोटो घेतला. तेवढ्यात तिथं एक तरुण जपानी जोडपं आलं आणि त्यातल्या पुरुषानं आपल्या बायकोला विषुववृत्तावर उभं केलं आणि तिचा फोटो काढला.

वासंती म्हणाली, ''त्याला सांगा ना आपला दोघांचा फोटो काढायला.''

तेव्हा मी त्याला तशी विनंती केली आणि त्याच्या हातात माझा कॅमेरा दिला. कॅमेरा अर्थात जपानीच होता. त्यानं आनंदानं आमचा फोटो काढला. फोटो काढून घेताना या कानापासून त्या कानापर्यंत चांगलं रुंद हसायला मी विसरलो नाही. मग त्या जपानी तरुणानं आपला कॅमेरा माझ्या हातात दिला आणि ती दोघं विषुववृत्तावर उभी राहून रुंद हसली. मी त्यांचा फोटो काढला.

फोटो काढून घेताना मी इतका व्यवस्थित उभा राहिलो होतो, की माझा चवडा दक्षिण गोलार्धात आणि माझी खोट उत्तर गोलार्धात होती.

मी विषुववृत्तावर जाऊन आलो, याचा असा सज्जड पुरावा तयार केल्यावर इकडेतिकडे बघितलं तेव्हा मला आढळून आलं की, विषुववृत्तावर केनियातल्या लोकांनी एक छोटीशी बाजारपेठच उभारली होती. त्यात लाकडाच्या आणि चामड्याच्या वस्तूंशिवाय माळा, लाकडी मुखवटे वगैरे गोष्टी विकायला ठेवलेल्या होत्या.

जोसेफ म्हणाला, ''या दुकानांत जाऊन खरेदी करायला काही हरकत नाही. इथं तुम्ही सुरक्षित आहात.''

हा सुरक्षितपणाचा उल्लेख पुन्हा पुन्हा होत होता, तेव्हा केनियात परदेशातल्या माणसांनी जपून वावरणं आवश्यक होतं हे उघडच होतं. पण केनियात इतका प्रवास केल्यावरही असुरक्षित वाटावं असं ठिकाण मला आढळलं नाही. रस्त्यातून गावातून शांतपणे, निरुपद्रवीपणे माणसं वावरत होती. आपले नित्याचे व्यवहार करीत होती. त्यामुळे सुरक्षितपणाबद्दल इतकी जागरुकता का दाखविली जात होती याचा उलगडा मला परत येईपर्यंत नीटसा झालाच नाही.

त्या बाजारपेठेत दुकानं बरीच होती आणि तिथं विकायला होत्या फक्त लाकडाच्या आणि चमड्याच्या वस्तू आणि नाना प्रकारच्या माळा. त्या सगळ्या हातांनी नाही, तर साध्या यंत्रांच्या साह्यानं बनविलेल्या होत्या. आपल्या देशातले कारागीर जितक्या विविध प्रकारच्या वस्तू बनवितात तितक्या तिथं नव्हत्या आणि तिथल्या कारागिरीचा दर्जादेखील बेताचाच होता. पण त्या दुकानांतले विक्रेते मात्र आपल्या बाजारातल्या विक्रेत्यांइतकेच उत्साही होते. गिऱ्हाईकाला आपल्या दुकानात यायला लावणं, त्याला अनेक वस्तू दाखविणं, त्यानं त्या घ्याव्या म्हणून गोड बोलणं आणि किमतीच्या बाबतीत घासाघीस करणं, या बाबतीत हे आफ्रिकन लोक आपल्या बनियांपेक्षा कमी कुशल आणि उत्साही आहेत, असं मुळीच म्हणता येतं नव्हतं. मला त्यांचं कौतुक वाटलं. हे आज मागासलेले आहेत, पण झपाट्यानं पुढं जाऊ शकतील असा विश्वास वाटू लागला.

या बाजारपेठेतील घासाघीस मात्र चक्रावून सोडणारी होती. कारण मागितलेली किंमत अमुक एक असली तरी खरी किंमत किती असेल, याचा काही हिशेबच मांडता येत नव्हता. आम्ही गेलो त्या दुकानातल्या किमती इतक्या जास्त होत्या, की आम्ही काही न बोलताच बाहेर पडण्याच्या बेतात होतो; पण 'तुम्हाला ॲडजस्ट करून देतो, तुम्ही काय देणार ते सांगा,' असं तो म्हणू लागला. केनियातल्या दुकानात घासाघीस करताना किंमत तोंडानं बोलत नाहीत, कागदावर लिहून दाखवितात. यानं काय साधतं कोण जाणे! पण हा सर्वसामान्य रिवाज दिसला. आम्ही गेलो त्या प्रत्येक दुकानात हाच कार्यक्रम झला. त्यानं कमी केलेली किंमतही फार

जास्त वाटली. म्हणून आम्ही तरीही बाहेर पडायला लागलो. तेव्हाही 'तुमची किंमत काय ते सांगा,' म्हणून तो आमच्या मागेच लागला. अखेर वासंतीनं तिच्या मनात असलेली किंमत सांगितली. ती इतकी कमी होती, की हा सौदा आता तुटला असं मला वाटलं. पण बऱ्याच वेळा कागदावर किंमत लिहिण्याचा कार्यक्रम झाल्यावर आणि त्याच मिट्ठास बोलणं ऐकल्यावर वासंतीनं देऊ केलेल्या किमतीच्या आसपास सौदा तुटला.

हा सगळाच अनुभव मला गमतीचा वाटला. आफ्रिकेतल्या कृष्णवर्णीय लोकांचं जे एक चित्र वृत्तपत्रातल्या बातम्या वाचून माझ्या मनात तयार झालं होतं त्याहून हे केनियातले लोक मला खूपच वेगळे वाटले. एकदा मनात आलं, की आमच्या मराठी दुकानदारांना गिऱ्हाईकाशी कसं वागावं ते शिकायला केनियात पाठवावं.

नैरोबीत भेटलेले एक मराठी गृहस्थ नंतर मला माऊंट केनिया सफारी क्लबमध्ये भेटले. त्यांनी सांगितलं, की दुकानात गेल्यावर घासाघीस करण्याचा हा कार्यक्रम अगदी चहा, साखर यासारखे नित्य लागणारे पदार्थ घेतानादेखील करावा लागतो. नवीन निघालेली सुपर मार्केट सोडली तर ठरलेली किंमत ही गोष्टच केनियातल्या दुकानात नसते. केनियातल्या गृहिणींना ही एक डोकेदुखीच असावी.

परदेशातल्या अशा छोट्याशा बाजारपेठेत फेरफटका मारणं हा एक मजेदार अनुभव असतो. तिथली माणसं आणि त्याची वागणूक यांचं बहुरंगी दर्शन तुम्हाला घडतं.

खरेदीचा कार्यक्रम उरकल्यावर आम्ही कॉम्बीत बसलो आणि मग काही वेळ पक्क्या आणि काही वेळ कच्च्या रस्त्यावरून नित्याचे धसके, दणके वगैरे खास प्रवास केल्यावर आम्ही माऊंट केनिया सफारी क्लबमध्ये जाऊन पोचलो.

तिथं गेलो आणि एकदम केनियातून इंग्लंडमध्ये आलो आहोत असं वाटल. सात हजार फूट उंचीवर असलेल्या त्या ठिकाणची हवा इंग्लंडमध्ये उन्हाळ्यात असते तशी थंड आणि प्रसन्न होती. इंग्लंडमध्ये असतं तसंच तिथलं वातावरण ढगाळ होतं. मध्येच स्वच्छ सूर्यप्रकाश पडत होता आणि ते सारं दृश्य प्रसन्नपणे उजळत होतं. तिथली हवा कशी अगदी स्वच्छ आणि पारदर्शक होती! ऊन पडलं की ती चमकदार व्हायची.

माऊंट केनिया सफारी क्लबची शुभ्र पांढरी दुमजली इमारत केवढी तरी मोठी आहे. एखाद्या ड्यूकच्या वाड्याचा असावा तसा तिचा 'विस्तार' आणि दिमाख आहे. एका उतारावर उभी असल्यामुळे तीन पातळ्यांवर ती बांधलेली आहे आणि तिची वेगवेगळी छपरं कौलारू आहेत. इंग्लिश घराला 'फायर प्लेस' हवीच. थंडीच्या दिवसांत त्या फायर प्लेससमोर बसून त्यातल्या ज्वाळांकडे पाहत विस्तवाचा शेक घ्यायचा हा इंग्लिश आयुष्यातला मोठा सुखकारक अनुभव असतो. 'फायर प्लेस' मधला धूर निघून जावा म्हणून घराला एक चिमणी असावी लागते. त्यामुळे प्रत्येक इंग्लिश घराच्या डोक्यावर एक चिमणी असते आणि मोठ्या उमरावांच्या वाड्यावर अनेक चिमण्या असतात. अशा अनेक शुभ्र चिमण्या माऊंट केनिया सफारी क्लबच्या कौलारू छपरातून वर आलेल्या होत्या.

मोठाल्या काचेच्या खिडक्या ही इंग्लिश वाड्यांची खासीयत. अशा मोठाल्या खिडक्या त्या क्लबच्या तळमजल्यावरच्या प्रशस्त दालनात होत्या. त्या दालनातल्या गुबगुबीत आरामशीर कोचावर बसून बाहेर पाहिलं की एक केवढं तरी विस्तीर्ण लॉन दिसायचं. असं प्रशस्त हिरवंगार लॉन मोअरनं एका रेषेत कापलेलं लॉन असणं हाही इंग्लिश वाड्यांच्या घरंदाज दिमाखांचा महत्त्वाचा भाग असतो. हे लॉन दृष्टीच्या टप्प्यापर्यंत पसरलेलं असणं, त्यात काही भव्य वृक्ष असणं आणि एखादा जलाशय असणं हादेखील या वाड्याच्या राजेशाही दिमाखाचा भाग असता. या जलाशयात पांढरे शुभ्र हंस व इतर पक्षी तरंगत असतात.

हे सगळं माऊंट केनिया सफारी क्लबच्या इमारतीसमोर होतं. लॉनवर काही अंतरावर एक देखणा पाण्याचा तलाव होता आणि साधारणशी थंडी असली तरी पोहता यावं म्हणून त्यातलं पाणी तापवून कोमट करण्याची व्यवस्था तेथे होती. त्याच्या पलीकडे झाडीनं वेढलेला एक जलाशय होता. त्यात आणि आसपास बदक आणि इतर पक्षी होते. त्यातल्या काही मोठ्या गंभीर मुद्रा करून उभ्या राहिलेल्या पक्ष्यांचे पंख वकिलांच्या गाऊनसारखे दिसत होते. ते एवढे कसल्या गंभीर विचारात गढले होते ते कळत नव्हतं.

त्या लॉनवर फिरणारे अत्यंत देखणे पक्षी म्हणजे क्रेस्टेड क्रेन. लांब पाय, घाटदार आकाराचा पांढरा, भुरा, निळसर, राखाडी रंगाचा पिसारा, काळं डोकं, डोळ्यांच्या खाली एक पांढरा ठिपका, तोकडी चोच आणि डोक्यावर पिवळसर तुरा असं त्याचं नेटकं, देखणं, बहुरंगी रूप होतं. त्यांच्या कंठाजवळ एक लाल ठिपका होता आणि त्याच्या चालण्याचा नोकझोक मोठा आकर्षक होता. तिथल्या एका काळ्या रक्षकाला मी त्या पक्षाचं नाव विचारलं तेव्हा तो 'सारस' असं म्हणाला. मला आश्चर्य वाटलं. हा आमच्या संस्कृत व भारतीय भाषांतला शब्द याच्या तोंडात कसा, ते मला कळेना. या बाबतीत मी त्या प्रश्न विचारणार होतो, पण काही तरी झालं आणि ते तसंच राहून गेलं. मी मोकळा झालो तेव्हा तो रक्षक तिथून निघून गेला होता. मग तो प्रश्न विचारणं राहिलं ते राहिलंच!

या जलाशयाजवळ लांबलचक चोची असलेले पेलिकन पक्षीदेखील होते. माना आत ओढून ते बसलेले होते. तसं बसून राहायचा त्यांना कंटाळा कसा येत नाही, याचं मला आश्चर्य वाटत होतं.

या पक्ष्यांपैकी एक क्रेस्टेड क्रेन मात्र चहा घ्यायच्या प्रशस्त दालनाच्या काचेच्या खिडकीबाहेर येऊन उभा राहत असे, आणि आत सारखा बघत असे. अधूनमधून चहा घेणारी मंडळी केकचा अगर बिस्किटाचा तुकडा दाराजवळ जाऊन त्याला देत असत आणि तो तुकडा तो मटकावीत असे. बाकीचे क्रेन पक्षी इकडे फिरकत नव्हते. लॉनमध्ये तोंड खुपसून ते काहीतरी खात असत.

हे सगळे पक्षी तिथल्या वातावरणाशी मिळतेजुळते होते; पण एकाएकी मोराची केका कानावर आली तेव्हा मला आश्चर्याचा मोठा धक्का बसला. मनात म्हटलं, हा मोराचाच आवाज ना? की दुसऱ्या कोणाचा? कुतूहलानं इकडेतिकडे पाहिलं. मोर काही कुठे दिसेना. पण मग तो डाव्या बाजूनं कुठून तरी आला आणि आपला मखमली निळा रंग आणि झुपकेबाज निळासोनेरी पिसारा मिरवीत खिडकीच्या समोरून उजव्या बाजूला निघून गेला. पाश्चात्य धाटणीचे कपडे घातलेल्या गोऱ्या स्त्रियांमधून भारतीय वस्त्रालंकार ल्यालेली रूपवती आपल्याच तोऱ्यात इकडून तिकडे जावी तसं झालं. मला प्रश्न पडला, की हा मोर केनियातला की भारतातून आणलेला? पण या प्रश्नाचं उत्तर शोधून काढणंदेखील राहूनच गेलं.

या लॉनवर इतर अनेक पक्षी उतरत होते आणि चिवचिवाट करीत उडून जात होते. काही निळे होते, काही भुरे होते आणि काहींच्या पंखांवर पांढरे ठिपके होते.

कर्कशपणे ओरडणारा कावळा तिथं नसेल हे कसं शक्य होतं? तो होताच, आणि भांडखोर आवाजात कर्कशपणे ओरडून आपली दखल घ्यायला लोकांना भाग पाडत होता.

या प्रशस्त लॉनला जोडूनच पलीकडे एक गोल्फ कोर्स होता. तो पार नजरेच्या टप्प्यापलीकडे पसरलेला होता. त्याच्या पलीकडे झाडी होती. आणि दूर अंतरावर माऊंट केनियाची पर्वतराजी उंच आकाशात चढली होती. माऊंट केनियाचं सर्वोच्च घुमटाच्या आकाराचं शिखर अगदी समोर होतं, पण वातावरण इतकं ढगाळ होतं, की ते दिसत नव्हतं आणि बाकीच्या पर्वतराजीचं अस्तित्वदेखील अगदी अस्पष्टपणे जाणवत होतं.

क्लबच्या डाव्याउजव्या बाजूला झाडी होती आणि त्या झाडीत पाहुण्यांसाठी छोट्या, देखण्या बंगल्या बांधलेल्या होत्या. त्याच्या पलीकडे उजव्या बाजूला गर्द झाडीतून वाहणारी एक नदी होती. ती दिसत नव्हती, पण तिच्याकडे नेणारी एक पायवाट दिसत होती.

एकदा त्या वाटेनं एक गाढव जोडलेली गाडी क्लबला लागणारा माल घेऊन जाताना मला दिसली. छोटी छोटी गाढवं जोडलेल्या अशा गाड्या मला रस्त्यातही दिसल्या होत्या. गाढवं इतकी गोजिरवाणी आणि तरतरीत दिसू शकतात आणि गाडीला जोडल्यावर बऱ्यापैकी पळतात याची मला कल्पनाच नव्हती. कारण मी पाहिली होती आमच्या महाराष्ट्रातल्या रस्त्यात मख्खपणे उभी राहिलेली आणि उभ्या उभ्या झोपलेली गाढवं.

या क्लबचं आवार खूपच मोठं होतं. त्यात एक छोटंसं अरण्यही होतं. त्यात हत्ती, गेंडे वगैरे अनेक प्रकारचे प्राणी होते. एक सबंध दिवस अगर अर्धा दिवस त्यात हिंडून प्राणी पाहायची सोय होती.

क्लबची एकंदर रचना आणि सजावट उत्तम इंग्लिश क्लबची आठवण करून देणारी होती आणि अर्थात तो एक सफारी क्लब आहे हे त्या सजावटीतून साहजिकच व्यक्त होत होतं. क्लबच्या कॉरिडॉरमध्ये आणि प्रशस्त लाउंजेसमध्ये शिकार केलेल्या प्राण्यांची डोकी लाकडाच्या ठोकळ्यांवर बसवून भिंतींवर टांगलेली होती. रानरेडे, सिंह, बिबटे इत्यादि प्राण्यांच्या शिकारी क्लबच्या सभासदांनी केल्या होत्या आणि ही डोकी क्लबला भेट म्हणून दिली होती. एक लाउंजच्या दाराशी हत्तींचे केवढे तरी मोठे सुळे उभे ठेवलेले होते.

तळमजल्यावरच्या माउंट केनियाचं दर्शन देणाऱ्या दालनात ही निरनिराळी लाउंजेस होती. एकात बार होता आणि तिथंच दुपारच्या चहाचीदेखील सोय होती. इतर लाउंजेसमध्ये पत्ते आणि इतर बैठे खेळ खेळायची व्यवस्था होती. बिलियर्डचं टेबल अर्थातच होतं. कॉरिडॉरच्या अगदी एका टोकाला केवढी तरी प्रशस्त डायनिंग रूम होती.

आम्हाला त्या लांबलचक इमारतीच्या जवळजवळ एका टोकाची खोली दिली होती. खोली चांगली होती. कारण तिच्यातून माउंट केनियाचं दर्शन घडत हातं. खोलीत अर्थातच सगळ्या आधुनिक सुखसोयी होत्या. टेलिव्हिजन, टेलिफोन, उत्तम प्रशस्त टब असलेली आणि शॉवरचीही सोय असलेली बाथरूम, ऐसपैस गुबगुबीत बिछाने, बसायला आरामशीर खुर्च्या, एका कोपऱ्यात छोटासा बार अशा सगळ्या सोयी होत्या. भिंतीवर सुंदर चित्रं फ्रेम करून लावलेली होती. या सोयी चांगल्याच होत्या. पण त्या सगळ्याच चांगल्या हॉटेलांत असतात. त्यामुळे मला त्याची अपूर्वाई वाटली नाही. मला अपूर्वाई वाटली ती त्या खोलीतल्या फायर प्लेसची.

हल्ली सर्व चांगल्या हॉटेलात सेंट्रल हीटिंग असतं. त्यामुळे बाहेर कडाक्याची थंडी असली तरी आतलं वातावरण उबदार आणि सुखकारक असतं. या खोल्यांत सेंट्रल हीटिंग नव्हतं आणि फायर प्लेसमध्ये खरेखुरे लाकडाचे ओंडके होते शिवाय ते जळून गेले तरआत घालण्यासाठी आणखी दोन ओंडके जवळच ठेवलेले होते. फायर प्लेसमधला विस्तव पेटवणं हे कौशल्याचं काम असतं. मला ते जमण्यासारखं नव्हतं. त्यामुळे इतकी छान सोय असूनही शेकोटीचा आनंद मला मिळणार नाही अशी मला शंका वाटत होती; पण काळोख पडू लागला आणि थंडी चांगलीच जाणवू लागली तेव्हा हॉटेलमधला सेवक आमच्या खोलीत आला आणि त्यानं ती शेकोटी उत्तम प्रकारे पेटवली. काळोखात तिच्या ज्वाळाचं नर्तन पाहत असताना मन कसं उबेत सुखावत होतं. एक आदिम अशी शांती अनुभवत होतं. स्वप्नांच्या परीकथांच्या विश्वात गेल्यासारखं वाटत होतं. फर्रकन एखादी ज्वाळा पेटली म्हणजे वाटत हातं, की तिच्यातून एखादी परी तर बाहेर येणार नाही!

माझ्याजवळ उत्तम फ्रेंच कॉनियॅक होती. वासंतीसाठी मी थोडी पोर्ट वाइन आणली होती. आम्ही दोघं पेले हातात घेऊन ते मद्य चाखत त्या शेकोटीच्या उबेत बसलो. तिच्या प्रत्येक ज्वालेचं वेगळेपण माझं मन नोंदत होतं.

त्या क्लबमधलं एकंदर वातावरण अगदी ब्रिटिश होतं. तिथल्या सेवकांचे पोशाख, शिष्टाचार, आदब, बोलणं या सगळ्यांवर ब्रिटिश छाप होती. सेवकवर्ग सगळा काळाच होता; पण त्यांनी ती सगळी जुनी रीतभात आणि ते वातावरण अगदी अगत्यानं आणि प्रेमानं जसंच्या तसं सांभाळलं होतं. डायनिंग रूममध्ये विशेषतः रात्रीच्या वेळी अनौपचारिक पोशाख करून जायला बंदी होती. अगदी डिनरसूट वापरावा असा आग्रह नव्हता, पण अंगात जॅकेट असावं, वगैरे किमान अपेक्षा ठेवलेल्या होत्या. व्यवस्थित कपडे करून माणसं जेवायला येत होती आणि त्यामुळे तिथल्या वातावरणाला एक विशेष शान आली होती.

या सगळ्या ब्रिटिश वातावरणाशी विसंगत अशी एक गोष्ट मात्र मला तिथं दिसली आणि ती पाहून मला गंमत वाटली. तिथं एका बाजूला भारतीय अन्न ठेवलेलं होतं. भांड्यात होती भेंड्याची ताकातली भाजी, दुसऱ्या भांड्यात होती मसालेदार बटाट्याची भाजी, तिसऱ्या भांड्यात होती मसुराची डाळ, चौथ्यात होते खुसखुशीत परोठे आणि पाचव्या भांड्यात होते गुलाबजाम वगैरे गोड पदार्थ.

हे कसं काय झालं, याचं आश्चर्य वाटून मी आजूबाजूला पाहिलं. तेव्हा माझ्या डोक्यात एकदम प्रकाश पडला. तेथे आलेल्या पाहुण्यांत गुजराती लोकांची फार मोठी संख्या होती. केनियातला पुष्कळसा व्यापार व अनेक उद्योग या गुजराती लोकांच्या मालकीचे आहेत. केनियातला तो एक अत्यंत संपन्न वर्ग आहे. त्यांची संख्याही गोऱ्या लोकांच्या संख्येपेक्षा पुष्कळ जास्त आहे.

साहजिकच धंदा करायचा असेल तर त्यांच्या आवडीनिवडी लक्षात घ्याव्या लागतात. माऊंट केनिया सफारी क्लब भले ब्रिटिश परंपरा कसोशीने पाळणारा असेल; पण त्याला जर गिऱ्हाईकं हवी असतील तर गुजराती लोकांच्या आवडीनिवडी सांभाळणं त्याला भाग होतं.

या गुजराती लोकांना अमेरिकेतही असं महत्त्व प्राप्त होताना दिसतं आणि ते पाहून मला त्यांचं अतिशय कौतुक वाटलं. त्याबरोबरच अशी खंतही वाटते, की मराठी लोकांच्या बाबतीत जगात असं कुठेच झालेलं दिसत नाही.

जेवण चालू असताना एक फारच गमतीदार घटना घडल. एकदम एकाएकी डायनिंग हॉलमधले दिवे मालवले गेले. मी म्हटलं, 'अरे बाप रे! आमच्या हिंदुस्थानात जाते तशी इथंही वीज जाते की काय!'

तेवढ्यात आफ्रिकन ड्रम वाजू लागले. गाण्याबजावण्याचा आवाज ऐकू येऊ लागला. मग पारंपारिक आफ्रिकन टोळ्यांतल्या माणसांचा पोशाख केलेल्या लोकांनी हातात पेटत्या मशाली घेऊन डायनिंग हॉलमध्ये आपले पारंपारिक लांबडे ड्रम वाजवीत व नाचत प्रवेश केला आणि ते गाणी म्हणत ड्रम वाजवीत एका टेबलाजवळ बसलेल्या जोडप्याकडे गेले. त्यांनी एक मोठा बर्थ डे केक त्यांच्यापुढे ठेवला. मग आधी स्वाहिली भाषेत गाणं म्हटलं आणि नंतर इंग्रजीत आणि 'हॅपी बर्थ डे' हे गाणं म्हणायला सुरवात केली.

इतका वेळ श्वास रोखून काय होतंय ते पाहणाऱ्या आम्हा सर्वांच्या डोक्यात आता प्रकाश पडला. तेवढ्यात दिवेही लागले, आणि आम्ही सर्वांनी टाळ्या वाजवून त्या बाईचं अभीष्ट चिंतन केलं.

त्यानंतर अधिकच उल्हसित वातावरणात जेवण पार पडलं.

ते उल्हसित वातावरणात पार पडण्याचं आणखी एक कारण म्हणजे ते चवदार होतं. 'केनियातलं उत्तम जेवण हवं असेल तर इथं या,'

हा त्या क्लबचा दावा म्हणजे पोकळ प्रौढी नव्हती. जेवण खरंच छान होतं. परदेशातल्या उपहारगृहात भारतीय जेवण म्हणून जे दिलं जातं ते सामान्यत: बेचव असतं. फार काय, भारतातल्या पंचतारांकित हॉटेलांतही त्याची चव फिकीच असते. पण माऊंट केनिया सफारी क्लबमधलं गुजराती जेवण कुणा अस्सल गुजराती महाराजानं रांधल्यासारखं लागत होतं. पाश्चात्य पद्धतीचं जेवण अर्थातच चांगलं होतं, आणि ज्या मी मोठ्या चवीनं खातो त्या स्वीट डिशेस तर प्रसिद्ध होत्या. अजून आठवण झाली म्हणजे तोंडाला पाणी सुटतं.

रात्रीचं जेवणच नव्हे, तर सकाळची न्याहारी आणि दुपारचं जेवणही छान होतं. इतरत्रही फळं होती पण ती इतक्या विविध प्रकारची आणि उत्तम दर्जाची नव्हती. मात्र इथं ती अनेक प्रकारची आणि चवदार होती. माझ्या लक्षात राहिले ते अननस. जगातल्या अनेक देशांत मी अननस खाल्ले आहेत; पण केनियातल्या अननसांना जी अप्रतिम आंबट-गोड चव होती तिला तोड नव्हती. अननसाला इथं 'अननस'च म्हणतात बरं का. शिवाय जर्मनीतही त्याला 'अननस' म्हणतात. हे इंग्लिश लोकच बेटे त्याला 'पाइन ॲपल' का म्हणतात, ते कळत नाही. दुपारच्या चहाला मात्र अपेक्षित स्वाद नव्हता. त्यापेक्षा अधिक चांगला चहा आम्ही आधीच्या हॉटेलात घेतला होता. चहाबरोबर दिलेले नाना प्रकारचे केक, बिस्किट वगैरे पदार्थ मात्र चांगलं रुचकर होते.

या हॉटेलात सुंदर दृश्यं दिसावी, चविष्ट अन्न चाखता यावं आणि आरामात राहता यावं. अशी व्यवस्था तर होतीच, पण पाहुण्यांना नाना प्रकारचे खेळ खेळता यावेत आणि छंद पुरवता यावेत, अशीही व्यवस्था होती.

मोठा गोल्फ कोर्स तर होताच, शिवाय टेनिस, स्क्वॅश, स्नूकर, क्रॉके वगैरे खेळ खेळण्याचीही व्यवस्था होती. बाउलिंग करता येत होतं आणि पोहण्याचा तलावही होता. ज्यांना जॉगिंग करायचं होतं त्यांच्यासाठी निरनिराळ्या लांबीची रिंगणं आखलेली होती. फिशिंग रॉड हातात घेऊन समाधिस्थ होणाऱ्यांची उत्तम व्यवस्था होती आणि त्यांच्या गळाला ट्राउट मासे लागावे म्हणून ते पाण्यात सोडलेले होते. गिर्यारोहकांसाठी माऊंट केनियाच्या पर्वतराजीवर चढाई करायची सोय होती. पक्षीनिरीक्षणासाठी खास कुठे जाण्याची गरज नव्हती. आणि छोट्या राखीव अरण्यात अनेक प्रकारचे वन्य प्राणी पाहता येत होते. आफ्रिकन टोळ्यांतले नर्तक मधूनमधून तिथं येऊन आपले लांबडे ड्रम वाजवीत नृत्य करीत होते; आणि आफ्रिकन जीवन व वन्य प्राणी यांच्यावरचं चित्रपटही पाहायची सोय होती. एक अत्याधुनिक व्यायामशाळा तिथं होती. मालिश करून घेता येत होतं. बायकांना आपल्या सौंदर्याची निगराणी करता येत होती. एखाद्या आफ्रिकन खेड्याला भेट द्यायची असेल तर तशी व्यवस्था केली जात होती. रात्री केनियातल्या जंगलात, सुसरींनी भरलेल्या नदीच्या काठी मशालींच्या उजेडात जेवायची ज्यांना हौस असेल, त्यांच्यासाठी खास जेवणाचे कार्यक्रम होते. तिथं आफ्रिकन नर्तकांचं नृत्य पाहता येत होतं आणि त्यांच्याबरोबर नृत्यात सामीलही होता येत होतं. यापैकी बऱ्याच गोष्टी क्लबच्या पूर्णपणे सुरक्षित असलेल्या आवारात करता येत होत्या.

आणि एक सांगायचं राहिलंच. विषुववृत्त पाहण्यासाठी त्या क्लबातून कुठेही जाण्याची गरज नव्हती. तो मुळी विषुववृत्ताच्या रेषेवरच बांधलेला होता. त्यामुळे एकाच खोलीत असूनही बायको पृथ्वीच्या दक्षिण गोलार्धात झोपलेली आहे आणि नवरा उत्तर गोलार्धात झोपला आहे, असा प्रकार होऊ शकत होता. माझे पाय दक्षिण गोलार्धात आणि डोकं उत्तर गोलार्धात अशा अवस्थेत मी माझ्या खोलीत पाय पसरून बसू शकत होतो आणि टेनिस खेळणाऱ्या शौकिनांना उत्तर गोलार्धात उभं राहून दक्षिण गोलार्धातल्या प्रतिस्पर्ध्याशी खेळता येत होतं.

हे सगळं असलं, पण वातावरण चांगलं नसलं तर सगळा मामला बिघडू शकतो. पण इथल वातावरण हा या क्लबचा सर्वात आकर्षक भाग होता. छान हवा, प्रशस्त राजेशाही वास्तू. आरामशीर फर्निचर, क्लबला साजेशी सजावट आणि खास ब्रिटिश वळण व शिष्टाचार यानं ते वातावरण निर्माण केलं होतं. केनियातला तो जगप्रसिद्ध नर्तकांचा सच तिथं नाचत असे आणि वातावरण अधिक गहिरं करणार उंची मद्य बारमध्ये आदबशीरपणे दिलं जात होतं.

हा क्लब ब्रिटिश परंपरा जपणारा आहे असं मी म्हटलं त्यावरून कोणाला वाटेल, की ब्रिटिश साम्राज्याच्या ऐन वैभवाच्या काळात तो स्थापन झालेला असेल. पण तशातली गोष्ट नव्हती. तो स्थापन झाला होता १९२९ मध्ये, म्हणजे ब्रिटिश साम्राज्य अस्तंगत होत असताना. आणि तो इंग्रज राज्यकर्त्यांनी स्थापलेला नव्हता. बेछूट जीवन जगणारा विल्यम होल्डन हा प्रसिद्ध सिनेमा नट, विक्षिप्त माणूस म्हणून ख्याती असलेला रे रायन हा अफलातून अमेरिकन माणूस, कार्ल हिर्श्मन हा स्वीस कोट्याधीश यांनी एकदा लहर लागली म्हणून तो स्थापन केला.

आणि आज जगातल्या अत्यंत प्रसिद्ध नावाजलेल्या व्यक्ती तिथं आवर्जून राहायला येत असतात. जगातली राजकुटुंबं, मोठाले राजकीय पुढारी, सिनेमासृष्टीतले देदीप्यमान तारे, निरनिराळ्या देशातले कोट्याधीश, हजारो श्रोत्यांना व प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारे गायक आणि नर्तक, प्रख्यात मुत्सद्दी आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ तिथं आलेले आहेत, आजही येतात.

जगातलं एक उत्तम निवासस्थान म्हणून त्याची ख्याती आहे. केनियातलं पाहण्यासारखं स्थळ म्हणून त्याला आंतरराष्ट्रीय मान्यता आहे. जेट-सेटचे लोक इथे आवर्जून येत असतात. म्हणून तर इतक्या विस्तारानं त्याचं वर्णन केलं.

◆ ◆ ◆

सौंदर्यस्पर्धा निसर्गातली - फुलांची आणि फुलपाखरांची




*पाऊल असं जपून टाकायचं असतं*



*साशंक टेहेळणी - आमच्या मागावर तर कोणी नाही ना?*





## फ्लेमिंगोंच्या वसाहतीत

माऊंट केनिया सफारी क्लबमधल्या मुक्कामात एकच गोष्ट राहून गेली होती; ती म्हणजे अगदी समोर असलेल्या माऊंट केनियाचं दर्शन. वातावरण इतकं ढगाळ होतं, की माऊंट केनिया सतत ढगातच गुरफटलेला, हरवलेला होता. सफारी क्लबच्या आसपास मधूनमधून छान चमकदार ऊन पडत होतं. पण दूर अधिक उंचावर असलेल्या त्या पर्वत शिखराला गुरफटून टाकणारे ढग काही पांगत नव्हते.

पण दोन रात्रींचा तिथला मुक्काम संपवून आम्ही जायला निघालो तेव्हा मात्र आकाश निरभ्र झालं होतं आणि चमकत्या निळ्या आकाशात मस्तक उंचावून उभा ठाकलेला माऊंट केनिया सकाळच्या चमकत्या उन्हात अगदी स्पष्ट दिसत होता.

तो होता भव्य; पण हिमालय आणि आल्प्स पाहिलेल्या मला त्याचं विशेष कौतुक कसं वाटणार? मात्र घुमटाच्या आकाराचं ते शिखर अखेर पाहायला मिळालं याचा आनंद झाला. त्यामुळे प्रसन्न मनानं आम्ही त्यांचा आणि सफारी क्लबचा निरोप घेऊन निघालो.

नंतरही काही वेळ कॉम्बीतून जात असताना आम्हाला तो निळ्या आकाशात मस्तक उंचावून आपल्या भव्यतेचं दर्शन देत होता.

•

आता आम्ही विषुववृत्त ओलांडून परत दक्षिणेला चाललो होतो. तिथे प्रसिद्ध नाकुरू सरोवर व त्यात वस्ती करून राहणारे हजारो फ्लेमिंगो पक्षी आम्हाला पाहायचे होते. त्यांच्या भोवतालच्या संरक्षित अरण्यात गेंडे, बिबटे वगैरे प्राणी आम्ही पाहणार होतो. त्या अरण्यात नाकुरू सरोवराच्या जवळच बांधलेल्या 'सरोवा लायन हिल लॉज' मध्ये आम्ही राहणार होतो. हे हॉटेलही अर्थात 'ॲक्रॉस आफ्रिका सफारी'च्या भारतीय मालकाचंच होतं.

रस्ता कधी काहीसा बरा, कधी वाईट असा होता. काही किलोमीटर आम्ही रुक्ष, उजाड सॅव्हाना प्रदेशातून प्रवास केला. मग डोंगराळ प्रदेशातून आमची कॉम्बी जाऊ लागली. केनियात दक्षिणेकडच्या डोंगराळ प्रदेशात पाऊस पडतो. साहजिकच तिथे हिरवी झाडी असते. छोटे-मोठे जलाशय असतात आणि शेतीही असते. मागे सांगितल्याप्रमाणे किकुयू जमातीचे लोक ही शेती करतात. इथे तसंच होतं. डोंगर उतारावर चहाकॉफीचे मळे होते; पुढे खाली मक्याची शेतं होती. खाली दरीत इतरही काही लागवड होती. इथली शेती बऱ्यापैकी उत्पन्न देणारी असावी. कारण त्या भागात आम्ही प्रथमच विटांची नीटनेटकी कौलारू घरं पाहिली. आतापर्यंत



जांभई देखील धडकी भरवणारी



विसावलेला [illegible] कळप





[illegible] लपून पटकन कधी पळाव लागेल त्याचा भरवसा नाही

सौंदर्यस्पर्धा निसर्गातली - फुलांची आणि फुलपाखरांची





पाऊल अस
जपून
टाकायचं अ

असा ऐटबाज तुरा,
असा देखणा चेहरा !
मग कोण बरं
भाळणार नाही



पाण्यात उतरायचं पण तरंग न विस्कटता



आपल्याकडच्या गावासारखं गाव आमच्या दृष्टीस पडलंच नव्हतं. कंगाल दिसणाऱ्या झोपड्यांचे पुंजके अधूनमधून दृष्टीस पडले होते. व्यवस्थित, संघटित, थोडं फार तरी सुखवस्तू जीवन त्या कंगाल झोपड्यांच्या पुंजक्यात शक्यच नव्हतं. आता मात्र गावपण असलेलं गाव आमच्या दृष्टीस पडत होतं. ते पाहून बरं वाटलं. या डोंगराळ भागातून जाताना वाटेत आम्हाला एक धबधबा दिसला. पाण्याचा ओघ मोठा नव्हता; पण पाणी भरपूर होतं आणि तो धबधबा सरळसोटपणे खालच्या दरीत कोसळत होता. किमान पाचशे फूट दरीत तो कोसळत होता. वाहत्या पाण्याचं मला विलक्षण आकर्षण वाटतं. त्यामुळे त्या अखंडपणे कोसळणाऱ्या धबधब्याकडे मी बराच वेळ पाहत होतो.

काही अंतर गेल्यावर आम्हाला अनपेक्षितपणे एक चांगला आधुनिक वाटणारा महामार्ग लागला. त्या प्रशस्त मार्गावर जाण्यायेण्याचे मार्ग विभागलेले होते आणि बऱ्यापैकी रहदारी होती. आतापर्यंत आम्ही ज्या रस्त्यावरून प्रवास केला होता त्यांवर नैरोबीजवळचा भाग सोडल्यास रहदारी फारशी नव्हतीच. काही ठिकाणी अगदीच तुरळक होती आणि काही ठिकाणी तर एक-दोन किलोमीटर गेल्यावर एखादं वाहन भेटत होतं. त्यामुळे त्या महामार्गाचं वेगळेपण आम्हाला विशेषच जाणवलं.

साहजिकच आम्ही जोसेफला त्या महामार्गाबद्दल विचारलं. त्यानं सांगितलं, की तो केनियातला अत्यंत महत्त्वाचा आंतरराष्ट्रीय महामार्ग होता. कारण युगांडा, बुरूंडी या केनियाच्या पश्चिमेला असलेल्या देशांना स्वतःचा समुद्रकिनारा नव्हता, बंदरे नव्हती. त्यामुळे ते देश केनियाच्या हिंदी महासागरातल्या बंदरांवर आणि विशेषतः मुंबासा बंदरावर अवलंबून होते. त्यांना लागणारा परदेशी माल या बंदरात उतरला जात असे आणि तेथून या महामार्गाने सगळा केनिया ओलांडून त्या देशात जात असे. त्या देशांतून निर्यात होणारा माल याच रस्त्यानं मुंबासाला जाऊन तेथून जहाजातून परदेशी रवाना होत असे. मनात आलं तर केनिया या देशाची नाकेबंदी करू शकत होता. त्याची प्रतिक्रियाही अतिशय गंभीर झाली असती. पण असं काही व्हावं, असे ताणतणाव त्या देशांत असल्याचं तेव्हातरी जाणवत नव्हतं.

मुंबासाहून नैरोबी आणि तिथून युगांडाला जाणारा एक लोहमार्ग आम्हाला दिसला. त्या मार्गावरून फक्त मालाचीच वाहतूक होते, असं जोसेफनं आम्हाला सांगितलं. हिंदुस्थानात ब्रिटिशांनी ज्या पद्धतशीरपणे आणि ज्या प्रमाणावर रेल्वेचा विकास केला तसा आफ्रिकेत केलेला दिसत नाही. प्रदेश मागासलेला, व्यापार थोडा; त्यामुळे बहुधा तसं केलेलं नसावं.

या चांगल्या महामार्गावरून फार वेळ प्रवास करण्याचं भाग्य काही आम्हाला लाभलं नाही. थोड्याच वेळानं आम्ही नाकुरू शहरात प्रवेश केला. नैरोबीनंतर आधुनिक म्हणता येईल असं हेच शहर आम्ही पाहात होता. दुकानं, छोटी वर्कशॉप, शिक्षण संस्था, रुग्णालयं, हॉटेल्सं वगैरे आधुनिक शहरात आढळणाऱ्या साऱ्या गोष्टी तिथं होत्या. रस्त्यांवर मोटारींची नैरोबीइतकी नाही; पण बरीच रहदारी होती. रस्त्यानं कामावर जाणाऱ्या किंवा पिशव्या घेऊन बाजारात जाणाऱ्या बायकाही दिसत होत्या.

मुख्य म्हणजे आपल्या शहरात सहसा आढळत नाही ती स्वच्छताही बऱ्याचशा प्रमाणात तिथे दिसत होती. जोसेफ अभिमानानं म्हणाला, "स्वच्छतेत या शहराचा नंबर नैरोबीच्या खालोखाल म्हणजे दुसरा लागतो."

मी मान हलवून गप्प बसलो. आमचं मुंबई शहर जगातलं एक मोठं शहर तर आहेच, पण ते जगातलं एक अत्यंत गलिच्छ शहरही आहे हे सत्य मी त्याला कसं सांगणार? हा मागासलेला देश काही बाबतींत आमच्या पुढे आहे हे मला पुन्हा जाणवलं. त्या देशाचं मला कौतुक वाटलं आणि आपली शरम वाटली. परदेशात गेलं म्हणजे असं सारखं शरमिंदं

व्हाव लागत.

नाकुरू शहराजवळच नाकुरू नॅशनल पार्क व रिनो सँक्च्युअरी आहे. माऊंट केनिया सफारी पार्कहून आठ वाजता निघालेले आम्ही साडेतीनशे किलोमीटर अंतर चार तासांत कापून नाकुरू नॅशनल पार्कमध्ये दुपारी बाराच्या आसपास पोचलो. निघून झाले होते चारच तास पण तेवढ्यात इतके धसके आणि दणके आम्ही खाल्ले होते, की आम्हाला युगान्त झाल्यासारखं वाटत होतं.

सरोवा लायन हिल लॉज काहीसा सरोवा शाबा लॉजसारखाच बांधण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. पण त्या लॉजची शान या लायन हिल लॉजला नव्हती. येथील बंगल्यांच्या भोवतालची झाडी रुक्ष वाटत होती आणि चोहोबाजूंनी उघडा असलेला डायनिंग हॉल एखाद्या गावठी हॉटेलसारखा दिसत होता. वाहतं पाणी तिथे नव्हतं आणि त्यामुळे ते हॉटेल कस चैतन्यहीन वाटत होतं. सुखसोयी अर्थात सगळ्या होत्या.

प्रवासात आम्हाला या हॉटेलच्या पंजाबी मालकाची मुलगी भेटली. आम्ही त्यांच्या अॅक्रॉस आफ्रिका सफारी कंपनीची गिऱ्हाईकं. त्यामुळे ती आम्हाला मुद्दाम येऊन भेटली आणि प्रवास चांगला होतोय ना, आमच्या व्यवस्थेत कुठे काही कमी पडत नाही ना याची तिनं आस्थेवाईकपणे चौकशी केली.

तिनं आधुनिक उच्च शिक्षण घेतलेलं होतं आणि आपल्या हॉटेलमध्ये पाहुण्यांसाठी बुकिंग करण्याच काम ती सांभाळत होती. आपल्या हॉटेलात लोकांनी यावं, राहावं आणि सतुष्ट होऊन जावं असा तिचा प्रयत्न होता. हॉटेलात राहून गेलेल्या लोकांनी केलेली जाहिरात ही सर्वांत उत्तम जाहिरात हे तिला माहित होतं.

त्या हसतमुख तरुणीचं व्यक्तिमत्त्व प्रसन्न आणि भेटणाऱ्याचा अनुकूल ग्रह करणारं होतं. ती भारतीय होती हे मला माहीत होतं. मी तिला विचारलं, ''तुमचं कुटुंब पंजाबातल्या कुठल्या गावचं?''

ती म्हणाली, ''आमचं कुटुंब रावळपिंडीचं.''

रावळपिंडी आता पाकिस्तानात आहे. फाळणीनंतर हे कुटुंब बहुधा ते सोडून हिंदुस्थानात आलं असावं किंवा कदाचित त्या वेळी ही मंडळी केनियातच स्थायिक झालेली असतील. त्यामुळे फाळणीचा त्रास त्यांना झाला नसावा आणि रावळपिंडीविषयीची आत्मीयता कायम राहिली असावी. प्रत्यक्षात काय होतं कोण जाणे! ती चटकन सहजपणे म्हणाली होती, ''आमचं गाव रावळपिंडी.''

हॉटेलात उतरल्यावर आम्ही दुपारचं भोजन घेतलं. त्यानंत जोसेफच्या औदार्यामुळे आम्हाला दोन तास विश्रांती घेता आली आणि चार वाजता आम्ही जंगल पाहायला बाहेर पडलो.

*निसर्गाचा निष्ठूर न्याय - एकाचं मरण, दुसऱ्याची मेजवानी*



जंगल तसंच! वाळलेलं गवत आणि काटेरी झुडपं. पण इथे गवत तितकं खुरटलेलं नव्हतं आणि हिरवळ जास्त होती. काही भागात तर बरीच झाडी होती. एकच प्रकारच्या काटेरी वृक्षाऐवजी त्या झाडीत वेगवेगळ्या प्रकारचे वृक्ष होते.

जंगलात परिचित प्राणी चरताना दिसले. रानरेड्यांचा एक कळप दिसला. तो दूर होता आणि रस्ता सोडून त्याच्याजवळ जायला परवानगी नव्हती. दोन वॉर्ट हॉग्ज इकडून तिकडे दुडक्या चालीनं गेले. जोसेफनं सांगितलं, की सिंह तिथे नव्हतेच! त्यामुळे विशेष काही दृष्टीस पडणार नाही, असं वाटू लागलं.

आणि मग अगदी अनपेक्षितपणे आम्हाला जंगलात क्वचितच दिसणारा बिबट्या वाघ दिसला. जंगलातले इतर प्राणी माणसाला फारसे बुजत नाहीत. सिंह तर मुळीच बुजत नाही. ते बेटे कॉम्बीतल्या माणसांची दखलच घेत नाहीत. पण काही प्राणी मात्र माणसाच्या वाऱ्यालाही उभे राहत नाहीत. ते म्हणजे बिबटे, लांडगे, कोल्हे आणि रानमांजराहून मोठे पण चित्त्याहून लहान असलेले लिन्क्स.

हा बिबट्या एका झाडावर चढून तिथे आरामात झोपलेला होता. बिबट्या झाडावर चढू शकतो हे मी वाचलेलं होतं. पण तो झाडावर मुक्कामच करून असतो याची मला कल्पना नव्हती. नंतर मला कळलं, की त्यानं एखादं हरीण मारलं तर ते घेऊन तो झाडावर चढतो. तिथे ते ठेवतो आणि निर्वेधपणे खातो. कारण त्यानं शिकार केली असली, तर काही वेळा सिंह ती हिसकावून घेतात आणि मग बापड्या बिबट्याला आपल्या शिकारीवर चार सिंहांचं कुटुंब ताव मारताना पाहावं लागतं. सिंहाला झाडावर चढता येत नाही आणि इतर प्राणीदेखील सहजपणे तिथपर्यंत पोचू शकत नाहीत. या बिबट्यानं त्या वेळी शिकार केलेली नव्हती. तो नुसताच दुपारच्या वेळी झाडावर सावलीत निर्वेधपणे आराम करीत होता. तो अदमासे पंधरा ते वीस फूट उंचीवर झाडाच्या जाड फांद्यांच्या बेचक्यात आरामात झोपला होता. त्याची शेपटी खाली लोंबत होती आणि पुढच्या दोन पायांवर डोकं ठेवून तो झोपला होता.

बिबट्या हा काही तसा लहान प्राणी नव्हे. पण झाडाच्या फांदीवर तो अशा प्रकारे बसला होता, की निरखून पाहिल्याशिवाय तो दृष्टीस पडत नव्हता. दुर्बिणीतून पाहिल्यावर तो अधिकच स्पष्ट दिसला.

जंगलात एका कॉम्बीतल्या माणसांना एखादा प्राणी दिसला म्हणजे इतर कॉम्बी वेगानं तिथे येतात आणि पाहता पाहता बरीच माणसं तिथे जमा होतात. जंगलातले प्राणी पाहताना आवाज करायचा नाही, बोलायचं नाही, असा अलिखित नियम आहे. कारण त्यामुळे जनावरं बुजतात किंवा अस्वस्थ होतात आणि तिथून निघून जातात. बिबट्या हा तर प्राणी तर माणसाच्या वाऱ्याला मुळीच न राहणारा. त्यामुळे जोसेफनं ओठांवर बोट ठेवून आम्हाला त्या नियमांची आठवण करून दिली. पहिल्यानं सगळेच लोक तो नियम पाळत होते. पण बराच वेळ झाला. सगळ्यांचं पाहून झाल्यावर फोटो काढून झाले आणि लोक आपसांत बोलू लागले. आश्चर्य म्हणजे त्या बोलण्याचा आवाज ऐकूनही बिबट्या जागचा हलला नाही किंवा त्यानं डोळे उघडले नाहीत. तो आरामात झोपला होता.

अंधार पडू लागला म्हणजे तो खाली उतरणार होता आणि अंधार भेदणाऱ्या डोळ्यांनी भक्ष्याचा शोध घेणार होता. गवतात दबून अदृश्यपणे, पावलांचा आवाज न करता त्या भक्ष्याला गाठणार होता. झेप घेऊन त्याचं नरडं आपल्या दातात आवळणार होता.

थोड्या वेळात आम्ही तिथून निघालो. सूर्य मावळायला आला होता. तो मावळायच्या आधी आम्हाला नाकुरू सरोवराजवळ जायचं होतं आणि त्यात बसलेले हजारो फ्लेमिंगो पक्ष्यांचे थवे बघायचे होते. हो आणि अजून जवळून पाहता न आलेला गेंडा बघायचा होता.

तर आपल्या कॉम्बीची मोडतोड होईल; नाही तर ती उलटेल देखील. आमची कॉम्बी म्हणजे एक रणगाडाच होता.तिचीही मोडतोड करू शकणारा गेंडा किती ताकदवान असेल याची कल्पना करता येईल.

सुदैवानं त्या वेळी तरी त्या गेंड्याच्या मनात धडक वगैरे मारण्याचा विचार नव्हता काही वेळ तो गेंडा सावकाश चरत चरत नाकुरू सरोवराच्या दिशेला सरकत होता. पण नंतर मात्र तो चरायचा थांबला आणि सरोवराभोवतालच्या विस्तीर्ण रेताडातून सरोवराच्या दिशेनं चालू लागला.

मी जोसेफला विचारलं, ''तो पाणी प्यायला जातोय का?''

जोसेफ म्हणाला, ''नाही. सरोवराचं पाणी खारं आहे. ते पिण्यासारखं नाही. तो बहुधा सरोवराजवळची खारी वाळू चाटायला जात असावा''.

या सरोवराच्या पाण्यात पुष्कळ क्षार होते. त्यामुळेच बहुधा त्याच्या भोवती इतका विस्तीर्ण रेताड पट्टा होता. एरवी तिथे गवत उगवलं असतं.

फ्लेमिंगो पक्षी जवळून पाहता यावेत म्हणून जोसेफनं आमची कॉम्बी पुढे नेली. पण मग तो थांबला. पुढे पुष्कळच रेताड पट्टा होता आणि त्याच्या पलीकडे पाण्यात हजारो फ्लेमिंगो पक्ष्यांच्या अनेक वसाहती होत्या.

मी जोसेफला म्हटलं, ''आणखी पुढं नाही का जाता येणार?''

तो म्हणाला, ''पुढे चिखल आहे''.

राखीव अरण्यात फिरताना कॉम्बीतून उतरायची परवानगी नव्हती. पण इथे उतरलात तरी चालेल, असं जोसेफ म्हणाला तेव्हा मी उतरलो आणि फ्लेमिंगो पक्ष्यांच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न करू लागलो. पण कोरड्या दिसणाऱ्या रेताड जमिनीतून पाय भसकन् खाली जाऊ लागले आणि तिथून पाणी वर येऊ लागलं. तेव्हा मी पुढे जाण्याचा प्रयत्न सोडून दिला आणि दुरूनच दुर्बिणीतून त्या असंख्य फ्लेमिंगो पक्ष्यांच्या वसाहतीकडे पाहू लागलो.

हे दृश्य केवळ अपूर्व होतं. अक्षरशः हजारो फ्लेमिंगो पक्षी त्या खाऱ्या पाण्याच्या सरोवराच्या किनाऱ्यावर पाणथळीत वस्ती करून राहिले होते. त्यांचा रंग पांढुरका गुलाबी होता आणि रूप बगळ्यासारखं होतं. लांब काटकीसारखे पाय, तोकडं शरीर, अगदीच आखूड शेपूट, लांबलचक मान आणि चपटी चोच. सूर्य मावळायला आला होता. त्यामुळे ते उडत होते आणि बसत होते आणि त्यामुळे त्यांच्या भोवती आणि डोक्यावर धुकं तरंगत आहे, असा आभास निर्माण होत होता.

हे पक्षी खाऱ्या जलाशयाच्या किनाऱ्यावरच्या पाणथळीत वस्ती करतात. ते खातात त्या पाण्यात वाढणाऱ्या वनस्पती आणि पाणथळीतले छोटे मासे आणि कीटक.

समुद्रकाठीच ते वस्ती करू शकत नाहीत; कारण तिथे लाटा, भरती ओहोटी यामुळे पाणी शांत नसतं आणि त्यांना खाण्यासारख्या वनस्पती अगर छोटे जलचरदेखील तिथं नसतात. अंडी घालण्याच्या दृष्टीनं तर समुद्रकिनारा अगदीच गैरसोयीचा. पण एखादं नाकुरूसारखं खाऱ्या पाण्याचं सरोवर त्यांच्या दृष्टीनं वस्तीला अतिशय सोयीस्कर. अशी सरोवरं फारशी नसतात. त्यामुळे नाकुरूच्या सरोवरात ते हजारोंनी वस्ती करतात. पुन्हा ते सरोवर प्रचंड आहे. त्याचा परीघच साठ मैल आहे आणि त्याच्या भोवतालच्या पाणथळीत फ्लेमिंगोंना लागणारं अन्न भरपूर मिळतं. जणू फ्लेमिंगो पक्ष्यांची गरज भागविण्यासाठीच निसर्गानं ते निर्माण केलं आहे. फ्लेमिंगो पक्षी निसर्गाच्या या कृपेचा पुरेपुर फायदा घेत आहेत. तेथेच ते वस्ती करून राहतात.

मात्र एखाद्या वेळी पाऊस पुरेसा पडला नाही आणि नाकुरू तलावातलं पाणी आटलं की त्यांना दुसरीकडे जावं लागलं. त्या वेळी ते बापडे कुठे जातात कोण जाणे! कदाचित अशा दुष्काळात त्यातले हजारो मरतही असतील. पण म्हणून त्यांची संख्या कमी झालेली दिसली नाही. प्रजोत्पादनाची

कॉम्बी निघाली. थोडं अंतर गेल्यावर मला दूर दोन ठेंगणे जाडजूड प्राणी धावताना दिसले. मी जोसेफला म्हटलं. "हे गेंडे तर नव्हते?"

त्यानं तिकडे एकदा नजर टाकली आणि तो म्हणाला, "नाही, ते वॉर्ट हॉग्ज आहेत". काही वेळानं दूर अंतरावर त्यानं दोन प्राणी दाखवले आणि तो म्हणाला, "ते गेंडे".

दूर असल्यामुळे ते नीटसे दिसत नव्हते. म्हणून मी दुर्बिण उचलली आणि त्यांच्यावर लावली. पण ते दुडक्या चालीनं धावत चालले होते आणि माझी दुर्बिण त्यांच्यावर नीट लागेपर्यंत ते झाडीत दिसेनासे झाले. मी काहीसा खट्टू झालो; पण आम्ही नाकुरू सरोवराच्या किनाऱ्यावर आलो तेव्हा आम्हाला अनपेक्षितपणे एक भलामोठा गेंडा सावकाश चालताना दिसला. जोसेफनं त्याला अस्वस्थ न करता शक्य तितक्या वेगानं आमची कॉम्बी त्याच्या अगदी जवळ म्हणजे पंधरा-वीस फूट अंतरावर नेली

ते प्रचंड धूड भीती वाटावी असंच होतं. पाय मजबूत, पण तोकडे. बाकी सगळं अजस्त्र धड. चिलखतासारखं जाड राठ कातडं. वर केस वगैरे काहीच नव्हते. केसांची गरज काय! कातडी पातळ, नाजूक असली तर केसांच्या संरक्षक आवरणाची गरज. या चिलखताला कशाला हवं होतं आवरण?. थंडी-पावसाळा किंवा एखाद्या पंजाच्या फटकाऱ्याला देखील तोंड द्यायला ते चिलखत पुरेसं होतं. बारीक कंबर, फुगीर छाती, निमुळती मान, मोठं डोकं असे वेगवेगळे भाग त्या शरीराला नव्हते. निदान त्यांचं वेगळं अस्तित्व जाणवत नव्हतं. त्या शरीरात नुसती शक्ती; केवळ मस्ती ठासून भरलेली होती. तिनं ते तुडुंब भरलं होतं आणि एखाद्या प्रचंड अवजड शिसवी ओंडक्याचा आकार त्याला आला होता. त्याला मान नव्हतीच. इकडेतिकडे वळून बघायची त्याला मुळी गरजच नव्हती. कोणाची शहामत होती त्याच्यावर मागून किंवा बाजूनं हल्ला करायची? आणि तसा वेडेपणा केला असताच, तर झटकन वळून ते अजस्त्र शरीरच त्याच्यासमोर उभं ठाकलं असतं आणि मग एक मुसंडी, धडक आणि चेंदामेंदा! खेळ खलास! त्याचं भलंमोठं मुस्कटही एकसंध, चिलखती होतं. कामापुरते त्याला छोटेसे कान आणि आत बुडालेले डोळे होते. तोंड वेगळं काढता येण्यासारखं नव्हतं. जबरदस्त धडक मारण्यासाठीच मुस्कट घडवलेलं होतं. असं शरीर असल्यावर शिंगींची गरजच का? कानाजवळ ती नव्हतीच, पण नको असली तरी नाकावर ती उगवलेली होती. एक नव्हे दोन. पहिलं चांगलं फूटभर लांबीचं आणि मागलं लहान असलं अर्ध्या फुटाचं. नाजूक नाकावर शिंग? इतर कोणा प्राण्याच्या बाबतीत अशी रचना चुकीची ठरली असती. पण या शरीराच्या रचनेत नाजूकपणा नावाची गोष्टच नव्हती.

निव्वळ शक्ती त्या शरीरात साकार झाली होती आणि भुरळ पडल्यासारखा, चेटूक झाल्यासारखा मी तिकडे पाहत होतो.

आपल्या अंगात एवढी प्रचंड शक्ती आहे याची तेव्हा त्या गेंड्याला दखलदेखील नव्हती. तो शांतपणे चरत चरत पुढे चालला होता. आमची कॉम्बी इतक्या जवळ आली तरी त्यानं एकदा नजर टाकण्यापलीकडे आमच्याकडे लक्ष दिलं नाही. उगीच कोणाला धडक मारावी अशी त्याची वृत्ती दिसली नाही.

पण कोणाला शत्रुत्व दाखवायचा त्याचा इरादा नसला, तरी त्याचा वचक भरपूर होता हे आम्हाला तिथल्या तिथेच दिसून आलं. तो चरत होता तिथून थोड्या अंतरावर एक हरण चरत होतं. हा गेंडा चरता चरता थोडा त्या हरणाच्या दिशेनं पुढे सरकला तेव्हा ते हरण एकदम चरायचं थांबलं आणि मग घाईनं दूर जाऊन पलीकडे चरू लागलं.

जोसेफ म्हणाला, की या अरण्यात आपल्या कॉम्बीला फक्त तीन प्राण्यापासून धोका असतो. एक हत्ती, दुसरा गेंडा आणि तिसरा रानरेडा. हत्तींबद्दल सांगायलाच नको. पण गेंडा किंवा रानरेडा यांनी धडक मारली,

तर आपल्या कॉम्बीची मोडतोड होईल; नाही तर ती उलटेल देखील. आमची कॉम्बी म्हणजे एक रणगाडाच होता.तिचीही मोडतोड करू शकणारा गेंडा किती ताकदवान असेल याची कल्पना करता येईल.

सुदैवानं त्या वेळी तरी त्या गेंड्याच्या मनात धडक वगैरे मारण्याचा विचार नव्हता काही वेळ तो गेंडा सावकाश चरत चरत नाकुरू सरोवराच्या दिशेला सरकत होता. पण नंतर मात्र तो चरायचा थांबला आणि सरोवराभोवतालच्या विस्तीर्ण रेताडातून सरोवराच्या दिशेनं चालू लागला.

मी जोसेफला विचारलं, ''तो पाणी प्यायला जातोय का?''

जोसेफ म्हणाला, ''नाही. सरोवराचं पाणी खारं आहे. ते पिण्यासारखं नाही. तो बहुधा सरोवराजवळची खारी वाळू चाटायला जात असावा''.

या सरोवराच्या पाण्यात पुष्कळ क्षार होते. त्यामुळेच बहुधा त्याच्या भोवती इतका विस्तीर्ण रेताड पट्टा होता. एरवी तिथे गवत उगवलं असतं.

फ्लेमिंगो पक्षी जवळून पाहता यावेत म्हणून जोसेफनं आमची कॉम्बी पुढे नेली. पण मग तो थांबला. पुढे पुष्कळच रेताड पट्टा होता आणि त्याच्या पलीकडे पाण्यात हजारो फ्लेमिंगो पक्ष्यांच्या अनेक वसाहती होत्या.

मी जोसेफला म्हटलं, ''आणखी पुढं नाही का जाता येणार?''

तो म्हणाला, ''पुढे चिखल आहे''.

राखीव अरण्यात फिरताना कॉम्बीतून उतरायची परवानगी नव्हती. पण इथे उतरलात तरी चालेल, असं जोसेफ म्हणाला तेव्हा मी उतरलो आणि फ्लेमिंगो पक्ष्यांच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न करू लागलो. पण कोरड्या दिसणाऱ्या रेताड जमिनीतून पाय भसकन् खाली जाऊ लागले आणि तिथून पाणी वर येऊ लागलं. तेव्हा मी पुढे जाण्याचा प्रयत्न सोडून दिला आणि दुरूनच दुर्बिणीतून त्या असंख्य फ्लेमिंगो पक्ष्यांच्या वसाहतीकडे पाहू लागलो.

हे दृश्य केवळ अपूर्व होतं. अक्षरशः हजारो फ्लेमिंगो पक्षी त्या खाऱ्या पाण्याच्या सरोवराच्या किनाऱ्यावर पाणथळीत वस्ती करून राहिले होते. त्यांचा रंग पांढुरका गुलाबी होता आणि रूप बगळ्यासारखं होतं. लांब काटकीसारखे पाय, तोकडं शरीर, अगदीच आखूड शेपूट, लांबलचक मान आणि चपटी चोच. सूर्य मावळायला आला होता. त्यामुळे ते उडत होते आणि बसत होते आणि त्यामुळे त्यांच्या भोवती आणि डोक्यावर धुकं तरंगत आहे, असा आभास निर्माण होत होता.

हे पक्षी खाऱ्या जलाशयाच्या किनाऱ्यावरच्या पाणथळीत वस्ती करतात. ते खातात त्या पाण्यात वाढणाऱ्या वनस्पती आणि पाणथळीतले छोटे मासे आणि कीटक.

समुद्रकाठीच ते वस्ती करू शकत नाहीत; कारण तिथे लाटा, भरती ओहोटी यामुळे पाणी शांत नसतं आणि त्यांना खाण्यासारख्या वनस्पती अगर छोटे जलचरदेखील तिथं नसतात. अंडी घालण्याच्या दृष्टीनं तर समुद्रकिनारा अगदीच गैरसोयीचा. पण एखादं नाकुरूसारखं खाऱ्या पाण्याचं सरोवर त्यांच्या दृष्टीनं वस्तीला अतिशय सोयीस्कर. अशी सरोवरं फारशी नसतात. त्यामुळे नाकुरूच्या सरोवरात ते हजारोंनी वस्ती करतात. पुन्हा ते सरोवर प्रचंड आहे. त्याचा परीघच साठ मैल आहे आणि त्याच्या भोवतालच्या पाणथळीत फ्लेमिंगोंना लागणारं अन्न भरपूर मिळतं. जणू फ्लेमिंगो पक्ष्यांची गरज भागविण्यासाठीच निसर्गानं ते निर्माण केलं आहे. फ्लेमिंगो पक्षी निसर्गाच्या या कृपेचा पुरेपुर फायदा घेत आहेत. तेथेच ते वस्ती करून राहतात.


मात्र एखाद्या वेळी पाऊस पुरेसा पडला नाही आणि नाकुरू तलावातलं पाणी आटलं की त्यांना दुसरीकडे जावं लागलं. त्या वेळी ते बापडे कुठे जातात कोण जाणे! कदाचित अशा दुष्काळात त्यातले हजारो मरतही असतील. पण म्हणून त्यांची संख्या कमी झालेली दिसली नाही. प्रजोत्पादनाची

त्यांची क्षमता भरपूर असावी.

त्या पांढुरक्या गुलाबी पक्ष्यांच्या सतत हलणाऱ्या, उडणाऱ्या, बसणाऱ्या आणि आपल्या भोवती एक धुकं निर्माण करणाऱ्या वसाहतींकडे मी कितीतरी वेळ पाहत होतो आणि सूर्य मावळून अंधार पडू लागला तेव्हा तृप्त मनानं हॉटेलकडे परतलो.

तिथे खोलीत बसून 'कॉनियॅक' चाखत असताना माझ्या डोळ्यांसमोर त्या शेकडो पांढुरक्या गुलाबी पक्ष्यांची अखंड हालचाल होत होती आणि मस्तकात एक सुखकारक धुकं होतं.......


◆ ◆ ◆



*मला देखील उंचावरच्या पाल्यापर्यंत पोहोचता येतं*

*घ्या लुचून पटकन, कधी पळावं लागेल त्याचा भरवस नाही .*





## निसर्गाची अथांग विपुलता

सर्व प्रकारचे वन्य प्राणी जर कुठे विपुल प्रमाणात पाहायला मिळत असतील, ते पाहाण्याचा कार्यक्रम सर्वात शेवटी ठेवण्यात आला होता. तो मसाईमारा संरक्षित अरण्यात. कारण आधी मसाई मारातले प्राण्यांचे मोठाले कळप पाहिले असते, तर मग इतर संरक्षित अरण्यं पाहण्यात फारसं स्वारस्य राहिलं नसतं.

मसाई मारा केनियाच्या अगदी दक्षिण टोकाला टांझानियाच्या सरहद्दीवर आहे ही सरहद्द काही निसर्गानं आखलेली नाही. राज्यकर्त्यांनी कृत्रिमपणे एक रेखा आखली, आणि ती झाली सरहद्द. बहुधा ब्रिटिश राज्यकर्त्यांनी ती कारभाराच्या सोयीसाठी आखली असावी. कारण ते यायच्या आधी त्या भागात राजसत्ता अशी नव्हतीच. निरनिराळ्या रानटी टोळ्यांची तिथे वस्ती होती. त्यातल्या काही केवळ शिकार करून निर्वाह करीत आणि काही आपले जनावरांचे कळप घेऊन भटकं जीवन कंठीत. आता सरहद्द आखलेली असली आणि केनिया व टांझानिया हे वेगवेगळे देश झाले असले तरी मसाई मारा अरण्याच्या प्रचंड विस्तारात तेच जीवन पुष्कळसं तसंच जगलं जात आहे. हे अरण्य केनिया आणि टांझानिया या दोन देशांत पसरलेलं आहे. केनियात त्याला मसाई मारा राखीव अरण्य म्हणतात. सरहद्दीच्या पलीकडे गेलं की त्याला 'सेरंगेटी नॅशनल पार्क' म्हणतात. खरं म्हणजे या अरण्याचा फार मोठा भाग टांझानियातच आहे.

सरहद्द आखलेली असली तरी रानातले पशुपक्षी आणि बहुधा गाईंचे आणि मेंढरांचे कळप घेऊन फिरणारे मसाई लोक तिची फारशी पत्रास राखत नाहीत. पशुपक्षी अर्थात अजिबातच पत्रास राखत नाहीत. उन्हाळ्यात सेरंगेटी अरण्यात वस्ती करायची आणि तिथलं गवत खाऊन संपलं, की हिवाळ्यात मसाई मारा अरण्यात येऊन तिथं माजलेल्या गवताचा फन्ना पाडायचा, असा त्यांचा क्रम लक्षावधी वर्ष चाललेला आहे. त्यांच्या पोटात जणू निसर्गाच्या अदृश्य काळदर्शिका आहेत आणि उन्हाळ्याचं पान उलटून हिवाळा सुरू झाला, की त्यांच्या झुंडीच्या झुंडी सरहद्द ओलांडून मसाई मारात प्रवेश करतात. त्यांना पासपोर्ट लागत नाही, ना व्हिसा.

त्यांना अडवायचं म्हटलं तर केनिया आणि टांझानियाच्या सरकारांना शेकडो मैल लांबीचे उंच आणि मजबूत कुंपण घालावे लागेल आणि मोठा फौजफाटा ठेवावा लागेल. आणि समजा असं केलं तर काय होईल, तर ते हजारो प्राणी अन्नाशिवाय तडफडून मरतील.

टांझानियातले आणि केनियातले लोक जरी मागासलेले असले आणि त्यातले काही अजूनही रानटी असले तरी समंजस आहेत. त्यामुळे या प्राण्यांचं वार्षिक देशांतर थांबवण्याचा ते प्रयत्न करीत नाहीत. अधिक पुढारलेले देशदेखील नेहमी इतका समंजसपणा दाखवतात अशातला भाग नाही.

आपले मेंढरांचे आणि गाईंचे कळप घेऊन भटकं जीवन जगणाऱ्या मसाई लोकांनादेखील अशीच मुक्तपणे सरहद्द ओलांडायची मोकळीक आहे की नाही. ते मला माहीत नाही. कदाचित नसावी. कारण माणसांनी व्हिसाशिवाय सरहद्द ओलांडली तर त्यांना पकडायला सीमारक्षक दलाचे जवान तिथे गस्त घालीत असलेले मला दिसले.

वाईट रस्त्यांची आम्हाला आता सवय झाली होती आणि आतापर्यंत ज्या रस्त्यावरून आम्ही प्रवास केला होता, त्याहून अधिक वाईट रस्ते असणं शक्य नाही, असा माझा समज झाला होता. पण नाकुरू शहरातल्या बऱ्या रस्त्यावरून थोडा वेळ प्रवास केल्यावर नंतर ज्या रस्त्यावरून आम्ही प्रवास केला, त्यामुळे आपला हा गैरसमज होता, हे माझ्या ध्यानात आलं. पुढं पुढं तर इतके दणके आम्हाला सहन करावे लागले, की काहीच ध्यानात येईनासं झालं.

थोडा वेळ आम्ही डोंगराळ भागातून प्रवास केला. तिथं नेहमीप्रमाणे चहा-कॉफीचे मळे आणि मक्याची शेतं होती. मध्येच एखादं गाव लागत होतं आणि पुढं तर एक छोटंसं शहरही लागलं. पण पुढं सॅव्हानाच्या सपाट. गवताळ, रुक्ष प्रदेशातून आमचा प्रवास सुरू झाला. खुरटी, काटेरी झुडपं आणि झाडंही होती. त्यांची पानं इतकी हिरवी कशी राहिली होती, याचंही मला नेहमीप्रमाणेच आश्चर्य वाटलं!

मसाई माराच्या जसंजस आम्ही जवळ येऊ लागलो, तसंतसं आपले मेंढरांचे, गाईंचे आणि गाढवांचे कळप चारणारे मसाई लोक आमच्या दृष्टीस पडू लागले. आतापर्यंत आम्ही पाहिलेल्या लोकांच्या अंगावर पाश्चात्य धाटणीचे कपडे असत. या उंच्यापुऱ्या मसाई लोकांच्या अंगावर मात्र त्यांचे पारंपारिक कपडे होते. कमरेला एक वस्त्र, अंगात एक अंगरखा आणि खांद्याभोवती एक लाल कांबळं, असा त्यांचा पोशाख होता. बहुधा त्यांनी पाळलेल्या मेंढरांच्या लोकरीपासून त्यांच्या बायका हे कपडे बनवीत असाव्यात. इतका उठावदार लाल रंग त्या आपल्या कांबळ्यांना कशा देत, त्यासाठी लागणारं तंत्रज्ञान कसं विकसित झालं याविषयी मला कुतूहल वाटत होतं. पण इतर अनेक गोष्टींप्रमाणे याही गोष्टीचा मी पाठपुरावा केला नाही.

या मसाई लोकांचे कुरळे केस डोक्यासरशी कापलेले होते आणि त्यांच्या बायकांची डोकी तर अगदी वस्तऱ्यानं स्वच्छ केलेली होती. त्यांच्या गळ्यात नाना रंगांच्या दगडांच्या आणि मण्यांचा ओबडधोबड माळा होत्या. कानात जड भूषणं घातल्यामुळे कानांच्या पाळ्यातली भोकं केवढी तरी मोठी झालेली होती. कदाचित ती तशी मोठी असणं हे सौंदर्याचं लक्षण असेल.

प्राण्यांच्या जीवनाशी समांतर असं जीवन जगणाऱ्या या मसाई लोकांची वस्त्रंही निसर्गाच्या रंगांशी मिळत्याजुळत्या रंगांची असावीत अशी माझी अपेक्षा होती. पण त्यांच्या अंगावरचं लाल कांबळं दुरूनही नजरेत भरत होतं. कदाचित गुरं चारत दूरवर गेलेला आपल्या कुटुंबातला अगर टोळीतला माणूस दुरूनही दिसावा, म्हणून ही सोय असावी.

प्रत्येक मसाई माणसाच्या खांद्यावर एक भाला होता. त्याचा दांडा लांबलचक आणि बारीक होता. कुठल्या तरी टिकाऊ आणि मजबूत लाकडाचा तो बनवलेला असावा हे उघडच होतं. त्याचा लंबत्रिकोणी फाळ अणकुचीदार आणि पाजळलेला होता. रानात सिंह, गेंडे, हत्ती अशा जनावरांना तोंड द्यायचा प्रसंग या मसाईवर येत असावा. या हिंस्र,

शक्तिशाली पशूंना तोंड देण्यासाठी मसाई माणसाजवळ हे एकच शस्त्र होतं. ते म्हणजे, हा लांब, अणकुचीदार भाला.

या मसाई माणसांच्या शौर्याबद्दल मला आदर वाटू लागला. हे शौर्य हा त्यांच्या जीवनाचा मुळी मूलाधारच होता. ज्या अरण्यात सिंह वावरतात, तिथं सिंहांचं खाद्य असलेल्या प्राण्यांचे कळप चारणं आणि सिंह वगैरे प्राण्यांपासून त्यांचं संरक्षण करणं हे तितकं शौर्य अंगी असल्याशिवाय शक्यच नव्हतं.

ज्या प्रदेशात हे मसाई आमच्या दृष्टीस पडत होते तो संरक्षित जंगलाचा भाग नव्हता; परंतु हा प्रदेश आणि संरक्षित जगल यातली सीमा केवळ तांत्रिक होती. कारण या भागात मसाईंच्या गाईंच्या आणि मेंढरांच्या कळपांपासून थोड्याच अंतरावर हरणं, ग्नू झेब्रे इत्यादींचे कळप चरत होते. या कळपातल्या प्राण्यांची शिकार करणारे सिंह, बिबटे आणि चित्ते आसपास कुठेतरी असणार हे अपेक्षितच होतं. अशा या प्रदेशात हे मसाई एकेकट्यानं नि:शंकपणे आपले कळप चारत होते. आपला भाला मानेवर आडवा टाकून त्यावर दोन्ही हात अडकवून हिंडत होते. हाकेच्या अंतरावर इतर मसाई होते. पण सिंहानं हल्ला केला तर वेळेवर मदतीला धावून जाता येईल इतके काही ते जवळ नव्हते.

पण त्याची काही गरज आहे असं मसाईंना वाटत नसावं. कारण मसाई सिंहाच्या बरोबरीचा नव्हे, तर सिंहाहूनही श्रेष्ठ, अशी त्यांची भावना असते. त्यांच्या परंपरेचा मुळी तसा दंडकच आहे. सिंहाची शिकार केल्याशिवाय मसाई माणसानं आपलं पौरुष सिद्ध केलं असं त्याच्या टोळीतले लोक मानत नाहीत. अरण्याचा राजा सिंह नव्हे; तर मसाई असतो, असं ती परंपरा मानते.

या मसाईंचे कळप मी अर्थातच निरखले. भरपूर मांस असलेल्या जातिवंत गाई अर्थातच त्या कळपात नव्हत्या. त्या अरण्यातलं जाडंभरडं गवत खाणाऱ्या, सिंहानी हल्ला केला तर पळू शकणाऱ्या आणि प्रसंग पडला, तर पाण्याशिवाय दोन-तीन दिवस काढू शकणाऱ्या काटक, सडपातळ गाई त्या कळपात होत्या. त्या दूध देत असणारच. पण मसाईच्या जगात त्या दुधाला फारसं महत्त्व नव्हतं! महत्त्व होतं ते त्या गाईंच्या मांसाला आणि त्यांच्या रक्ताला. सिंहाप्रमाणंच गाईंची मान चिरून मसाई तिचं रक्त पितात आणि तिचं मांस खातात. आपल्या मुलांनादेखील ते हे कच्चं रक्त पाजतात. मूल लहान असलं तर दुधात मिसळून हे रक्त त्याला देतात.

यामुळे धान्याच्या गोणी त्यांना बरोबर बाळगाव्या लागत नाहीत. त्यांचं अन्न आपल्या पायांनी चालत त्यांच्याबरोबर फिरत असतं.

जनावरांचे कळप पाळणाऱ्या लोकांकडे सामान्यतः उत्तम जातिवंत कुत्रे असतात. ते जनावरांचे संरक्षण तर करतातच, शिवाय ती उधळली तर त्यांना आवरून एकत्र आणणं, पुढे हाकलणं, योग्य त्या दिशेला वळवणं इत्यादी कामंही ते इशाऱ्यासरशी करतात. ऑस्ट्रेलियात याचं प्रात्यक्षिक मी पाहिलं होतं. पण या मसाईजवळ तसले कुत्रे मी पाहिले नाहीत. फक्त एक कुत्रा मी पाहिला. या मसाईंचे कळप अर्थात लहान लहान होते. त्यामुळे कुत्र्यांची त्यांना गरज वाटत नसावी.

वाटेत आम्हाला मसाई लोकांचं एक गाव-खरं म्हणजे एक तात्पुरती वस्ती दिसली. ती वस्ती म्हणजे गवताच्या अगदी झोपड्यांचं एक वर्तुळ होतं. त्याला बाहेरच्या बाजूंनी एक जुजबी, तात्पुरतं काटेरी झाडं तोडून बनवलेलं कुंपण होतं. बहुधा रात्रीच्या वेळी मसाई लोक आपल्या कळपातील जनावरं त्या झोपड्यांच्या वर्तुळाच्या आत ठेवीत असावेत. दिवसाची वेळ असल्यामुळे मसाई लोक आपले कळप घेऊन बाहेर गेले असावेत. त्यामुळे आत शुकशुकाट दिसत होता. बहुधा त्या वेळी तिथं फक्त तान्ही मुलं; त्यांच्या आया आणि म्हातारी माणसं असावीत. पण दिसत कोणीच नव्हतं. या वस्तीत एकदा जाऊन यावं असं वाटत होतं; पण पूर्वतयारी

केल्याशिवाय अशा ठिकाणी गेलं तर फारसं काही निष्पन्न होत नाही, असा माझा अनुभव होता. आणि पूर्वतयारी तर मी काहीच केलली नव्हती.

बरेच तास धसके आणि दणके सहन केल्यावर अखेर एक वाजता आम्ही मसाई मारा राखीव अरण्याच्या दाराशी येऊन पोचलो. तिथं अर्थातच परवाना दाखवणं वगैरे खोळंबा करणारा ठराविक कार्यक्रम झाला. तिथल्या रखवालदारांना नुसतं जागचं उठून उभं राहायला बराच वेळ लागत होता आणि कष्ट पडत होते. त्यांना घाई अर्थात मुळीच नव्हती. हालचाली करणं हे शरीराला अपायकारक असतं आणि त्या वेगानं केल्या तर जिवाला धोका असतो, अशी त्यांची भावना दिसली. परवाना वाचून पाहणं, तो नियमानुसार दिलेला आहे की नाही याची शहानिशा करणं आणि अखेर त्यावर शिक्कामोर्तब करून तो भलामोठा दरवाजा उघडणं ही कामं किती अवघड आणि जबाबदारीची असतात, ती करायला किती वेळ लागतो हे मी भारतीय बंधू - भगिनींना सांगितलं पाहिजे असं नाही. आम्ही जर ही कामं या अंमलदारांकडून पार पाडून घेण्याचा प्रयत्न केला असता तर त्यात तास न् तास मोडले असते आणि कदाचित आम्हाला नैरोबीत परत जाऊन नवा परवाना आणावा लागला असता. पण जोसेफ या कामात वाकबगार होता. त्यानं आत कचेरीत जाऊन सिगरेटची पेटी काढली व पाच-दहा मिनिटं विचारविनिमय केला. कोणत्या स्वरूपाचा असेल याचा अंदाज 'चाणाक्ष' वाचकांनी बांधला असेलच.

नंतर आम्ही कीकोरॉक लॉजमध्ये पोचलो. तिथं मात्र बरोबर उलटा अनुभव आला. हॉटेलचा रखवालदार धावत येऊन त्यानं आमच्या कॉम्बीचा दरवाजा उघडला. 'जाम्बो' असं सुहास्य मुद्रेनं म्हणून आमचं स्वागत केलं. हॉटेलातल्या आमच्या रिझर्व्हेशनचा कागद जोसेफनं रिसेप्शन काउंटवर दिल्यावर त्याच्यावरून झर्रकन नजर फिरवून हसतमुखानं आमच्यापुढे रजिस्ट्रेशनचा कागद ठेवायला क्षणभरही वेळ लागला नाही. 'त्या कागदावर अगदी आवश्यक तेवढी माहिती भरा आणि सही करा. बाकीचं सगळं आम्ही भरू,' असं उदार आश्वासन आम्हाला अत्यंत रुंद हास्य करून देण्यात आलं! पोर्टर आमचं सामान घेऊन खोलीकडे धावला आणि खोलीत जाऊन ताबडतोब जेवायला या, कारण जेवणाची वेळ संपत आली आहे, असा प्रेमळ इशारा आम्हाला काउंटरवरच्या बाईनं दिला. डायनिंग हॉलमध्ये तिथल्या स्टुअर्डनं कमरेत वाकून आमचं असं स्वागत केलं, की जणू आम्ही जेवायला जाऊन त्याच्यावर मोठाच अनुग्रह केला होता.

अगदी जवळजवळ असलेल्या दोन ठिकाणी त्याच भागातल्या माणसांनी आमच्याशी केलेल्या वागणुकीत असं जमीन - अस्मानचं अंतर का होतं, ते समाजवादी भारतातल्या नागरिकांनी मी सांगितलं पाहिजे असं नाही.

दुपारच्या जेवणानंतर फार काळ विश्रांती घेणं प्रकृतीला अपायकारक असतं, असं जोसेफचं मत होतं. अर्थातच आम्ही म्हातारे असल्यामुळे त्यानं उदारपणे जंगल बघायला निघायची वेळ तीनऐवजी साडेतीन ठेवली होती. अर्धा तास अधिक विश्रांती मिळाल्यामुळे आमच्या अंगात विलक्षण उत्साह संचारावा हे साहजिकच होतं. त्यामुळे सुहास्य मुद्रा करून कॅमेरा, दुर्बीण, टोप्या, पाण्याच्या बाटल्या इत्यादी सरंजाम लीलेनं अंगाखांद्यावर खेळवत आम्ही बरोबर साडेतीन वाजता हॉटेलच्या दाराशी पोचलो. तेथे पोचायच्या आधी आम्ही सवड काढून चहादेखील घेतला होता. त्यामुळे आमचं हास्य अधिकच रुंद आणि तजेलदार झालं होतं. चांगलं डिटर्जंट वापरल्यामुळे अत्यंत सुखी झालेल्या टेलिव्हिजनवरच्या जाहिरातीतील कुटुंबाप्रमाणं आम्ही गाणी म्हणत नव्हतो हे खरं; पण ते केवळ तसं करणं

शिष्टाचाराला सोडून होईल असं वाटल्यामुळे!

जोसेफ आणि आम्ही आता बरेच दिवस एकत्र होतो. त्यामुळे तो मोकळेपणानं आमच्याशी बोलू लागला होता. तो म्हणाला, " मी इतके दिवस पाहतोय, तुम्ही नेहमी अगदी ठरलेल्या वेळी येता. नाहीतर तुमचे इंडियन लोक वेळेवर येत नाहीत. अर्धा अर्धा ताससुद्धा उशिरा येतात. म्हणतात, की बरोबर मुलं आहेत. त्यांनी उशीर केला. पण हे खरं नसतं. अमेरिकन आणि जपानी लोकांच्या बरोबरही त्यांची मुलं असतात; पण त्यांना उशीर होत नाही".

यावर मी काय बोलणार? एका मागासलेल्या देशातला हा माणूस स्वत: अत्यंत वक्तशीर होता आणि तो हे मला सांगत होता.

काही वेळानं मी विचारलं, "तुमचे केनियातले लोक सगळे तुझ्यासारखेच वक्तशीर असतात का?".

तो हसून म्हणाला, "छे! छे! आमचे केनियातले लोक केनिया टाइमप्रमाणे काम करीत असतात. मग किती उशीर झाला याची ते पर्वाच करीत नाहीत".

मी म्हटलं, "पण तूच नव्हे, तर सगळेच कॉम्बीचे ड्रायव्हर अगदी ठरल्या वेळी हजर असतात".

तो म्हणाला, "आम्हाला खास तसं शिक्षण दिलं जातं. आणि आम्ही वक्तशीर नाही, अशी जर आमच्याविरुद्ध तक्रार आली तर आम्हाला नोकऱ्या गमवाव्या लागतील. ठरल्या वेळी कामं झाली पाहिजेत याला आमचे युरोपियन, जपानी वगैरे गिऱ्हाईक फार महत्त्व देतात".

अर्थव्यवस्था खुली झाली म्हणजे ज्या अनेक चांगल्या गोष्टी होतात, त्यातली ही एक होती.

आम्ही कॉम्बीत बसून निघालो आणि केसमधून कॅमेरा काढण्याआधीच मसाई मारात वन्य प्राणी किती विपुल प्रमाणात आहेत त्याचा प्रत्यय आला. जोसेफनं कॉम्बी एकदम भरधाव सोडली आणि एका झाडाखाली आणली. तो म्हणाला, "बिबट्या".

मी विचारलं, "कुठं आहे?" जोसेफ म्हणाला, "त्या झाडावर होता. ही दुसरी कॉम्बी इथं आली, त्यामुळे तो चाळवला आणि झाडावरून उतरून पळाला".

आमच्या आधी त्या झाडाखाली एक कॉम्बी येऊन पोचली होती आणि हा सगळा प्रकार झाला होता. मात्र मला त्यातलं काहीच दिसलं नव्हतं. कारण कॅमेरा काढण्यात मी गुंतलो होतो. शिवाय जंगलात अचूकपणे प्राणी नजरेनं टिपण्याची जोसेफला जशी सवय होती तशी मला नव्हती.

तो बिबट्या तिथंच गवतात होता. तो एकदम तिथल्या उंच गवतातून पळत गेला. त्यानं जराही आवाज केला नाही आणि त्या उंच गवतातून पळताना तो स्पष्टसा दिसलाही नाही. केसात भांग पडावा तशी एक रेषा त्या गवतात उमटली आणि गवतात बुडालेला तो बिबट्या वाऱ्यासारखा त्या दुभंगणाऱ्या गवतातून पळत गेला. इतक्या वेगानं, की त्याचा फोटो घेणं शक्यच नव्हतं. मी चुकचुकलो. नाकुरा नॅशनल पार्कमध्ये आम्ही बिबट्या पाहिला तेव्हा तो फांदीवर अशा प्रकारे बसला होता, की त्याचा फोटो काढणं मला जमलं नव्हतं आणि आता इथं पुन्हा ती संधी हुकली होती.

तो बिबट्या कुठं गेला होता ते कॉम्बीच्या ड्रायव्हरनी पाहिलं होतं. त्यामुळं त्यांनी त्याचा पाठलाग सुरू केला. पाहता पाहता पाच - सहा कॉम्बी त्या पाठलागात सामील झाल्या. तो बिबट्या वाऱ्यासारखा गवतातून धावत एका झुडपांच्या जाळीत शिरला आणि अदृश्य झाला. शिकारी कुत्र्यांनी सावजाला गराडा घालावा तसा कॉम्बींनी त्या झुडपाला गराडा घातला; पण गराडा घालून उभं राहण्यापलीकडे त्या काही करू शकत नव्हत्या. त्यामुळे तो बिबट्या निर्वेधपणे त्या झुडपांच्या जाळीत दबून

बसून राहिला.

हा सगळा उलटाच प्रकार होता. आम्ही माणसं जर पायी चालत तिथं आलो असतो तर बिबट्याला पाहून त्याचा पाठलाग करणं दूरच राहिलं, उलट आम्हीच मागं वळून पळत सुटलो असतो. त्यानं नुसतं गुरकावलं असतं तरी आमची गाळण उडाली असती. पण आता कॉम्बीच्या लोखंडी चिलखतात बसल्यावर आम्हाला त्या बिबट्याची काहीच भीती नव्हती उलट आमच्या कॉम्बीच त्याचा शिकारी कुत्र्यांसारखा पाठलाग करीत होत्या.

थोड्या वेळानं त्या बिबट्याचा नाद सोडून आम्ही इतर प्राणी पाहायला निघालो. या मसाई मारा जंगलात फक्त रुळलेल्या वाटांवरूनच कॉम्बी चालवायची, असं बंधन नव्हतं. कुठंही ती नेता येत होती. बिबट्याचा आम्ही पाठलाग करू शकलो तो त्यामुळेच. आताही रस्ता सोडून आम्ही त्या उंच गवतातून एक झुडपांच्या जाळीजवळ आलो तेव्हा आणखी एक सहसा दृष्टीस न पडणारा प्राणी आम्हाला दिसला. खरं म्हणजे तो जोसेफला दिसला. खूण करून त्यानं आमचं लक्ष तिकडं वेधलं.

बिबट्याच्या जातीचाच तसेच ठिपके अंगावर असणारा; पण लहान असा प्राणी होता. आम्हाला वाटलं की ते बिबट्याचं पिलू असावं. पण जोसेफ म्हणाला, की तो वेगळाच प्राणी होता. रानमांजर म्हणावं, तर तो मांजराच्या मानानं मोठा होता. त्याचं नाव 'लिंक्स' किंवा 'कॅरॅकॅल'. तो प्राणी त्या उंच गवतात आम्हाला जरासाच दिसला होता. आमच्या कॉम्बीची चाहूल लागताच ते गवतात दबला आणि अदृश्य झाला. तोकड्या गवतातदेखील सिंह, बिबटे, चित्ते यांसारखे प्राणी दबून बसून जवळजवळ अदृश्य होताना आम्ही त्या जंगलात पुन्हा पुन्हा पाहिले.

आता हा प्राणी दिसणं अशक्य आहे. अस वाटून मी त्याचं नुसतं डोकंच जरासं दिसत असताना त्याचा फोटो काढला. तो फोटो नीट आलाच नाही. पण त्याच वेळेला माझ्या कॅमेऱ्यातला रोल संपला आणि गुर्र करून तो उलटा गुडाळला जाऊ लागला. ते उलटं गुंडाळणं पुरं होऊन मग तो रोल काढल्याशिवाय आणि नवा घातल्याशिवाय आता फोटो काढणं अशक्य होतं आणि त्याला दोन - तीन मिनिटं तरी लागणार होती.

तेवढ्यात जोसेफनं आमची कॉम्बी हळूच जरा पुढं घेऊन त्या झुडपाच्या दुसऱ्या बाजूला घेतली आणि गवतातून पलीकडे गेलेला 'कॅरॅकॅल' तिथं उभा असलेला दिसता. अगदी स्वच्छ दिसत होता. तो काहीसा गोंधळलेला असावा. कारण दहा - पंधरा सेकंद तरी तो तसाच उभा होता आणि मग मात्र त्या झुडपांत अदृश्य झाला. त्याचा फोटो काढण्याची दुर्मिळ संधी मी गमावली होती. समाधान इतकंच, की सहसा दृष्टीस न पडणारा तो प्राणी मी नीट पाहिला होता.

नतर आम्ही त्या विर्स्तीण सपाट जंगलात खूप हिंडलो. आमच्या सुदैवानं टांझानियातून केनियात होणारं वन्य प्राण्यांचं स्थलांतर तेव्हा सुरू झालं होतं आणिा नाना प्रकारच्या प्राण्यांचे केवढे तरी मोठे कळप टांझानियातून केनियात प्रवेश करीत होते. हजारो मेंढरांचे मोठाले कळप मी ऑस्ट्रेलियात पाहिले होते. तसेच शेकडो हरणांचे, सांबराचे. झेब्रांचे, रानरेड्यांचे आणि ग्नू नावाच्या प्राण्यांचे कळप मला पाहायला मिळतील असं मला वाटलं नव्हतं. प्रचंड मिरवणूक निघावी तसे ते शेकडोंच्या संख्येनं मसाई मारात येत होते. प्रत्येक कळपाच्या चारही बाजूंना त्यांचे रखवालदार जागरूकपणे टेहळणी करीत होते आणि मसाई मारात माजलेल्या गवतावर चरत चरत ते कळप पुढं सरकत होते. त्या कळपात छोटे बछडे होते.पण मध्येच एकदम कानात वारं भरल्यासारखं वेड्यावाकड्या उड्या मारीत धावत होते. त्यातले नर एकमेकांना आव्हान देत होते. आणि मध्येच एखादी झुंजही होत होती. प्रत्येक जातीच्या प्राण्यांचा कळप वेगळा होता. ते एकमेकांत मिसळत नव्हते; पण त्याची भांडणंही होताना दिसत

नव्हती. एक कळप दुसऱ्याला हुसकावून लावतो आहे, असं दृश्य दिसत नव्हतं. खरं म्हणजे हुसकण्याची काही गरजच नव्हती. मसाई मारात माजलेलं गवत मैल न् मैल पसरलं होतं.

निसर्गाचं ते अफाट वैभव पाहून, जीवनाचं ते वैपुल्य पाहून मी स्तिमित झालो होतो! ते दृश्य बघतच बसलो होतो. जाणवत होतं ते माझ्या आकलनाचं दारिद्र्य! निसर्गाची, प्रकृतीची विपुलता आणि विविधता किती अथांग किती गुंतागुंतीची आहे, ते माझ्या ग्रहणशक्तीच्या आवाक्यातच येत नव्हतं.

इथले प्राणी शाबाच्या जंगलात पाहिलेल्या प्राण्यांपेक्षा काहीसे वेगळे होते. इथल्या झेब्रांच्या आणि जिराफांच्या अंगावरचे पट्टे अधिक काळे आणि तजेलदार होते.

या प्राण्यांच्या कळपातून वाट काढत, त्यांच्या बछड्यांना कानात वारं भरल्यांसारखं वेड्यावाकड्या उड्या मारीत धावायला लावत आमची कॉम्बी आतापर्यंत न दिसलेल्या प्राण्यांच्या शोधाला निघाली. आम्ही सिंहांच्या शोधात होतो; पण वाटेत एका झुडपाजवळ गवतात दबून बसलेला एक चित्ता जरासा दिसला. त्याचे फक्त कान आणि जरासं डोकं आम्हाला पहिल्यांदा दिसलं. बाकीचं शरीर गवतात अदृश्य होतं. निरखून पाहिलं तेव्हा त्याचं शरीर अस्पष्टपणे दिसलं आणि मग जाणवलं, की त्या गवतात आणखी एक चित्ता आहे. मग आणखी एकाचं अस्तित्व जाणवलं आणि अखेर असं लक्षांत आलं, की तिथं पाच चित्ते आहेत. चित्ता हा असा कळपात राहणारा प्राणी आहे हे मला माहीतच नव्हतं.

प्रथमदर्शनी बिबट्यासारखा दिसणारा हा प्राणी पुष्कळ वेगळा आहे, हे त्या चित्त्याकडं निरखून पाहताना जाणवलं. मध्येच एक चित्ता अर्धवट उभा राहिला. इतरांनीही माना वर करून आमच्याकडं दृष्टी लावली तेव्हा त्यांचं वेगळेपण स्पष्ट झाल. त्यांचा बांधा वेगळा होता. बिबट्यांइतका तो मजबूत नव्हता. पाय अधिक लांब होतं. रंग काहीसा फिका होता आणि चेहऱ्यावर दोन्ही डोळ्यांकडून तोंडाच्या कोपऱ्यांकडे जाणाऱ्या काळ्या रेषा होत्या. त्याचं डोकं आणि तोंडही बिबट्याच्या मानानं लहान होतं आणि बिबट्यांसारखा तो एकांडा, फटकून राहणारा नव्हता. तो कळपात राहणारा होता.

आधीच्या अरण्यात आमच्या दृष्टीला न पडलेल्या सिंहांनी त्या चुकारपणाची भरपूर भरपाई मसाई मारात केली. तीन सिंहांचं एक कुटुंबच पहिल्यांदा आमच्या दृष्टीस पडलं. त्यांना अर्थात कोणाची भीती नव्हती. त्यामुळे लपायचीदेखील गरज नव्हती. आरामात गवतात ते झोपले होते. त्यातला एक होता काळ्या आयाळीचा भव्य सिंह आणि बरोबर होत्या दोन माजलेल्या सिंहिणी. त्यांची शरीरं पुष्ट होती. खायची, प्यायची त्यांना ददात नव्हती त्यांच्या आसपास त्यांच्या अन्नाचे कळपच्या कळप चरत होते.

आमची कॉम्बी जवळ आल्यावर इतर प्राणी तिची दखल घेत होते. बिबट्यासारखे प्राणी तर आमच्या वाऱ्याला उभे राहत नव्हते. सिंह आम्हाला पाहून उठून दूर जात नव्हतेच; पण आमची दखलही ते घेत नव्हते. आपल्या जीवनात उगीच कोणी डोकवतं आहे, विश्रांतीत व्यत्यय आणतंय असंही त्यांना वाटत नव्हतं. आम्ही जणू तेथे नाहीच अशा प्रकारे त्यांचे व्यवहार चालले होते.

मध्येच एक सिंहीण उठून बसली. उभी राहिली अर्धवट आपल्याशीच गुरगुरली प्रियाराधनाचं ते आमंत्रण होतं, कामप्रेरणा जागृत झाल्याचं ते निदर्शक होतं हे आम्हाला कळलंच नाही. पण आळसावून झोपलेला सिंह मात्र तो विविक्षित प्रकारचा गुरगुराट ऐकून उठून उभा राहिला. आपण सिंहीणीच्या मागे जाऊं लागला. ती गुरगुरत थोडी दूर सरकत होती. आणि जमिनीवर अगदी सपाट होऊन बसली होती: अखेर तिनं सिंहाला

जवळ येऊ दिलं आणि ती अशी सपाट बसलेली असताना तो तिच्याशी रतला. हे चाललेलं असताना ती सारखी गुरगुरत होती. हे गुरगुरणं प्रेमाचं असावं. पण मला तरी ते उग्र भीतीदायक वाटत होतं. रतणं झाल्यावर ती सर्रकन सिंहाच्या खालून गुरगुराट करीत पुढे गेली. सिंहानं पुन्हा तिच्याशी रतण्याचा प्रयत्न केला. पण तिनं गुरगुराट करीत त्याला जवळ येऊ दिलं नाही. सिंहानं मग तिचा नाद सोडला आणि तो खाली बसून पुन्हा झोपला. सिंहीण त्याच्या जवळ गवतात लोळली आणि मग झोपी गेली. हे सगळं चाललेलं असताना ती दुसरी सिंहीण जवळच झोपलेली होती. ती जराही विचलीत झाली नाही.

प्राण्यांच्या रतिक्रीडेत बराच वेळ प्रियाराधनात जातो. त्या वेळी माणूस जवळ असलेला त्यांना चालत नाही, असं मी पाहिलं होतं. पण इथं प्रियाराधन फारसं झालंच नाही. माणसाची त्यांना अडचण वाटली नाही.

नंतर इतरही सिंह आम्हांला दिसले. एक सिंहीण एक उंच खडकावर एकटीच बसलेली आम्हाला आढळली. ती एकटीच कशी? ती कळपात कशी नाही? असे प्रश्न मला पडले.

नंतर गवतात मुरून बसलेली एक तरसांची जोडी आम्हाला दिसली. त्यांची फक्त डोकी आणि टवकारलेले कान गवतातून आम्हाला दिसत होते आणि लक्ष वेधून घेत होते ते त्यांचे काळेभोर जागरूकपणे आमच्यावर रोखलेले डोळे!

प्राण्यांची त्या ठिकाणी एवढी झुंबड होती, की सिंह, चित्ते, बिबट्या यांच्यापासून हरणं, झेब्रे वगैरे प्राणी फार दूर नव्हते. मला वाटत होतं, की सिंहापासून बऱ्याच अंतरावर राहण्याचा हे चरणारे प्राणी प्रयत्न करीत असतील. पण ते सिंहापासून चार - पाचशे यार्डांवर शांतपणे चरत होते.

त्यांच्या दृष्टीनं हे अंतर सुरक्षित असावं किंवा त्या अरण्यात सिंहांपासून याहून दूर राहणं शक्य नसावं. मृत्यूच्या सान्निध्यात जीवन जगलं जात होतं. जंगलातली जीवनरहाटी चाललेली होती.

या अर्ध्या दिवसात आम्ही जंगलातले जवळजवळ सगळे प्राणी पाहिले होतं. गेंडे तिथं फारसे नव्हते. हत्ती होते; पण आम्हाला एकच दुरून निसटता दिसला होता. त्याला शोधत उद्या जंगलात फिरायचं असं ठरवून आम्ही तृप्त मनानं हॉटेलवर परतलो.

◆ ◆ ◆

*हसा माझ्या लांबलचक मानेला पण हा हिरवा कंच पाला मीच खाऊ शकतो*



*पाणीसुद्धा सावधपणे प्यावं लागतं या जंगलात*



ललित्य, अंगावरच्या रेषांचं आणि पर्णराजीच्या नक्षीचं





## सिंहाचे जेवण!

संध्याकाळी हॉटेलात गेल्यावर तिथली रचना, तिथल्या सुखसोयी वगैरे पाहायची संधी मिळाली. सगळं बांधकाम एकमजलीच होतं. मुख्य इमारतीत ऑफिस, लॅबी, लाऊंज, डायनिंग हॉल वगैरे होतं आणि राहण्याची व्यवस्था जवळच अर्धवर्तुळाकार बांधलेल्या छोट्या छोट्या बंगल्यांत होती बंगल्यांनी वेढलेल्या आवारात छोटा बगीचा होता, लॅान मोअरनं व्यवस्थित कापलेलं लॅान होतं. पलीकडे फुलझाडांच्या कुंपणाच्या आडोशाला एक पोहण्याचा तलाव होता.

एका बाजूला जिथे हॉटेलची हद्द संपत होती, तिथं एक भलंमोठं मजबूत कुंपण होतं. त्या कुंपणात एक छोटा दरवाजा होता. त्यातून पलीकडे गेलं, की बांधून काढलेल्या एका लांबलचक लाकडी पुलावरून पलीकडच्या अरण्यात एक छोटासा फेरफटका मारून पुन्हा हॉटेलच्या आवारात येता येत होतं. या पुलाच्या खाली होती एक छोटीशी घळ. तिच्यात गर्द झाडी होती. एका बाजूला पाणथळ होती आणि जरा पुढे एक जलाशय होता. त्या पुलावर एका वळणाशी एक छोटं झोपडं होतं. तिथं एक बार होता. त्या बारमध्ये एखादं पेय पीत बसलं, की त्या जलाशयातलं पाणी प्यायला आलेली श्वापदं दृष्टीस पडण्याची शक्यता होती. खरं म्हणजे तो सगळा लांबलचक पूलच पाणी प्यायला आलेली श्वापदं पाहता यावी म्हणून बांधलेला होता.

त्या पुलावरून आम्ही फेरफटका मारला; पण एक - दोन कचकचणारी माकडं सोडली तर आम्हाला एकही श्वापद दिसलं नाही. पण नेहमीच असं नसतं. तेथून एकदा एका पाणी प्यायला आलेल्या झेब्र्यांची सिंहानं केलेली शिकार पाहण्याची संधी काही लोकांना लाभली होती. आम्हाला संध्याकाळी तिथं थंडी जाणवली. ती सुखकारक असली तरी त्या हवेत पोहणं मला तरी सुखकारक वाटलं नसतं, पण त्या हवेतही काही माणसं पोहून ताजीतवानी होत होती. मी मात्र कडकडीत शॉवरखाली अंघोळ करून मग मद्य चाखत बसून राहिलो. खिडकीबाहेर पक्षी चिवचिवाट करीत लॅानवर उतरत होते आणि भर्रभिर्र करीत इकडे तिकडे उडत होते. काही माणसं त्या लॅानवर बसून पक्ष्यांना खाऊ घालत होती.

रात्रीचं जेवण भरघोस होतं. सहा - सात कोर्सेस वेटर मोठ्या आदबशीरपणे आणत होते आणि समोर मांडत होते. डायनिंग हॉलला भिंती नव्हत्या. त्यामुळे बाहेर दाटणारा अंधार आतल्या दिव्यांच्या प्रकाशात उजळत होता.

जेवण झाल्यावर एक आफ्रिकन रानटी नृत्याचा कार्यक्रम होता. तो पाहावा असं वाटतं होतं, पण आम्ही इतके थकलो होतो, की डोळ्यांवर झोपेची झापड येत होती. त्यामुळे आम्ही खोलीवर जाऊन झोपलो. आम्ही झोपत होतो आणि बहुधा त्या वेळी दिवसभराची विश्रांती संपवून सिंह, बिबटे आणि चित्ते शिकार करण्यासाठी बाहेर पडले असावेत.

दुसऱ्या दिवशी सकाळी मस्तपैकी न्याहारी करून आम्ही बाहेर पडलो. सकाळची न्याहारी हे माझं सर्वांत आवडतं जेवण. छानपैकी चहा किंवा कॉफी घेऊन तरतरी आणायची, मग ऑम्लेट नाहीतर पॅनकेक खायचे. तिथे आपल्यासमोरच आपल्याला हवं तसं ऑम्लेट करून घ्यायची सोय होती. ऑम्लेटबरोबर कुरकुरीत बेकन खायला मला आवडतं. ऑम्लेट खाताना बरोबर कधी कडक तर कधी लुसलुशीत पाव लोणी लावून खायचा आणि उरलेला पाव नंतर उत्तम चवदार चीजबरोबर खायचा. कधी शिष्टाचारांची पर्वा न करता मी तो चहात बुडवून खातो. जास्त भूक लागली असली तर ऑम्लेट खायच्या आधी दुधातून एखादं कॉर्नफ्लेक्ससारखं सीरिअल खातो. त्यात बेदाणे, नट्स आणि कापलेल्या स्ट्रॉबेरीज टाकल्या तर आणखीनच मजा येते. चांगल्या हॉटेलात ब्रेकफास्टला नाना फळांचे रस असतात आणि ताजी फळंही असतात. शिवाय एखादा गोड केकही असतो. हे पाश्चात्त्य ब्रेकफास्ट जितकं मला आवडतं, तितकी त्यांची इतर जेवण मला आवडत नाहीत. अर्थात त्यातले काही पदार्थ आणि सर्वच स्वीट डिशेस मला आवडतात.

सगळ्यात उत्तम ब्रेकफास्ट मी खाल्लं नैरोबीच्या मेफेअर कोर्ट हॉटेलमध्ये; पण इतर हॉटेलातही ब्रेकफास्टही चांगली होती. त्यामुळे प्रवासात माझी दिवसाची सुरवात नेहमीच चांगली होत होती.

जंगलात गेल्यावर इतर प्राण्यांचे मोठमोठे कळप तर सर्वत्र दृष्टीस पडत होतेच; पण आम्हाला सिंहही पुष्कळ दिसत होते. मी असं वाचलं होतं, की प्रत्येक वाघाचा स्वतःचा असा कित्येक मैल परिघाचा प्रदेश असतो आणि त्यात दुसरा वाघ आलेला त्याला खपत नाही. दुसरा वाघ आलाच तर मग दोन वाघांची प्रचंड झुंज होते आणि तीत एखादा वाघ मारलाही जातो. वाघाच्या बाबतीत जे खरं आहे ते सिंहाच्या बाबतीतही असावं, असं मला वाटत होतं; पण या जगलात एक सिंहाच्या कळपापासून अर्ध्या मैलाहूनही कमी अंतरावर आम्हाला त्याचा दुसरा कळप दिसत होता आणि त्याबाबत कोणताही कळप तक्रार करताना दिसला नाही.

अजून सकाळ ताजी होती. त्यामुळे सिंह हालचाली करत होते. एक सिंहीण एकटीच कशाच्या तरी शोधात होती. तिनं इकडे तिकडे पाहिलं आणि मग आमच्या कॉम्बीच्या अगदी जवळून ती झपझप पावलं टाकीत एक उंचवट्यावरून खाली उतरली आणि कुठेतरी निघून गेली. तिनं आमच्या कॉम्बीच्या अस्तित्वाची दखलदेखील घेतली नाही. कान टवकारायला लावणारं कुतूहल, कान पाडून गुरगुरणारी नाराजी किंवा चपापून थांबायला आणि मग मागं वळून पळायला लावणारी भीती यातलं काहीच तिनं व्यक्त केलं नाही. ती आमच्या कॉम्बीच्या इतकी जवळून गेली, की मी तिच्या अंगाला स्पर्शदेखील करू शकलो असतो.

सिंहांनी असं वागावं हे मला अनैसर्गिक वाटलं. मी असं वाचलं होतं, की माणूस जर एका मर्यादेपेक्षा जवळ आला तर जंगलातला सिंह गुरकावून त्याल अधिक जवळ येऊ नको, असा इशारा देतो. सिंहिणीची जर लहान पिल्लं असली, तर तो इशारा अधिकच जोरदार असतो. आम्ही पायी फिरत नव्हतो. कॉम्बीतून फिरत होतो, हे खरं; पण इतर प्राणीदेखील आमची कॉम्बी फार जवळ आली तर दूर जात होते. आमच्यापासून काही धोका नाही, हे अनुभवानं माहीत असूनही एक किमान सुरक्षित वाटणारं अंतर त्यांच्यात आणि आमच्यात ठेवत होते; पण या सिंहांचं वागणं वेगळंच होतं.

थोड्या वेळानं आम्हाला एक सहजतः न दिसणारं दृश्य दिसलं. एक काळ्या आयाळीचा भलामोठा सिंह एक मारलेला 'ग्नू' खात होता. ही शिकार नुकतीच झालेली असावी. त्या सिंहाचं तोंड रक्तानं माखलेलं होतं. त्यामुळे ते दृश्य अधिकच उग्र वाटत होतं.

मी त्या मारलेल्या ग्नूकडे पाहिलं. ते जनावर आडवं पडलं होतं आणि त्याच्या पोटातून एक भली मोठी तटतटून फुगलेली पिशवी बाहेर पडली होती. तिच्यावर तांबुस पांढुरकं पातळ आवरण होतं. पातळ असलं तरी ते मजबूत असावं. कारण एवढी शिकार झाली. ग्नू कोसळला पोटातून ती पिशवी बाहेर आली तरी ते आवरण फाटलं नव्हतं. ती पिशवी म्हणजे उघडच गर्भ होता ती मारली गेलेली ग्नू ही गाभण असलेली मादी होती. ती व्यायच्या अगदी बेतात आली असावी. गाभण असल्यामुळेच तिचा धावण्याचा वेग कमी झाला असावा आणि ती सिंहाची शिकार झाली असावी.

सिंह कळपानं शिकार करतात; आणि खातात पण इथे एकटाच मोठा सिंह होता. सिंहिणी आणि बच्चे कुठे दिसत नव्हते. मी असं वाचलं होतं, की कळपातल्या कोणीही शिकार केली तरी तिच्यावर पहिला हक्क कळपाचा प्रमुख असलेल्या सिंहाचा असतो. तो आपल्याला हवं तेवढं खाऊन दूर झाला, की मग कळपातले इतर सिंह शिकारीला तोंड लावतात. मला वाटलं, की हा तसाच प्रकार असावा, की इतर सिंह दूर जाऊन बसले असावे. मी आजूबाजूला पाहिलं, पण इतर सिंह काही दृष्टीस पडले नाहीत.

मला वाटलं होतं, की सिंह जनावराचं कातडं फाडून मांसाचे मोठाले लचके आपल्या दातांनी काढून खात असेल. आदल्या दिवशी मी सिंह पाहिला तेव्हा त्यानं आपलं तोंड दोन तीनदा उघडलं होतं आणि त्यापैकी त्याचे ते भलेमोठे अणकुचीदार सुळे मी पाहिले होते.

पण मला आढळून आलं, की सिंह अशी फाडाफाड करून शिकार खात नाही. तो फार जपून आणि व्यवस्थितपणे आपली शिकार खातो. नीट जेवावं, उगीच अन्नाचा नाश करू नये, असं त्यांची आई त्याला शिकवत असावी आणि आज्ञाधारकपणे तो ते शिकत असावा. या सिंहानं पहिल्यानं मानेजवळचं रक्त चाटून चाटून खाल्लं. मग त्यानं जागचं उठून त्या ग्नूचं पोट फाडलं आणि त्यात तोंड खुपसून तो मांस खाऊ लागला. मध्येच हाड फोडल्याचा आवाज येत होता, पण मांस कातड्यांच्या बाहेर येऊ नये, ते उघडं पडू नये, अशी तो काळजी घेत होता.

ती एवढी मोठी गर्भाची पिशवी बाहेर आली होती पण ती त्यानं तशीच ठेवली. तो ग्नूच्या पोटात तोंड खुपसून काय खात होता ते दिसत नव्हतं. पण त्यानं मांस फारसं खाल्ल्यासारखं दिसलं नाही. पोटातलं खाऊन झाल्यावर त्यानं ती गर्भाची पिशवी जराशी फाडली आणि तिच्यातल्या पोराचं तोंड जरासं ओढून बाहेर काढलं पण तिथंही त्यानं तोंडाची हाडं फोडली नाहीत. मांसाचे लचके तोडले नाहीत. एक दोनदा हाड फोडल्याचा आवाज आला तेवढाच. मग त्यानं रक्तच चाटलं की काय?

एव्हाना तिथे पाच - सहा कॉम्बी येऊन थडकल्या होत्या. फारच माणसं जमा झाली म्हणून तो अस्वस्थ झाला, की त्याचं खाऊन झालं होतं कोण जाणे! पण एकदम तो खायचा थांबला आणि चालायला लागला. दूर निघून गेला.

एव्हाना तिथे बरीच गिधाडं जमा झाली होती. आणि सिंहापासून काही अंतरावर एकामागं एक तीन तरी अर्धवर्तुळाकार रांगा करून जराशा अस्वस्थ हालचाली करीत शांतपणे उभी होती. वकिलांनी अंगावर चढवलेल्या गाऊनसारखे त्यांचे ते भले मोठे काळसर पंख दिसत होते.

त्यांचं ते तसे उभं राहणं मला अत्यंत विनोदी वाटलं. त्यांच्या त्या तशा उभ्या राहिलेल्या रांगा पाहून मला प्रायोगिक नाटक पाहायला आलेल्या

प्रेक्षकांची आठवण झाली. त्या प्रेक्षकांच्या मुद्रा अतिशय गंभीर असतात. समाजातील अत्युच्च दर्जाची रसिकता जितीजागती ठेवण्याची अवजड जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आहे, असं सारखं जाणवत असतं. नाटक कितीही कंटाळवाणं असलं, कितीही लांबलं तरी कंटाळून उठून जायचं नाही, असा दृढ निर्धार त्यांनी केलेला असतो. या गिधाडांचं शांतपणे उभं राहणं आणि त्यांच्या गंभीर मुद्रा अगदी हुबेहुब तशाच वाटत होत्या.

सिंह उठून गेल्यावर ती गिधाडं हळूहळू पुढे सरकू लागली. तेवढ्यात इतका वेळ एका झाडीत बसून राहिलेली सिंहीण धावत पुढे आाली आणि तिनं शिकारीचा ताबा घेतला.

गिधाडांच्या रांगा जरा पुढे सरकून पुन्हा अस्वस्थपणे उभ्या राहिल्या. सिंहीण त्या ग्नूच्या पोटात तोंड खुपसून खाऊ लागली.

शिकार करून मारलेला ग्नू खाण्याचा हा कार्यक्रम असा चालला होता आणि तीनचारशे यार्डांच्या अंतरावर एक ग्नूचा कळप शांतपणे चरत होता. जणू त्यांच्यातला एक मारलाच गेला नव्हता. जणू आपल्यातला एखादा असा अधूनमधून मारला जाणं हा जीवनातला नित्यक्रम होता.

माझी अशी अपेक्षा होती, की ग्नूपेक्षा आकारानं लहान असलेली हरणं सिंहांकडून अधिक प्रमाणात मारली जातील, पण मला असं दिसून आलं, की हे ग्नूच जास्त प्रमाणात मारले जात होते.

हा ग्नू म्हणजे एक विचित्र दिसणारा प्राणी असतो. जोसेफ त्याला ग्नू म्हणायचा; पण पुस्तकात त्याचं नाव होतं 'वाइल्ड बीस्ट'. त्याचं शरीर असतं घोड्यांच्या शरीरासारखं, पण त्याचं डोकं मात्र असतं बैलाच्या डोक्यासारखं. अर्थातच त्याला शिंगं असतात. त्याच्या मानेवर थोडीशी आयाळ असते आणि मानेखाली असते लांबलचक दाढी, मेंढ्यांची असते तशी. सांबराच्या जातकुळीचा हा प्राणी काही मला देखणा वाटला नाही. मसाई मारात प्रवेश करणाऱ्या कळपात सर्वांत मोठे कळप या प्राण्यांचेच होते. सिंहांनी यांचीच मुख्यतः शिकार केलेली मला दिसली. हे साहजिकच होतं. सिंहांचे ते आवडतं खाद्य आहे, अशी पुस्तकात नोंद केलेली होती.

ज्या टांझानियाच्या सरहद्दीतून हे हजारो प्राणी येत होते, ती दाखविण्यासाठी जोसेफ आम्हाला तिकडे घेऊन गेला. जाताना वाटेत आम्हाला त्या अरण्याचे काही रखवालदार एका जागी उभे असलेले दिसले. त्यातल्या एकाला मारा नदीवर जायचं होतं. आम्हीदेखील सरहद्द पाहून तिकडेच जाणार होतो. तेव्हा त्यानं आपल्याला तिथे घेऊन जायची जोसेफला विनंती केली. जोसेफनं आम्हाला विचारलं आणि आम्ही अर्थातच आनंदानं त्याला कॉम्बीतून येण्याची परवानगी दिली. जोसेफ म्हणाला, की ते अरण्य फार मोठं होतं, पण सरकारनं रखवालदारांना अगदीच थोडी वाहनं दिली होती. त्यामुळे त्यांना आमच्यासारख्या पर्यटकांची परवानगी काढून आमच्या गाड्यांतून प्रवास करावा लागत होता.

सरहद्दीवर कुंपण वगैरे तसं काहीच नव्हतं. फक्त एक सिमेंटचा भलामोठा खांब तिथे पुरलेला होता. तिथे केनिया संपला होता आणि टांझानिया सुरू होत होता. रक्षक वगैरे कोणीच नव्हते. जोसेफनं आम्हाला आणि त्या रक्षकाला देखील शंभर एक फूट टांझानियात नेऊन परत आणलं. तो हसत म्हणाला, "इथे आपल्याला टांझानियाच्या रक्षकानं पकडलं असतं तर चांगलाच दंड (मला वाटतं दीडशे डॉलर) भरावा लागला असता."

तिथे त्या वेळी मला आठवण झाली ती मी भारत-पाकिस्तानची वाघा सरहद्द पाहिली होती त्याची. ग्रिंडलेज बँकेच्या ॲडव्हायझरी बोर्डावर तेव्हा मी होतो आणि आमच्या बोर्डाची सभा तेव्हा अमृतसरला होती. सभा संपल्यावर गाव पाहण्याचा छोटासा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. त्यात आम्ही सुवर्णमंदिर पाहिलं आणि मग थोड्या अंतरावर असलेल्या वाघा सरहद्दीकडे गेलो. तिथे कुंपण होतं आणि दोन्ही देशांचे सैनिक होते.

सरहद्दीवर भारतीय बाजूला एक द्वार होतं आणि त्याच्या समोरच पाकिस्तानच्या हद्दीत दुसरं द्वार होतं. सूर्य मावळत होता आणि आपापले झेंडे उतरवण्याची वेळ झाली होती.

झेंडे उतरवणं हा छोटासा समारंभच होता. पाकिस्तानी सैनिकांनी आपलं द्वार उघडलं, भारतीय सैनिकांनी आपलं द्वार उघडलं. मग दोन्हीकडचे सैनिक व अधिकारी एकमेकांच्या समोर येऊन उभे राहिले. दोन्ही द्वारांच्या मधल्या चिंचोळ्या जागेत मध्यावर एक पांढरी रेषा होती. तिच्या या बाजूला आमचे आणि त्या बाजूला त्यांचे सैनिक उभे राहिले. आम्ही खास पाहुणे म्हणून आमचे अधिकारी आम्हाला त्या रेषेच्या अलीकडेच राहण्याचा सक्त इशारा दिला होता. आम्ही सर्वांनीच तो आज्ञाधारकपणे पाळला. कारण कोणाचीच पाकिस्तानी तुरुंगात खितपत पडायची इच्छा नव्हती. मग सलाम्या झडल्या - एकमेकांना, आपापल्या ध्वजांना. नंतर ब्युगल वगैरे सैनिकी वाद्यं वाजली. दोन्ही बाजूंचे ध्वज उतरवले गेले. आम्ही परतलो.

दोन्हीकडची द्वारं बंद झाली. आम्ही परत आलो तेव्हा आमच्याबरोबर असेलली एका डायरेक्टरची बायको एखाद्या लहान मुलीसारखी अगदी खुदूखुदू हसू लागली. साहजिकच आम्ही तिला हसायला काय झालं, असं विचारलं.

तेव्हा ती हसत हसत म्हणाली, ''सांगू का, सलाम्या झडत होत्या आणि ब्युगल वाजत होती, तेव्हा मी गपचूप एक पाय रेषेच्या पलीकडं त्यांच्या हद्दीत ठेवला होता''.

आम्ही सगळेच हसलो. आम्हाला तिची गंमत वाटली.

मग ती म्हणाली, ''मी मुद्दामच तसं केलं. हा सगळा देश खरं म्हणजे आमचा; पण त्या लोकांनी त्याचा एक भलामोठा तुकडा आमच्याकडून हिसकून घेतला. म्हणून मी मुद्दाम त्या बाजूला पाय ठेवला होता. म्हटलं हा देश आमचा आहे. तुम्ही कोण आम्हाला त्या बाजूला पाय ठेवू नका असं म्हणणारे?''

मग पुन्हा स्वतःवर खूष होऊन ती बाई लहान मुलीसारखी खुदूखुदू हसू लागली. जणू आपण पाकिस्तान जिंकून घेतला, असं तिला वाटलं होतं.

बाई चांगली पन्नाशीतील होती; पण ही पोरकट इच्छा तिच्या मनात इतकी प्रबळ हाती!

आज इतकी वर्षं मी माणसं पाहतो आहे, तरी असं मानवी स्वभावाचं अगदी अनपेक्षित दर्शन ती मला पुन्हा पुन्हा घडवत असतात. कधी असं हसू आणणारं, कधी रडू आणणारं, कधी चीड आणणारं, कधी तिटकारा निर्माण करणारं आणि कधी अस्वस्थ करणारं.

त्या बाईनं जसा पाकिस्तान पादाक्रांत केला होता, तसा टांझानिया पादाक्रांत करून आम्ही परत फिरलो आणि मारा नदीच्या किनाऱ्यावर जाऊन पोचलो.

नदीचं पात्र काही खूप मोठं आणि रुंद नव्हतं, पण ते पात्र दुथडी भरून पाणी वाहत होतं. त्या पाण्यात पाणघोडे उतरून बुडी मारून बसलेले होते आणि त्यांना बघायला देशोदेशीचे अनेक पर्यटक तिथे जमले होते. त्यात आम्हीही सामील झालो.

त्या अरण्यात कॉम्बीतून उतरायची पर्यटकांना परवानगी नव्हती,पण 'हिप्पो' म्हणजे पाणघोडे बघण्यासाठी त्या नदी किनाऱ्यावर मात्र तशी परवानगी होती. इतके पर्यटक खाली उतरणार तेव्हा त्यांच्या संरक्षणाची काहीतरी व्यवस्था करायची आवश्यकता होती. त्यासाठीच तो रक्षक आमच्या कॉम्बीतून तिथं आला होता. तो कॉम्बीतून उतरला आणि आपली बंदूक सरसावून आपलं काम बजावू लागला.

इतकी माणसं, इतकी साधनं घेऊन नदीकिनाऱ्यावर त्या पाणघोड्यांना

पाहायला, त्यांची छायाचित्रं काढायला जमा झाली होती. त्या पाणघोड्यांना आम्ही दिसत होतो, पण ते बेटे पाण्यातून बाहेर किनाऱ्यावर यायला तयार नव्हते. बाहेर येणं सोडून द्या, पण नदीच्या पात्रात उभे राहून अर्धवटसं दर्शनही आम्हाला द्यायला ते तयार नव्हते. ढिम्म पाण्यात बुड्या मारून बसले होते. आम्हाला फक्त त्यांचे अगदी छोटे छोटे कान, डोळे आणि जरा वर आलेली नाकपुड्यांची भोकं दिसत होती. बाकी गेंड्याइतका मोठा असलेला पाणघोडा पाण्याखाली अदृश्य होता. मध्येच एखादा नाकातून पाण्याचा फवारा उडवायचा. मग पुन्हा मात्र नदीत सामसूम. बराच वेळ ताटकळल्यावर मी म्हटले, ''अरे बेट्यांनो जरा बाहेर या की?''

तेव्हा एक फ्रेंच बाईदेखील फ्रेंचमध्ये काहीतरी बोलली. मी म्हणालो तसेच काहीतरी ती म्हणाली असावी. मग एका जपानी तरुणाने जपानी भाषेत त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. पण अंहं! ते अजिबात दाद द्यायला तयार नव्हते.

नंतर आमच्याबरोबर आलेला तो रक्षक एका ड्रायव्हरशी स्वाहिली भाषेत काहीतरी बोलला; पण तेदेखील त्या पाणघोड्यांनी न ऐकल्यासारखं केलं. पाण्यात ते थोडेच इकडून तिकडे हालत होते, पण इतर हालचाल नाही.

असं काहीच घडत नसताना एक पाणघोड्यानं आपली भली मोठी सुळसुळीत पाठ इंचभर वर काढली, तेव्हा सगळे कॅमेरे सरसावून धावले, पण त्या इंचभर वर आलेल्या पाठीला उन्हाचा ताण असह्य झाला असावा कारण लगेच तो पाणघोडा पुन्हा सगळाचा सगळा पाण्यात बुडाला एकदा दोन पाणघोड्यांत थोडासा तंटा झाला आणि पाण्यात बराच खळबळाट झाला. पण पाणघोड्यांनी आपली भांडणं देखील पाण्याखालीच भांडावी, असा त्यांचा नियम असावा. त्यामुळे पाण्याखालचं ते भांडण पाण्याखालीच मिटलं.

बराच वेळ ताटकळल्यावर आम्ही जोसेफला विचारलं, ''हे पाणघोडे पाण्याबाहेर येणारच नाहीत का?''

तो हसून म्हणाला, ''त्यांच्या कातड्यांना ऊन जराही सहन होत नाही आणि आता तर ऊन स्वच्छ पडलं आहे. तेव्हा ते सूर्य मावळेपर्यंत असेच पाण्यात बुडून राहतील. अंधार पडायला लागला म्हणजे ते बाहेर येतील आणि चरतील''.

अंधार पडेपर्यंत तिथे थांबणे आम्हाला शक्य नव्हतं. त्यामुळे पाणघोड्यांच्या असभ्य वर्तनाबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करीत आम्ही कॉम्बीत बसलो.

कॉम्बीत बसता बसता मी जोसेफला विचारलं, ''पाणघोडे नाहीत तर नाही, पण इथे सुसरी तरी आहेत का? त्या आम्हाला दिसतील का?''

तो म्हणाला, ''पाणघोडे जिथे असतात तिथे सुसरी येत नाहीत''.

सुसरी जवळ आलेल्या पाणघोड्यांना खपू नये, यात त्यांचं काही चुकत होतं असे कोण कसं म्हणणार! मला इतकंच म्हणावंस वाटतं, की सुसरीलादेखील दाद न देण्याइतकं ज्यांचं सामर्थ्य अफाट असतं आणि कातडी जाड असते त्या पाणघोड्यांना उन्हाला तोंड देता येऊ नये, ही अत्यंत नामुष्कीची गोष्ट होती.

हॉटेलवर परतताना सकाळी सिंहांनी मारलेल्या ग्नूची किंवा 'वाइल्ड बिस्ट' ची काय अवस्था झाली आहे, हे पाहावं म्हणून आम्ही जोसेफला आमची कॉम्बी त्या ठिकाणी न्यायला सांगितलं.

आम्ही पाहातो तो आता त्याच्या फासळ्यांचा सांगडा अगदी स्वच्छ केलेला होता. सिंहाचं केव्हाच खाऊन झालेलं होतं आणि आता गिधाडं शरीराच्या मागच्या भागांवरचं कातडं आपल्या मोठाल्या चोचींनी तोडत होती, उरलंसुरलं मांस उचकत होती. काही वेळात त्या मागल्या भागाचाही केवळ हाडं शिल्लक राहिली असती आणि मग किड्यामुंग्यांनी उरलंसुरलं

सफाईचं काम पुर केलं असतं.

पगार न घेता मन लावून अत्यत कसोशीनं काम करणारे ते निसर्गाचे सफाई कामगार पाहून मला वाटलं, की आमच्या मुंबईत असे कामगार असते तर किती बरं झालं असतं!

◆◆◆





*अगडबंब देह असला तरी मला जमिनीवरही राहता येतं*





## अरण्य प्राण्यांचे ....माणसांचे....

हॉटेलवर जाऊन आम्ही जेवलो. विश्रांती घेतली आणि पुन्हा चार वाजता श्वापदं पाहण्यासाठी अरण्यात शेवटचा फेरफटका मारायला बाहेर पडलो. हा फेरफटका संपल्यावर आम्ही दुसऱ्या दिवशी सकाळी नैरोबीला जाणार होतो आणि मग विमानातून बसून मुंबई.

हॉटेलातून बाहेर पडून थोडं अंतर गेल्यावर जोसेफनं एका झाडाखाली कॉम्बी उभी केली. तो म्हणाला, ''हे झाड पाहायला सॉसेजीससारखी लांबडी फळं येतात, म्हणून त्याला सॉसेज ट्री म्हणतात''.

आम्ही वर पाहिलं तर खरंच, एखाद्या लहानशा काकडीइतकी लांब असलेली फळं त्या झाडावर नुसती लगडलेली होती. जोसेफ म्हणाला, ''या फळात मद्यार्क असतो. ती खाल्ली तर दारू चढावी तसं होतं. रानातले लोक ही खातात आणि यांच्यापासून दारूही करतात.

असं एक झाड आपल्या घराच्या आवारात असावं असं अनेकांना नक्कीच वाटेल!

त्या झाडाच्या आजूबाजूला माकडं वावरताना मला दिसली. तेव्हा मी जोसेफला विचारलं, ''ही फळं माकडं आणि पक्षी खातात का? आणि खाल्ल्यावर यांच्यावर परिणाम होतो का?''

जोसेफ हसून म्हणाला, ''होतो की. त्यांच्यावर होतो आणि पक्ष्यांवरदेखील होतो''.

असं रंगात आलेलं एखादं माकड अगर पक्षी बघावा असं मला वाटल.

आमच्या कॉम्बीचं छप्पर वर उचलल्यावर जी चांगली दोन फुटांची फट पडत होती तिच्यातून एखादा प्राणी आत तर येणार नाही, अशी शंका आम्हाला अनुभव आला होता. त्यामुळं आज तसं काही होईल अशी शंकाही आमच्या मनात नव्हती.

असे आम्ही गाफील असताना एक भला भक्कम लांबट काळ्या तोंडाचा ब्हेर्वेट जातीचा वानर सर्रकन, आमच्या कॉम्बीवर चढला आणि छपराच्या कडेवर बसून आमच्या कॉम्बीत डोकावून पाहू लागला. वानर आक्रमक होऊ शकतो, यांचा अनुभव मी महाबळेश्वरला घेतला होता; पण त्यावेळी माझ्या हातात एक मजबूत काठी होती. आता काहीच नव्हतं, आणि तो वानर माझ्यापासून चार फूट अंतरावर उंचावर बसलेला होतो. एका उडीत तो माझ्या अंगावर येऊ शकला असता आणि दुसरं काही नाही तरी त्यानं मल चांगलंच ओरबाडलं असतं.

आपला चेहरा वाचवावा म्हणून मी तो हातांनी झाकला आणि जोसेफला म्हटलं, ''त्याला हाकल''.

पण जोसेफनं तसं काही केलं नाही. तो नुसता हसत सुटला आणि म्हणाला, ''तो तुम्हाला काहीही करणार नाही. तो फक्त गाडीत काही खाण्यासारखं आहे का पाहतो आहे . तो ते घेऊन जाईल, नाहीतर निघून जाईल''.

'कॉम्बीत खाण्याचे पदार्थ घेऊ नका', असं आम्हाला जोसेफनं आणि इतरांनीही सांगितलं होतं आणि त्याप्रमाणे आम्ही वागत होतो. फक्त एक पाण्याची बाटली होती; पण तीदेखील बसायच्या सीटच्या मागच्या कप्प्यात व्यवस्थित, दिसणार नाही अशी ठेवलेली होती. त्यामुळं तो वानर एकदा सगळीकडे शोधकपणे पाहून निघून गेला: मात्र तो इतका निरुपद्रवीपणानं वागेल अशी खात्री आम्हाला नव्हती. त्यामुळं आम्ही ओरडून जोसेफला त्याला हाकलायला सांगत होतो.

ही सगळी गंमत आमच्या कॉम्बीच्या मागंच असलेल्या कॉम्बीतलं गुजराती कुटुंब पाहत होतं. आमच्या कॉम्बीवर चढलेला वानर पाहून त्यांना गंमत वाटत होती. ती माणसं हसत - खिदळत होती आणि कॅमेरे लावून ते दृश्यं टिपीत होती.

तेवढ्यात आमच्या कॉम्बीत खाण्यासारखं काही नाही, असं दिसून आल्यामुळं तो वानर आमच्या कॉम्बीवरून उतरला आणि मग काय होतंय ते कळण्यापूर्वीच त्या मागल्या कॉम्बीवर चढला. मग इतका वेळ हसणारी त्या कॉम्बीतली माणसं किंचाळू लागली. त्यांच्या कॉम्बीत बऱ्याच बायका होत्या आणि मुलंही हाती. त्यामुळं तिथं एकच गोंधळ उडाला. पुन्हा त्या कॉम्बीत खाण्याचे पदार्थ बरेच होते होते. गुजराती माणसं खाण्यापिण्याचा उत्तम बंदोबस्त केल्याशिवाय प्रवासाला निघत नाहीत आणि बरोबर मुलं असल्यामुळं त्यांनी जरा अधिकच बंदोबस्त केला होता. त्यांना सांगितलं होतं; पण त्यांनी ते मानल नव्हतं.

त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. त्या वानरानं कॉम्बीत उडी मारली. तेव्हा बायका, मुलांनी आणि पुरुषांनीदेखील हलकल्लोळ केला. या गोंधळात त्या वानरान मात्र अत्यंत चपळाईनं खाण्याचे पदार्थ आणि पाण्याची बाटलीदेखील कब्जात घेतली आणि पाहता पाहता तो कॉम्बीतून उडी मारून बाहेर पडला. त्याच्याजवळ खाण्याचे पदार्थ पाहून इतर वानरं त्याच्याभोवती जमली आणि हिसकाहिसकी करू लागली. त्या वानरानं त्या कॉम्बीत चांगली सात - आठ माणसं असून कोणालाही जराही इजा केली नव्हती. फक्त खाण्याचे पदार्थ त्या लोकांनी गमावले होते आणि बाहेर बसून वानर ते खाताना बापड्यांना बघावं लागलं.

असो! त्या वानरानं जरासा गोंधळ उडवून दिला आणि आधी आम्ही त्या गुजराती कुटुंबाची आणि नंतर त्यांनी आमची करमणूक केली.

नंतर त्या लोकांनी या गोष्टीबद्दल चालकाकडे व नंतर गेम वॉर्डनकडे तक्रार केली; पण गेम वॉर्डननं ती फेटाळून लावली. बरोबर खाद्यपदार्थ घ्यायचे नाहीत, असा नियम असताना तुम्ही ते घेतलेत आणि स्वतःवर प्रसंग ओढवून घेतलात, तेव्हा दोष तुमचाच असं त्यानं सांगितलं.

आम्ही सगळे प्राणी पाहिले होते. फक्त हत्ती आम्ही व्यवस्थितपणे पाहिले नव्हते. ते आम्हाला बघायचे आहेत, असं म्हटल्यावर जोसेफ आम्हाला ते दाखवायला निघाला.

जोसेफ हा या बाबतीत चांगलाच तज्ज्ञ होता. कुठची श्वापदं कुठं असतील त्याचा अचूक अंदाज त्याला होता आणि लीद, पावलांच्या खुणा यांचा मागे घेत तो अचूकपणे हवी ती श्वापदं हुडकून काढीत असे. त्याची नजरसुद्धा ससाण्याची होती. अगदी झाडीतूनसुद्धा त्याला अचूकपणे श्वापदं दिसत असत.

वाटेत झेब्रे, हरणं वगैरेंचे कळप आम्हाला दिसले आणि जाळीत झोपलेले सिंहही दिसले. दुरून दोन शहामृगही दिसले. शहामृगांचेसुद्धा कळप असतात असं मी वाचलं होतं; पण आम्हाला एखाद - दुसरंच शहामृग दिसत होतं आणि तेसुद्धा दुरून. आमची कॉम्बी जवळ आली म्हणजे ते दूर जात. हे पक्षी चांगले मजबूत असावेत आणि त्यांच्या लाथेत बरीच ताकद असावी, असं मला जाणवलं.

जिराफांचा एक कळप आम्ही अगदी जवळून पाहिला. दोन जिराफ समोरासमोर उभे राहिले होते आणि माना एकमेकांवर टेकवून त्यांनी त्यांचं गुणाकाराचं चिन्ह केलं होतं. हे त्यांचं प्रियाराधन होत की काय कोण जाणे.. मानेवर मान टेकणं, घासणं ही त्यांची प्रेम व्यक्त करायची रीत असावी. त्याच्या लांबलचक माना पाहून हे चालताना तोल सावरतात कसा आणि चरायला मान खाली वाकवली तर कोलमडून कसे पडत नाहीत, असा प्रश्न त्यांच्याकडं पाहून मला नेहमीप्रमाणे पडला.

जोसेफनं आम्हाला बरंच दूर नेलं. मग एका डोंगराची चढण आम्ही चढू लागलो. मला घाटलं, की हत्ती हा अवजड प्राणी डोंगराची चढण कशाला उगीच चढेल! पण तेवढ्यात दूर आम्हाला एक हत्ती दिसला. मग लक्षात आलं की तो चार हत्तींचा एक छोटासा कळप आहे.

जोसेफनं कॉम्बी वेगानं पळवली आणि आम्ही त्या हत्तींच्या जवळ जाऊन पोहोचलो. आमच्यापासून काही उपद्रव नाही हे त्या हत्तींना माहीत होतं. त्यामुळं ते शांतपणे चरत पुढं सरकत राहिले.

जोसेफनं आमची कॉम्बी पहिल्यानं मोठ्या नर हत्तीजवळ नेऊन उभी केली. तो कळपाचा प्रमुख होता हे उघडच होतं. तो एवढा प्रचंड होता की आमची इतर प्राण्यांपेक्षा मोठी दिसणारी कॉम्बी त्याच्यापुढं लहान आणि बुटकी दिसू लागली. या प्रचंड हत्तीपासून केवळ वीस - पंचवीस फूट अंतरावर जोसेफनं आमची कॉम्बी नेली होती.

मी म्हटलं, ''अस इतक्या जवळ कशाला नेतोस? तो बिथरला तर?''

जोसेफ म्हणाला, ''तो बिथरायचा नाही, पण बिथरतोय असं वाटलं तर मी पळून जायच्या तयारीत आहे''.

आपली कॉम्बी धूम पळतेय आणि बिथरलेला हत्ती आपला पाठलाग करतोय, ही कल्पना तेव्हा तरी आकर्षक वाटली नाही. दुसऱ्या एखाद्या कॉम्बीचा हत्तीनं केलेला पाठलाग पाहणं मात्र मला आवडलं असतं; पण हत्तीनं पण पाठलाग वगैरे काही केला नाही. त्यानं आम्हाला पाहिलं होतं; पण आमच्याबद्दल त्याच्या मनात कोणतीच शंका अगर नाराजी नव्हती. तो चरतही नव्हता. मला वाटतं, की तिथलं हिरवंगार गवत आणि झाडांची पानं खाऊन त्याचं पोट तुडुंब भरलेलं होतं आणि त्या तृप्तीत तो शांतपणे उभा होता. नाही म्हणायला तो आपले केवढे तरी मोठे कान सावकाश हलवीत होता. आपल्या भारतीय हत्तीपेक्षा आफ्रिकन हत्तींची डोकी काहीशी लहान अरुंद असतात आणि कान बरेच मोठे असतात. जोसेफ म्हणाला, की आमच्या आफ्रिकन हत्तींच्या कानांचा आकार आफ्रिकेच्या नकाशासारखा असतो. मी त्या दृष्टीनं त्या हत्तीच्या कानांकडे पाहिलं, तेव्हा जोसेफचं म्हणणं किती खरं आहे, ते माझ्या ध्यानात आलं.

कळपाचा प्रमुख असलेल्या बड्या हत्तीच्या पुढं त्याच्या मानानं एक तरुण आणि लहान हत्ती मजेत मान हलवीत, सोंडेनं इकडच्या तिकडच्या झाडांचा पाला ओरबाडीत चालला होत. आपण आता मोठे झालो, अशा ऐटीत असल्यासारखा तो दिसत होता. आपल्या आई आणि वडिलांपासून जरा अलग होऊन एकट्यानं चरत होता.

त्याची बहुधा आई असलेली मोठी हत्तीण पुढं चालली होती. तिच्याबरोबर तिला अगदी चिकटून तिची दोन पिलं चालली होती. त्यातलं एक तसं मोठं होतं; पण आईपासून दूर राहायला अजून तयार नव्हतं.

गवतात अस मुरायचं असत





पाय कसे चपळ, नाजुक आणि देखणे; बांधेसुद शरीरावर , रेशमाची झाक आणि गोंजिरवाण्या [illegible]






[illegible] तीरावरचे ध्यानस्थ



आम्हा कोल्ह्याचा
जंगलात निभाव
लागायचा तर कान
सदा टवकारलेले
असावे लागतात
आणि नंतर लागते
सावधपणे
न्याहाळणारी दृष्टी!



लेकुरवाळी

साशंक टेहळणी
आमच्या मागावर तर
कोणी नाही ना?



लालित्य, अंगावरच्या
रेषांच आणि
पर्णराजीच्या नक्षीच

हसा माझ्या
लांबलचक मानेला
पण हा हिरवा
कंच पाला मीच
खाऊ शकतो





शिवाय त्यांच्यात जे अगदी पिटुकलं पिलू होतं त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी ते आईबरोबर राहून पार पाडत होतं.


आई आणि हे त्यामानानं मोठं पिल्लू यांच्यामध्ये एक अगदी पिटुकलं पिलू होतं. नुकतंच ते जन्माला आलं असावं, कारण आईच्या गुडघ्यापेक्षा ते जरासंच उंच होतं. आई करते तसं करायचा ते प्रयत्न करीत होतं; पण आईसारखी सोंड असून सोंडेनं चिखल उचलून तो स्वतःच्या अंगावर उडवणं काही त्याला जमत नव्हतं. मग आईच आपल्याबरोबर त्यालाही ही सुखकारक आंघोळ घालीत होती.

त्या छोट्या पिलाचं संरक्षण ती हत्तीण अगदी जीव लावून करत होती. ते अगदी आपल्याजवळ, आपल्या पुढल्या पायांत घोटाळत राहीत, अशी ती काळजी घेत होती. तशीच आपल्या धाकट्या भावडांची काळजी घेत होती. ते जरासं मोठं झालेलं पिलू ( तीही बहुधा हत्तीण असावी. ) त्या दोन हत्तींमध्ये ते पिटुकलं पिलू दुसऱ्या कोणाच्या दृष्टीसही पडू शकत नव्हतं. मग त्याच्यावर कोणी हल्ला करू शकेल, ही शक्यताच नव्हती. आपल्या छोट्या पिलाचं हे वन्यप्राणी किती जिवाच्या शर्थीनं संरक्षण व संगोपन करतात, ते मी नागझिऱ्याला वगैरेदेखील पाहिलं होतं.

हत्तीण आणि तिची दोन पिलं यांनी तिथल्या पाण्यांच्या छोट्याशा डबक्यातल्या चिखलानं मनसोक्त आंघोळ केली. मग तो काहीसा मोठा झालेला हत्तीदेखील तिथं आला आणि त्यानंही त्यांच्या बाजूला उभं राहून तशीच चिखलाची आंघोळ केली. अखेर तो बडा हत्ती तिथं आला, तेव्हा ते बाकीचे हत्ती बाजूला झाले आणि मग त्या बड्या हत्तींनं सोंडेनं आपल्या सर्वांगावर चिखल उडवून घेतला.

अशी सर्वांनी चिखलाची मनसोक्त आंघोळ केल्यावर तो हत्तींचा कळप सावकाश आपले भले मोठे कान हलवीत पुढं निघून गेला.

त्यांचं कान हलवणं ही जणू आपोआप घडणारी क्रिया होती. त्या अरण्यात चरणाऱ्या हरणं, सांबर वगैरे प्राण्यांच्या शेपट्यादेखील सारख्या



*हत्तीदेखील समोर आले, तरी आमची मान वरचं*

हलत असलेल्या दिसत. माश्या हाकलण्यासाठी त्या हलवल्या जात आहेत, असं काही दृश्य दिसत नव्हतं. सामान्यतः त्या इतक्या तोकड्या होत्या, की त्यांनी अंगावरच्या माश्या फारशा हाकलता येणचं शक्य नव्हतं. त्या आपल्या उगीचच अखंडपणे आणि अतिशय वेगानं हलत होत्या. इतर प्राण्यांच्या कानांची हालचाल मात्र आपोआप होत असली, उगीचच होत नव्हती. ते मध्येच गर्रकन आवाजाच्या दिशेनें फिरत होते आणि आवाज जर धोक्याचा इशारा देणारा असला, तर तो प्राणी चरायचं थांबत होता आणि टवकारून आवाजाच्या दिशेनं पाहत होता. त्या दिशेला उभ्या असलेल्या कळपाच्या टेहळ्यावर लक्ष ठेवीत होता.

आम्ही एखाद - दुसरं शहामृग पाहिलं होतं; पण तेदेखील दुरून आणि शहामृगाचा कळप असा आमच्या दृष्टीस पडला नव्हता. तो दिसतो का म्हणून आम्ही सारखं लक्ष ठेवून होतो; पण त्या पक्ष्यांचं दर्शन आम्हाला दुरूनच झालं. एक शहामृग पंख विस्कटत चाललं होतं आणि जमिनीवरचे कीटक वगैरे वेचत होतं.

आता संध्याकाळ झाली होती. सिंह शिकारीला बाहेर पडले होते. एका सिंहिणीनं एक ग्नू बहुधा नुकताच मारला होता. ती एकटीच त्याच्या पोटात तोंड खुपसून त्याचं मांस खात होती. संध्याकाळची वेळ असल्यामुळं गिधाडं मात्र तिथं जवळ जमली नव्हती.

सिंह असे शिकारी करत होते आणि हजारोंच्या संख्येने वन्यप्राणी त्या गवताळ अरण्याचा मैलान् मैलाचा विस्तार व्यापून टाकत होते.

वन्य जीवनाची ती विपुलता, तो महापूर पाहून मन कसं तृप्त होत होतं. जगात असा एक प्रदेश आहे, की जिथं अजून या वन्यप्राण्यांचं राज्य आहे, हे पाहून समाधान वाटत होतं.

या जगात एक प्राणी दुसऱ्याचं भक्ष्य असतो हे खरं; पण म्हणून प्राण्यांची कुठलीही जात नष्ट होत नाही. सगळ्यांना जगता यावं म्हणून सगळेच जगत असतात. पण या प्राण्यांत असा एक प्राणी आहे, की तो सगळी भूमीच बळकावतो. त्याचं नाव मनुष्य! हा प्राणी इतर हजारो जातींच्या हजारो प्राण्यांचा नायनाट करतो आणि एक विविधताहीन असं जग निर्माण करतो आणि पुढं पुढं तर इतरांनाच नव्हे, तर स्वतःच्या मनुष्य जातीलाही त्या जगात जगणं कठीण व्हावं, अशा परिस्थिती निर्माण करतो.

युरोप, अमेरिकेत आणि आता आशिया खंडातही माणसानं असं केलं आहे. शंभर वर्षापूर्वी आपल्या हिंदुस्थानातदेखील विपुल, विविधतापूर्ण वन्यजीवन होतं. अनेक जुन्या पुस्तकांत आणि विशेषतः जिम कॉर्बेटच्या शिकारकथांत या वन्यजीवनाचं वैभवशाली दर्शन घडतं, पण माणसांची वाढ बेसुमार होत आहे आणि ही वखवखलेली माणसं अरण्याची बेसुमार तोड करीत आहेत, ती नष्ट करीत आहेत. त्यामुळे अनेक वन्यप्राण्यांच्या जाती नष्ट झाल्या आहेत, अगर होण्याच्या बेतात आहेत. पर्यावरणाचे कैवारी रस्ता रुंद करण्यासाठी झाड तोडलं जात असेल तर त्याला मिठ्या मारतात; पण बेसुमार वाढणारी लोकसंख्या ही खरी पर्यावरणाची आणि वन्य जीवनाची शत्रू आहे, इकडे त्यांचं लक्षच जात नाही की काय, असं वाटू लागतं.

वन्यजीवनाच्या अस्तित्वावरच गदा आणणाऱ्या या जगात अशी संरक्षित अरण्यं आहेत, याचं फार समाधान वाटतं. अर्थात आफ्रिकेतदेखील वन्यजीवन मोठ्या प्रमाणावर नष्ट केलं जात आहे. लाकडासाठी जंगलं तोडली जात आहेत. हस्तिदंतासाठी हत्ती, शिंगांसाठी गेंडे आणि निव्वळ शिकारीची हौस म्हणून इतर प्राण्यांची हत्या होत आहे. शिवाय आफ्रिकेतही आता लोकसंख्या वाढू लागली आहे. काही देशांत तर ती झपाट्यानं वाढत आहे आणि शेती करण्यासाठी जंगलं तोडली जात आहेत. टांझानियात हे होत आहे आणि केनियातदेखील होत आहे.

सुदैवानं या वन्यजीवनाचं संरक्षण केलं पाहिजे, ही जाणीव हळूहळू का होईना निर्माण होऊ लागली आहे आणि त्यातूनही विशेष म्हणजे हे वन्यजीवन हे डॉलरची कमाई करण्याचं फार प्रभावी साधन आहे, हे दरिद्री बुभुक्षित आफ्रिकन सरकारांना आता कळलं आहे. फारसा खर्च अगर परिश्रम न करता केवळ आहे ती परिस्थिती कायम ठेवून बरेच डॉलर मिळविता येतात, हे पाहून आता आफ्रिकन सरकार अरण्यांचं, वन्यप्राण्यांचं संरक्षण करू लागली आहेत. आंतरराष्ट्रीय संस्था त्यांना यासाठी उत्तेजन व आर्थिक सहाय्य देत आहेत. केनियात तेल नाही, इतर खनिजं नाहीत, शेती फारशी नाही आणि आधुनिक उद्योगही नाहीत. खरं म्हणजे धड रस्तेदेखील नाहीत. तरी शेकडो पर्यटक तिथं येतात. डॉलर देऊन जातात. अर्थात त्यांच्या संख्येवरही केव्हाना केव्हा नियंत्रण घालावं लागेल.

केनियातलं हे वन्यजीवन पाहताना आपल्या देशाचा विचार सारखा माझ्या मनात येत होता. या आपल्या देशातला निसर्ग किती वैभवशाली आहे! हवामानाची, भूमीची, वनस्पतीची, वन्यजीवनाची केवढी विविधता आपल्या देशात आहे. मी केनियात पाहिले ते बहुतेक सगळे प्राणी, शिवाय आणखी कित्येक प्राणी आपल्या या देशात होते. अजूनही आहेत, पण अयशस्वी होत आहेत आणि या सुंदर देशाला आम्ही त्याचे दळभद्री पुत्र उजाड आणि कंगाल करीत आहोत.

हा खिन्न करणारा विचार मनात बाळगतच मी कॉम्बीतून नैरोबीला दुसऱ्या दिवशी परत येत होतो. त्याबरोबरच केनियात मी जे पाहिलं, त्याच्या आठवणीनं मन तुडुंब भरलं होतं.

तिथल्या वन्यजीवनाबरोबरच तिथली माणसंही मला आवडली होती. त्यांच्या चेहऱ्यावर सहजपणे फुलणारं हास्य मला आठवत होतं. त्यांचं सौजन्य आठवत होतं. त्यांचं दर्शनही मला आवडलं होतं. ती उंचीपुरी, मजबूत बांध्याची माणसं मला आवडली होती. सगळ्याच आफ्रिकन लोकांचा काळा वर्ण आणि चेहरेपट्टी काही तुम्हा-आम्हाला आवडेल अशी नसते; पण या केनियातल्या लोकांचा काळा वर्ण आणि चेहरेपट्ट्या मला आवडल्या होत्या आणि सगळ्यात काय आवडलं होतं सांगू? हा देश आमचा आहे, इथं राज्य आमचं आहे या भावनेनं त्यांना वावरताना पाहून मला फारच आनंद होत होता. आफ्रिकेच्या माथ्यावरचा गुलामगिरीचा शिक्का आता पुसला गेला होता.

मला वाईट वाटलं ते तिथल्या बेकारीचं आणि दारिद्र्याचं. जागोजागी भीक मागणारी माणसं पाहिली म्हणजे आपल्या देशात जसं खिन्न वाटायला लागतं, आपली आपल्यालाच लाज वाटायला लागते, तसं तिथं होत होतं.

माणसं दरिद्री असली तरी त्यांची उपासमार होत आहे, खायची-प्यायची आबाळ होते, असं आढळत नव्हतं, हे कसं काय, असं मी जोसेफला विचारलं. तो म्हणाला, की आमच्या समाजात कुटुंबांचं बंध फार बळकट आहेत. कुटुंबात जरी एक मनुष्य कमावता असला तरी त्याला कुटुंबातल्या सगळ्यांना जेऊ-खाऊ घालावं लागतं. रानटी टोळ्यांतदेखील हे सामाजिक बंध इतके प्रबळ असतात, हे पाहून आश्चर्य वाटलं, कुतूहल वाटलं. मग मी आणखी चौकशी केली. मी त्याला विचारलं, "तुमच्या समाजात वेगवेगळ्या टोळ्यांचे, जमातींचे लोक आहेत. ते एकमेकांशी लग्न करतात का?"

तो म्हणाला, "पूर्वी करत नसत. आता काही लोक करतात. अखेर ते आई-वडिलांवर अवलंबून असतं. त्यांनी परवानगी दिली तर दुसऱ्या जमातींच्या मुलीशी अगर मुलाशी लग्न करता येतं, नाही तर नाही."

नंतर तो आपण होऊन म्हणाला, "आमच्या देशात परदेशातून अनेक लोक येतात. इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, अमेरिकन, कॅनेडियन वगैरे

पुष्कळ. त्यांच्यापैकी कोणी कोणी इथल्या पुरुषांशी अगर बायकांशी लग्न करतात; पण तुमचे इंडियन लोक इतकी वर्षं आमच्या देशात राहतात, पण त्यांच्यापैकी कोणीही कधीही आमच्याशी लग्न करीत नाहीत.''

यावर मी काय बोलणार! मी म्हटलं, ''तसंच काही नाही. आमची इंडियन मुलं आणि मुली पुष्कळ परदेशी लोकांशी हल्ली लग्न करतात.''

खरी गोष्ट अशी असावी, की काळ्या कातडीविषयी भारतीयांच्या मनात एक अढी आहे. अमेरिकेतही आपले लोक तिथल्या काळ्या लोकांशी लग्न करीत नाहीत; पण हा आपला माझा अंदाज. या विषयाचा काही मी अभ्यास केलेला नाही.

नैरोबीत एक रेस्टॉरंट आहे. तिथं झेब्रे, हरणं, काळवीट, सुसरी इत्यादी सर्व प्राण्यांचं मांस जेवणात दिलं जातं आणि प्रत्येक प्रकारच्या मांसाची चव वाढविणारं सॉसही त्याच्याबरोबर दिलं जातं. त्या रेस्टॉरंटमध्ये आमच्या दुपारच्या जेवणाची व्यवस्था ॲक्रॉस आफ्रिका सफारी कंपनीनं केली होती; पण इतक्या हौसेनं ते प्राणी पाहिल्यावर त्यांचं मांस खाणं मला प्रशस्त वाटेना.

विमानतळावर जोसेफला भरपूर टिप दिल्यावर थोडं क्षिलिंग उरले होते. तेवढ्या थोड्या क्षिलिंगचेदेखील दोन-तीन डॉलर आम्हाला तिथल्या बँकेनं दिले.

केनियात परकीय चलनाची खरेदी-विक्री खरोखर किती खुली आहे, याचा मला सुखद अनुभव आला. आपल्या देशात निर्बंध काढायचे म्हटले तरी ते काढणं सरकारच्या हातून होत नाही. सगळं नियंत्रित करण्याची प्रचंड हाव आमच्या नोकरशाहीला आणि राजकारण्यांना आहे.

जे नेहमी घडतं; पण इतके दिवस घडलं नव्हतं ते अखेर विमानतळावर घडलं. माझा एक विद्यार्थी मला भेटला. मी जगभर प्रवास केला आहे; पण प्रत्येक प्रवासात एकही विद्यार्थी भेटला नाही, असं कधी होत नाही.

*असेन बछडा पण सिंह आहे म्हटलं सिंह.*



*जांभई देखील धडकी भरणारी.*



*हवे तेव्हा होतात पायांचे हात.*



या गुजराती विद्यार्थ्यानं सहकुटुब केनियात आमच्यासारखाच प्रवास केला होता आणि अर्थातच आमच्यापेक्षा खूपच कमी पैशांत केला होता. मला नेहमी वाटत, की या गुजराती मुलाचा मी शिक्षक न होता, विद्यार्थी झालो असतो, तर ते अधिक फायदेशीर ठरल असत.

केनियात सगळ्या परदेशी वस्तू अतिशय महाग होत्या: पण आश्चर्य म्हणजे केनिया एअरवेजच्या विमानात परदेशी मद्य मात्र चांगलंच स्वस्त होतं. युरोपहून येणाऱ्या विमानात असतं त्याहून स्वस्त होतं. बहुधा केनिया एअरवेज या मद्याची खरेदी दुबईत करीत असावी.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे मी माझ्या गाडीत बसून माणसांनी खचाखच भरलेल्या मुंबईनामक नागरी जंगलातून ऑफिसात गेलो. जाताना मनात असा विचार आला, की केनियातल्या जंगलापेक्षा या मानवी जंगलात अधिक क्रूरपणा आणि धोका आहे.

◆ ◆ ◆

*आज भलतेच खुर्षीत दिसताय. तुमच्या राज्याची सफर करून आलो म्हणून!*



*गवतात अस मुरायच असत.*



*आम्हा कोल्ह्यांचा जंगलात निभाव लागायचा तर कान सदा टवकारलेले असावे लागतात आणि नजर लागते सावधपणे न्याहाळणारी.*





मराठी ग्रंथ

REFBK-0029450